# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com ✦ अमरावती, शुक्रवार १८ सप्टेंबर २०२६ एक प्रतिष्ठित सवय ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०




# अवैध दारू-जुगाराविरुद्ध ग्रामीण पोलिसांची कारवाई, ८.८० लाखांचा मुद्देमाल जप्त

## -पाच पोलिस ठाण्यांच्या हद्दीत २० जणांविरुद्ध गुन्हे दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** सण-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अमरावती ग्रामीण पोलिसांनी अवैध दारू आणि जुगाराविरुद्ध धडक मोहीम राबविली.

'ऑपरेशन कवच' अंतर्गत १६ सप्टेंबर रोजी दत्तापूर, बेनोडा, अचलपूर, मोर्शी आणि चांदूर बाजार पोलिस ठाण्यांच्या हद्दीत करण्यात आलेल्या कारवाईत अवैध दारूचे दोन गुन्हे दाखल करण्यात आले, तर जुगाराच्या तीन कारवायांमध्ये एकूण १७ जणांवर कारवाई करण्यात आली. या कारवायांमध्ये सुमारे ८ लाख ८० हजार २७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अमरावती ग्रामीणचे पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांनी सण-उत्सवाच्या काळात कोणतीही अनुचित घटना घडू नये तसेच अवैध दारू आणि जुगाराच्या धंद्यांना आळा घालण्यासाठी सर्व ठाणेदार आणि स्थानिक गुन्हे शाखेला कारवाईचे निर्देश दिले होते. त्यानुसार ग्रामीण पोलिसांनी विविध ठिकाणी कारवाया केल्या. दत्तापूर आणि बेनोडा पोलिस ठाण्यांच्या हद्दीत अवैध दारूविक्रीविरुद्ध कारवाई करण्यात आली. यामध्ये योगेश शंकरराव बेलोसे (३७, रा. काशीखेड) आणि योगेश नथ्थूजी धोटे (४१, रा. वॉर्ड क्र. १, रेल्वे स्टेशन रोड, बेनोडा) यांच्याविरुद्ध स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले.

त्यांच्या ताब्यातून १९ नग देशी दारूच्या पावट्या व इतर साहित्य असा एकूण १ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अचलपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत जुगाराविरुद्ध कारवाई करण्यात आली. या कारवाईत महेमूद खा बिस्मिल्ला खा (४९, रा. मुकेरीपूरा) याच्यासह आणखी एका इसमाविरुद्ध कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून २ हजार २४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

मोर्शी पोलिसांनीही जुगार अड्ड्यावर कारवाई करीत विक्की संतोष भलावी (३३, रा. इंदिरानगर) याच्यासह आणखी तीन जणांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून १० हजार ७८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

### चांदूर बाजारात सर्वाधिक मुद्देमाल

चांदूर बाजार पोलिस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या जुगार कारवाईत गजानन देविदास पवार (४२, रा. दहीगाव पूर्णा) याच्यासह आणखी ११ जणांविरुद्ध कारवाई करण्यात आली. या कारवाईत तब्बल ८ लाख ६५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ग्रामीण पोलिसांच्या या कारवायांमध्ये जुगाराच्या कारवाईतील हा सर्वाधिक मुद्देमाल ठरला. ही कारवाई पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशाने, अपर पोलिस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली दत्तापूर, बेनोडा, अचलपूर, मोर्शी आणि चांदूर बाजार पोलिस ठाण्यांच्या ठाणेदार व पथकांनी केली.

# गरजू दुचाकीस्वारांना विनाशुल्क हेल्मेट वाटप

## ऑपरेशन कवचअंतर्गत अचलपूर पोलिसांचा जनहिताचा उपक्रम



**अचलपूर/प्रतिनिधीः-** रस्ते अपघातांमध्ये दुचाकीस्वारांच्या जीविताचे होणारे नुकसान टाळण्यासाठी वाहतूक नियमांचे पालन आणि सुरक्षित वाहनचालकाची जाणीव निर्माण करणे गरजेचे आहे. याच सामाजिक बांधिलकीतून अचलपूर पोलिसांनी गुरुवारी (१७ सप्टेंबर) 'ऑपरेशन कवच' अंतर्गत गरजू दुचाकीस्वारांना विनाशुल्क हेल्मेट वाटप करून जनहिताचा संदेश दिला. अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. अचलपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक तथा ठाणेदार कैलास भगत यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक आतिक शेख, जमील खान तसेच पोलीस हवालदार अमरसिंग जांभेकर, प्यारेलाल जामुनकर यांनी नाकाबंदीच्या ठिकाणी दुचाकीस्वारांची तपासणी केली. यावेळी हेल्मेटची आवश्यकता असलेल्या गरजू वाहनचालकांना पोलिसांकडून विनाशुल्क हेल्मेट प्रदान करण्यात आले. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करणे हा पोलिसांच्या कर्तव्याचा एक भाग असला, तरी नियमांचे पालन व्हावे आणि अपघातातील जीवितहानी टळावी, यासाठी पोलिसांनी थेट सुरक्षेचे साधन उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा विशेष संदेश ठरला. हेल्मेट केवळ पोलिसांच्या कारवाईपासून बचाव करण्यासाठी नव्हे, तर दुचाकीस्वाराच्या डोक्याचे आणि पर्यायाने त्याच्या जीवनाचे संरक्षण करणारे महत्त्वाचे सुरक्षा कवच असल्याचे पोलिसांनी यावेळी स्पष्ट केले. अचलपूर शहरासह परिसरात दुचाकींची संख्या मोठी असून दैनंदिन प्रवासासाठी नागरिक मोठ्या प्रमाणावर मोटारसायकलींचा वापर करतात. अशा परिस्थितीत प्रत्येक दुचाकीस्वाराने स्वतःच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत दर्जेदार हेल्मेट वापरणे आणि वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. 'ऑपरेशन कवच'च्या माध्यमातून अचलपूर पोलिसांनी कारवाईसोबतच जनजागृती आणि सामाजिक उत्तरदायित्वाची भूमिका बजावत नागरिकांच्या सुरक्षिततेला केंद्रस्थानी ठेवले आहे. पोलिसांच्या या उपक्रमामुळे गरजू वाहनचालकांना सुरक्षा कवच मिळाले असून, इतर दुचाकीस्वारांनीही हेल्मेट वापरण्याची प्रेरणा घ्यावी, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. पोलिसांच्या दंडात्मक भूमिकेसोबतच 'जीव वाचविणे हीच खरी पोलीस सेवा' या भावनेतून राबविण्यात आलेला हा उपक्रम नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत आहे.

**आली गौराई सोनपावलानी..**

# जेष्ठा कनिष्ठा चे घरा - घरात आगमन



अमरावती/प्रतिनिधीः- गणरायाच्या आगमनानंतर आता लाडक्या गौराईचे घराघरात स्वागत करण्यात आले आहे. गौराईचे आगमन सुख, समृद्धी आणि धनधान्य घेऊन येते, अशी श्रद्धा आहे. त्यामुळे गुरुवारी मंगलमय वातावरणात आणि पारंपरिक पद्धतीने 'आली गौराई सोनपावलांनी...', म्हणत लाडक्या गौराईचे घरोघरी स्वागत करण्यात आले. अनुराधा नक्षत्रावर घरोघरी ज्येष्ठा गौरींचे आगमन झाले. गौराईच्या स्वागतासाठी घरांची स्वच्छता, आकर्षक आरास, विद्युत रोषणाई आणि पारंपरिक सजावट करण्यात आले. ज्येष्ठगौरी अनुराधा नक्षत्रात येतात. ज्येष्ठा नक्षत्रात त्यांचे पूजन केले जाते. मूळ नक्षत्रात त्यांचे विसर्जन केले जाते. गणेशोत्सवाच्या निमित्ताने कुटुंबातील सगळे जण एकत्र माहेरवाशीण म्हणून ३ दिवस राहणाऱ्या या गौरींसाठी छानशी सजावटही करण्यात आली. फुलांनी, घरातील स्त्रियांनी केलेल्या कलाकुसरीच्या वस्तूंनी किंवा बाजारात तयार मिळणारे सजावटीचे सामान वापरुन सजावट केली.आज पहिल्या दिवशी गौरीला भाजी आणि भाकरीचा नैवेद्य दाखविण्यात आले. रोजी ज्येष्ठा नक्षत्रावर महालक्ष्मीची पूजा करून व महानैवेद्य दाखवितात येणार आहे. तिला गोडाधोडाचे जेवण केले जाते. यामध्ये १६ भाज्या, ५ कोशिंबिरी, पुरण, पंचपक्वान्न असा बेत केला जातो. यादिवशी सवाष्ण आणि ब्राह्मण यांना जेवायला बोलवायचीही पद्धत आहे. या गौरी आपल्याकडे माहेरवाशीण म्हणून आल्याने त्यांना खाण्यासाठी लाडू, चिवडा, करंज्या असे फराळाचे पदार्थ, मिठाई, फळे यांचा नैवेद्य दाखविण्यात येतो. तसेच गौरीला विविध प्रकारची फुले आणि पत्री वाहण्यात येतात. संध्याकाळी नातेवाईक, शेजारी आणि मित्र-मैत्रिणींना हळदी- कुंकवासाठी आणि गौरींचे दर्शन घेण्यासाठी बोलविण्यात येते आणि त्यांना प्रसाद दिला जातो. गौरी आगमनामुळे घराघरात नवचैतन्य निर्माण झाला आहे.

भातकुली येथील चुनकीकर यांच्या निवासस्थानीही महालक्ष्मीचे पारंपरिक पद्धतीने उत्साहात स्वागत करण्यात आले. अर्चना गजानन चुनकीकर व श्रीमती मनीषा राधेश्याम चुनकीकर यांच्या निवासस्थानी महालक्ष्मीची आकर्षक सजावट आणि मनोहारी आरास करण्यात आली. यंदाच्या सजावटीत घरातील लक्ष्मीला महालक्ष्मीच्या प्रतिकृती रूपात विराजमान करण्यात आल्याने या आरासेला विशेष आकर्षण प्राप्त झाले आहे.



# किशोर सावळे यांच्या घरी महालक्ष्मीचे आगमन

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक कोल्हटकर कॉलनी येथील किशोर मधुकरराव सावळे त्यांच्याकडे महालक्ष्मीचे आगमन, गेल्या सहा पिढ्यांपासून, महालक्ष्मी बसविल्या जातात. किशोर मधुकरराव सावळे व अश्विनी किशोर सावळे यांच्याकडे पूजा आरती भक्ती मय वातावरणात पूजा व आरती संपन्न झाली. यावेळी प्रभाकरराव सावळे, राजेंद्र पेलागडे , सीमा पेलागडे प्रवीण - संगीता सावळे, शरद -स्वाती सावळे, सुधीर- हर्षा सावळे, आदित्य- प्राजक्ता पेलागडे, विद्या सावळे माधुरी सावळे, मयंक, अथर्व सावळे, आशा आशाताई मावळे, अमित, पार्थ, माही, ऋषी, जय, अवनी, हिमांशू, विहान व समस्त बालगोपाल मंडळी यावेळेस हजर होते.

## मतदारयादी निरीक्षकांचा मंगळवारी दौरा

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारत निवडणूक आयोगाद्वारे देशभरात राबवण्यात येत असलेल्या 'विशेष सखोल पुनरीक्षण' मोहिमेच्या पार्श्वभूमीवर मतदारयादी निरीक्षक तथा अमरावती विभागीय आयुक्त यांचा मंगळवार, दि. २२ सप्टेंबर रोजी जिल्ह्यात प्रथम दौरा आयोजित करण्यात आला आहे. दुपारी ४.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे ही बैठक पार पडणार आहे. या दौऱ्यादरम्यान विभागीय आयुक्त राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या मतदार नोंदणीविषयक तक्रारी, आक्षेप व समस्या थेट ऐकून घेतील. मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील २५ लाख ४५ हजार ६७७ मतदारांच्या माहितीची घरोघरी जाऊन पडताळणी पूर्ण करण्यात आली आहे. एकही पात्र नागरिक सुटणार नाही आणि एकही अपात्र नागरिक समाविष्ट होणार नाही, या ध्येयाने ही मोहीम राबवली जात आहे.

# १ व १० वरिल उर्वरित

## बीएमएस डॉक्टरचा संशयास्पद मृत्यू

माहिती मिळत आहे.या औषधांचा ओव्हरडोस झाल्यामुळे त्याचा मृत्यू झाला असावा, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे. आदित्य त्याच्या खोलीत उलटा झोपलेल्या अवस्थेत आढळला असून त्याच्या डोळ्यांतून रक्त येत होते, असे समोर आलेय.घटनास्थळी दाखल झालेल्या पोलिसांनी तातडीने मृतदेह ताब्यात घेऊन पोस्टमार्टमसाठी पाठवला आहे. प्राथमिक तपासानुसार, आदित्य स्वतः गोरे होण्यासाठी काही औषधे घेत होता. या औषधांचा अतिरिक्त डोस झाल्यामुळेच त्याचा जीव गेला असावा, असा संशय पालकांनी व्यक्त केला आहे.दरम्यान, पोस्टमार्टम अहवालात श्वासावरोध, हृदयविकाराचा झटका किंवा इतर कारणांची तपासणी केली जात आहे. व्हिसेरा अहवाल आल्या नंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. पालकांच्या तक्रारीवरून वलगाव पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

## रूपाली सराटकर हत्या प्रकरणात

घरी परतल्यानंतर रूपाली घरात पडलेल्या अवस्थेत आढळल्या. त्यानंतर आरोपीने राघव आणि गणेश धुर्वे (वय १६) याच्या मदतीने रूपाली यांना दुचाकीवरून मोर्शी येथील डॉक्टर ढोले यांच्या दवाखान्यात नेले. डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले.

**रुग्णालयाऐवजी मांत्रिकाकडे नेले-** डॉक्टरांनी मृतदेह शासकीय रुग्णालयात नेण्यास सांगितल्यानंतरही आरोपीने तसे न करता रूपाली यांना एका मांत्रिकाकडे नेले. तेथे रूपाली यांचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आल्यानंतर आरोपी राघवला तेथेच सोडून जंगलाच्या दिशेने गेला. त्याने रूपाली यांचा मृतदेह जंगलातील नदीपात्रात फेकून दिला. तसेच ही घटना कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी राघवला दिल्याचे तपासात समोर आले. मात्र, राघवने ही घटना आरोपीचा मोठा भाऊ भोजराज ऊर्फ सुनील चढोकार याला सांगितली. त्यानंतर संबंधितांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी नदीपात्रात तसेच परिसरात मोठ्या प्रमाणात शोध घेतला; मात्र मृतदेह सापडला नाही. तपासाअंती पोलिसांनी धनराज चढोकारविरुद्ध भादंवि कलम ३०२ आणि २०१ अन्वये दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

**१३ साक्षीदारांची साक्ष-** खटल्यात सरकारच्या वतीने एकूण १३ साक्षीदार तपासण्यात आले. साक्षी-पुरावे आणि दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपी धनराज चढोकार याला कलम ३०२ अंतर्गत दोषी ठरवत उर्वरित नैसर्गिक आयुष्यापर्यंत जन्मठेप व ५० हजार रुपये दंड, तर कलम २०१ अंतर्गत तीन वर्षे सक्तमजुरी व ५० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास अतिरिक्त एक वर्षाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. सरकारच्या वतीने अतिरिक्त शासकीय अभियोक्ता ॲड. मंगेश एस. भागवत यांनी न्यायालयात बाजू मांडली. कोर्ट पैरवी म्हणून पूनम होले यांनी सहकार्य केले.

## सहाय्यक अभियंत्याला दोन

विभागाकडे तक्रार दिली.

१६ सप्टेंबर रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान, आरोपीने तडजोडी अंती ९ लाख रुपये लाच घेण्याचे मान्य केले व त्यापैकी पहिला हप्ता म्हणून २ लाख रुपये लाच स्वीकारल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार, १६ सप्टेंबर रोजी रात्री ११ च्या सुमारास सापळा कारवाई करत आरोपीने तक्रारदाराकडून दोन लाख रुपयांची लाच घेताना त्याला रंगेहात ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणी १७ सप्टेंबर रोजी पहाटे ३ च्या सुमारास धारणी पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. या यशस्वी कारवाईत पोलीस उपअधीक्षक रमेश ताले, पोलीस हवा. प्रमोद रायपुरे, ना.पो.कॉ. वैभव जायले व चालक पो.कॉ. राजेश बहीरत यांनी सहभाग घेतला. नागरिकांना लाच मागणाऱ्या लोकसेवकांविषयी तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## ग्रामपंचायतीवर प्रशासक म्हणून

कायदेशीर तरतुदींच्या अधीन राहून पत्रकारांना प्रशासक म्हणून संधी द्यावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यासाठी आवश्यक पात्रता, अनुभव व निकष निश्चित करून शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती संघाकडून करण्यात आली.

निवेदन सादर करताना संघटनेचे केंद्रीय कार्याध्यक्ष युसुफ खान, प्रा.रवींद्र मेंढे, बाळासाहेब सोरगीवकर, उत्तमराव गावंडे, प्रभाकर भगोले, निशिकांत देशमुख, विवेक राऊत, अमोल गवळी, शहजाद खान, राजीव शिवणकर, रितेश मुंधडा, राजेश सराफी, संजय डगवार, पियुष ठोंबरे, प्रकाश रंगारी, इरफान पठाण, अमर घटारे, राहुल देशमुख, अमोल ठाकरे, सुमेद सरदार, प्रशांत सिसोदिया, मनिष खुने, धीरज नेवारे, रवि कलाने, बंडू गावंडे ,विनय गोटेफोडे यांच्यासह पत्रकार संघाचे इतर पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

## ऑनलाइन चक्री जुगार अड्ड्यावर

दरम्यान, १७ सप्टेंबर रोजी अतुल वर यांना गुप्त माहिती मिळाली की, खोलापुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बुधवारा भाजीबाजार येथे नूतन ड्रायफ्रूट दुकानासमोरील बंद शटरच्या जागेत 'फन टार्गेट' या वेबसाइटवर ऑनलाइन चक्री जुगार खेळविला जात आहे. या माहितीच्या आधारे गुन्हे शाखा आणि खोलापुरी गेट पोलिसांच्या पथकाने तेथे छापा टाकला. पोलिसांना दोन जण ऑनलाइन जुगार खेळताना आढळून आले. त्यांना ताब्यात घेत झडती घेतली असता जुगाराची रोख रक्कम, ऑनलाइन जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य व मोबाइल असा ३६ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी रूपेश मदनलाल आलेकर (वय ५१, रा. बुधवारा, अमरावती) आणि नितेश दीपकराव प्रधान (वय ३४, रा. महाजनपुरा, अमरावती) यांच्याविरुद्ध खोलापुरी गेट पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार कायद्याच्या कलम ४ व ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त प्रांजली सोनवणे आणि सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अतुल वर व खोलापुरी गेटच्या पोलीस निरीक्षक सीमा दाताळकर यांच्या नेतृत्वात करण्यात आली. कारवाईत सहायक पोलीस निरीक्षक महेश इंगोले, पोलीस उपनिरीक्षक गजानन सोनुने, पोलीस उपनिरीक्षक अनिता हुलावळे यांच्यासह दोन्ही पथकांतील पोलीस अंमलदार सहभागी होते.

## गुजरी बाजार येथे आ.प्रवीण

परिषद मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड,परतवाडा पोलिस स्टेशन चे ठाणेदार अजय आखरे ,भाजपा जिल्हा उपाध्यक्ष विशाल काकड,शहराध्यक्ष कुंदन यादव,शंकर मालखेडे,रूपेश ढेपे,अतुल वाठ,सुनील चौधरी यांची प्रमुख उपस्थितीती होती.यावेळी मंचावर उपस्थितीत मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले.यावेळी अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले की,गुजरी बाजार परिसर मध्ये व्यापारी,ग्राहक ,नागरिकांच्या वर्गाच्या सुरक्षेचा दृष्टीने पोलिस चौकी निर्मिती गरजेची होती .आणि याबाबत पाठपुरावा करून स्थानिक आमदार निधीतून या परिसरात निर्माण झालेल्या पोलिस चौकीमुळे सामान्य नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरणार असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.गुजरी बाजार परिसरात भाजीपाला - फळ विक्रेत्यांची दुकान ,विविध व्यापारी दुकान आहे .यामुळे या परिसरात नेहमी नागरिकांची प्रचंड गर्दी असते.या परिसरात पोलिस चौकी निर्मिती ची मागणी व्यापारी वर्गाने अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांच्या कडे केली होती .आणि स्थानिक आमदार निधीतून १५ लाख रुपयाच्या निधीतून पोलिस चौकीचे निर्माण करण्यात आले आहे. यामुळे सामान्य नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने मोठी सुविधा उपलब्ध झाल्याने अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.यावेळी शंकर भाषांनी ,प्रफुल बर्वे,महेश कडू,कौस्तुभ मुंदे, सतीश शर्मा,अक्षय पखाले,महेश देशमुख आदी उपस्थितीत होते.

## बडनेरा पोलिसांनी लावले ५९ तडीपार

तडीपारांची यादी जारी केली असून, त्याचे बॅनर बडनेरा शहरात ठिकठिकाणी लावण्यात आले आहेत. यापैकी ४२ जणांचे फोटो लावण्यात आले असून, या सर्वांना १३ ते २७ सप्टेंबर दरम्यान शहरातून तडीपार करण्यात आले आहे. बडनेरा पोलिसांनी पहिल्यांदाच अशा प्रकारे जाहीरपणे बॅनर लावले आहेत, त्यामुळे शहरात तर्क-वितर्क आणि चर्चेला उधाण आले आहे.पोलिसांनी सांगितले की, या यादीचा उद्देश नागरिकांना तडीपार झालेल्या व्यक्तींची ओळख पटावी हा आहे. तडीपारीच्या काळात जर संबंधित आरोपी बडनेरा-अमरावती क्षेत्रात दिसले, तर त्याची माहिती तात्काळ पोलिसांना द्यावी, यासाठी हे बॅनर लावण्यात आले आहेत. बॅनर लागताच विविध ठिकाणी नागरिकांमध्ये उत्सुकता दिसून आली. शहरातील आणि ग्रामीण भागातील नागरिक थांबून हे फलक बारकाईने पाहत आहेत. काही ठिकाणी तर बॅनर पाहण्यासाठी लोकांची गर्दीही जमली होती. पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, यादीत असलेला तडीपार क्षेत्रात दिसल्यास त्यावर स्वतःहून कोणतीही कारवाई करू नये आणि थेट कायदा हातात घेऊ नये, तर तात्काळ पोलिसांना कळवावे. जेणेकरून तडीपारी आदेशाचे उल्लंघन झाल्यास पोलिसांना नियमानुसार कारवाई करता येईल. तडीपार दिसल्यास पोलीस निरीक्षक हनुमंत उरलागोंडावार मो. ८३२९३५७३८७ व बडनेरा स्टेशन येथील फोन. ०७२१-२६८१३०० संपर्क करण्याचे आवाहन केले आहे.

## आठवडी बाजारातील धोकादायक

आहे. मात्र पाहणी होऊनही प्रत्यक्ष दुरुस्तीचे काम झाले नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अधिकाऱ्यांची पाहणी केवळ कागदोपत्रीच राहणार का, की प्रत्यक्षात नागरिकांना सुरक्षित रस्ता मिळणार? असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

या खड्ड्यामुळे यापूर्वी अनेकांना अपघातांचा सामना करावा लागल्याचा दावा स्थानिकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे मोठी दुर्घटना घडण्यापूर्वीच प्रशासनाने तातडीने दखल घेणे गरजेचे आहे. नागरिकांच्या दैनंदिन वर्दळीच्या ठिकाणी वर्षभरापासून समस्या कायम राहणे ही गंभीर बाब आहे. एखाद्या नागरिकाचा जीव गेल्यानंतरच खड्डा बुजविण्याचा मुहूर्त निघणार का? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

नगरपालिका प्रशासनाने या खड्ड्याची तातडीने दुरुस्ती करून परिसर सुरक्षित करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. आता प्रशासन या समस्येकडे गांभीर्याने पाहून तात्पुरती मलमपट्टी न करता कायमस्वरूपी उपाययोजना करणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## पोल्ट्री फार्म फोडून कोंबड्या

पोल्ट्री फार्ममधून कोंबड्या चोरीला गेल्याची घटना घडली होती. याप्रकरणी १० सप्टेंबर रोजी मोर्शी पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू असताना पोलिसांनी तांत्रिक माहिती तसेच गोपनीय माहितीच्या आधारे तपासाची दिशा निश्चित केली. त्यातून श्याम वासुदेवराव सुरजुसे (वय ५५, रा. सुकळी, ता. वरूड) आणि मुकेश दिवाकर धुर्वे (वय २४, रा. कारली, ता. वरूड) यांचा सहभाग समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले. दोन्ही आरोपींना १५ सप्टेंबर रोजी अटक करण्यात आली. त्यांच्याकडून ९ हजार १०० रुपयांची रोकड आणि गुन्ह्यात वापरलेली अंदाजे ४० हजार रुपये किमतीची मोटारसायकल असा एकूण ४९ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. हा मुद्देमाल पुढील तपासासाठी मोर्शी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे. या गुन्ह्यातील फरार आरोपी विजय ज्ञानेश्वर उईके (रा. सुरळी, ता. वरूड) याचा शोध सुरू आहे.

## २०१४ पासून फरार आरोपी

होती. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्याचा शोध घेत १५ सप्टेंबर रोजी चांदूर रेल्वे येथून त्याला ताब्यात घेतले. पुढील कारवाईसाठी त्याला नांदगाव खंडेश्वर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशाने, अपर पोलिस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. सहायक पोलिस निरीक्षक राजपूत, पोलिस उपनिरीक्षक आकाश शिवणकर तसेच अंमलदार रूपेश गावंडे, विवेक घोरमाडे, शांताराम सोनवणे, प्रशांत वैद्य, श्याम गावंडे, रविंद्र वऱ्हाडे, शिवा शिरसाट, प्रज्वल राऊत (चालक) यांच्या पथकाने कारवाईत सहभाग घेतला.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शुक्रवार, १८ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# जिल्ह्यात शालेय विद्यार्थी वरली-मटक्याच्या नादाला? अवैध व्यवसायामुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील विविध शहरांसह ग्रामीण भागात सुरू असलेल्या अवैध व्यवसायांचा काही शालेय विद्यार्थ्यांवर परिणाम होत असल्याची चर्चा आहे. विशेषतः वरली-मटका आणि जुगाराच्या आहारी काही विद्यार्थी जात असल्याने त्यांच्या शिक्षणासह भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. झटपट पैसे मिळविण्याच्या मोहापायी विद्यार्थ्यांचा या प्रकारांकडे ओढा वाढत असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे.

## वरिष्ठपोलीस अधिकाऱ्यांनी दखल घेण्याची मागणी


जिल्ह्यात कमी पावसाने शेतकरी-मजूर संकटात अवैध धंदेवाईकांना मात्र सुगीचे दिवस!

जिल्ह्यात अवैध धंद्यांना ऊत; एलसीबीच्या कारवाईच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह?

जिल्ह्यातील अवैध धंद्यांना अभय कुणाचे?

अधिकारी-पुढारी-यांच्या कथित राजाश्रयाने अवैध धंदेवाईक मोकाट

जिल्ह्यात अवैध व्यवसायात दररोज लाखोंची उलाढाल

वरली लावणारे, पत्ते खेळणारे होतात कंगाल

जिल्ह्यात वाशीम, मंगरूळपीर, कारंजा लाड, मानोरा, रिसोड आणि मालेगाव या शहरांसह विविध भागांत अवैध व्यवसायांवर प्रभावी कारवाई करण्याची गरज व्यक्त होत आहे. स्थानिक पोलीस ठाण्यांसह स्थानिक गुन्हे शाखेने अशा प्रकारांवर सातत्याने लक्ष ठेवून कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

दरम्यान, काही अवैध व्यावसायिक आणि संबंधित यंत्रणांमध्ये आर्थिक हितसंबंध असल्याचे आरोप नागरिकांकडून केले जात आहेत. त्यामुळे पोलीस प्रशासनाने अवैध व्यवसायांवर धडक कारवाई करत माहिती सार्वजनिक करून कारवाईत सातत्य राखण्याची गरज व्यक्त होत आहे.

शालेय वयातील मुलांना अवैध व्यवसायांच्या विळख्यात जाण्यापासून रोखण्यासाठी पोलीस प्रशासनासोबतच शाळा, पालक आणि समाजानेही पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि भवितव्य सुरक्षित राहावे, यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी या गंभीर बाबीची दखल घेऊन जिल्ह्यातील अवैध व्यवसायांवर प्रभावी कारवाई करावी, अशी मागणी होत आहे

# मंगरुळपीर न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा काळी फीत लावून निषेध

## उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्याप्रमाणे समान काम समान वेतनाची मागणी



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्याप्रमाणे समान काम समान वेतन देण्याच्या प्रमुख मागणीसाठी येथील जिल्हा व सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय येथील सर्व न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी १६ सप्टेंबर रोजी काळी फीत लावून शासनाच्या धोरणाचा निषेध नोंदविला.

याबाबत कर्मचाऱ्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या वृत्तानुसार न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सदर निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी कर्मचाऱ्यांनी एकजुटीने सहभाग नोंदवत 'समान काम, समान वेतन' या मागणीसाठी आपली भूमिका स्पष्ट केली.कर्मचाऱ्यांच्या हक्काच्या मागण्यांसाठी सर्वांनी एकजूट दाखवत शासनाने न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून समान काम समान वेतनाची मागणी लवकरात लवकर मान्य करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.या आंदोलनावेळी मंगरुळपीर न्यायालयाचे कर्मचारी अधीक्षक विष्णू बेलखेडकर, प्रशांत कारंजकर ,वाशीम जिल्हा लघुलेखक संघटनेचे अध्यक्ष, वाशीम जिल्हा न्यायालय तृतीय श्रेणी संघटनेचे सदस्य अक्रम खान, मुख्य बेलिफ श्याम टांक, महाराष्ट्र राज्य बेलिफ महासंघाचे सदस्य तथा मुख्य बेलिफ शेख गफ्फार, बेलिफ संघटना जिल्हा वाशिमचे जिल्हाध्यक्ष दुर्गेश राठोड, संतोष डांगे सचिव बेलिफ जिल्हा संघटना वाशीम,तसेच चतुर्थ श्रेणी संघटनेचे जिल्हा कोषाध्यक्ष रविकांत उंद्रे यांच्यासह मंगरुळपीर न्यायालयातील सर्व न्यायालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ई-चलानच्या एका तपासणीने वाहनचोरीचा पर्दाफाश!

## वाहतूक पोलिसांच्या सतर्कतेने वाहनचोर जाळ्यात; पाच चोरीच्या दुचाकी जप्त, ९५ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

■ प्रतिनिधी | अकोला ■

वाहनाची कागदपत्रे नसल्याने वाहतूक पोलिसांनी थांबविले... ई-चलान यंत्रावर वाहनाची माहिती तपासली... आणि अवघ्या काही क्षणांत दुचाकी चोरीची असल्याचे समोर आले. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या चौकशीत एक नव्हे, तर आणखी चार चोरीच्या दुचाकींचा पर्दाफाश झाला. वाहतूक पोलिसांची सतर्कता आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या तत्पर कारवाईमुळे आंतरजिल्हा वाहन चोरीचे प्रकरण उघडकीस आले असून, सचिन अंबासकर (वय ४३, रा. हरिहर पेठ, अकोला) याला ताब्यात घेण्यात आले आहे. त्याच्याकडून पाच चोरीच्या दुचाकी, अंदाजे ९५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



१६ सप्टेंबर रोजी रतनलाल प्लॉट चौकात वाहतूक पोलीस कर्मचारी तुषार झापर्डे आणि महिला पोलीस कर्मचारी उज्वला इटीवाले कर्तव्य बजावत होते. त्यावेळी त्यांनी एमएच-२८-पी-२४३३ क्रमांकाची दुचाकी अडविली. चालकाकडे वाहनाची कागदपत्रे मागितली असता त्याने कागदपत्रे नसल्याचे सांगितले. त्यामुळे पोलिसांनी ई-चलान यंत्रावर वाहनाची माहिती तपासली. तपासणीदरम्यान या दुचाकीबाबत बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव शहर पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल असल्याचे स्पष्ट झाले. वाहतूक पोलीस निरीक्षक विलास पाटील यांनी घटनेची माहिती तातडीने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांना दिली. माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी सचिन अंबासकर याला ताब्यात घेत चौकशी केली. .

### एका दुचाकीने उघडला पाच वाहनांचा धागा!

### बुलढाणा, अमरावती, अकोला अन् मुर्तीजापूर कनेक्शन

पोलिसांच्या तपासात जप्त करण्यात आलेल्या दुचाकींचे चोरीचे धागेदोरे वेगवेगळ्या जिल्ह्यांशी जोडलेले असल्याचे समोर आले. यातील दोन दुचाकी शेगाव शहर, जिल्हा बुलढाणा येथून, एक गाडगेनगर, अमरावती येथून, एक सिव्हिल लाईन, अकोला येथून, तर एक मुर्तीजापूर शहर परिसरातून चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले. जप्त वाहनांमध्ये हिरो स्प्लेंडर प्लस क्रमांक एमएच-२८-पी-२४३३, स्प्लेंडर प्लस क्रमांक एमएच-२७-सीके-६१९५, पॅशन प्रो क्रमांक एमएच-२८-एएफ-५८९७, हिरो स्प्लेंडर प्लस क्रमांक एमएच-२८-जे-११८८ आणि हिरो होंडा एचएफ डिलक्स क्रमांक एमएच-३०-एएच-७६०४ या दुचाकींचा समावेश आहे. यापैकी काही वाहनांबाबत संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये चोरीचे गुन्हे दाखल आहेत. जप्त करण्यात आलेल्या पाचही दुचाकींची अंदाजे किंमत ९५ हजार रुपये आहे.

रतनलाल प्लॉट चौकातील नियमित वाहन तपासणीदरम्यान ई-चलान यंत्रावर झालेल्या पडताळणीने संपूर्ण प्रकरणाला कलाटणी दिली. एका चोरीच्या दुचाकीचा शोध लागल्यानंतर झालेल्या चौकशीत आणखी चार चोरीची वाहने समोर आली. त्यामुळे वाहन चोरीच्या प्रकरणात आरोपीने आणखी किती ठिकाणी हात साफ केला आहे, याचा तपास आता महत्त्वाचा ठरणार आहे.

# खुनाचा प्रयत्न प्रकरणात आरोपीला जामीन मंजुर

■ प्रतिनिधी | वाशिम ■

खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी आरोपी विरूध्द वाशिम पोलीस स्टेशन - ग्रामीण अंतर्गत कलम १०९(१), ३५२ - भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये दाखल झाला होता. सदर प्रकरणात दिनांक ०९ सप्टेंबर रोजी आरोपीचा जिल्हा व सत्र न्यायालयात जामीन मंजुर करण्यात आला. आरोपी नामे दत्ता उगले यांच्यावर खुनाचा प्रयत्न केल्या बाबत आरोपी करून त्याला दिनांक २७ऑगस्ट रोजी अटक करण्यात आली होती. सदर प्रकरणात दिनांक ९ ऑगस्ट रोजी जिल्हा व सत्र न्यायालय आरोपी दत्ता उगले यांचा जामीन बाबत ॲड. सुरजभाउ भगत यांनी अर्ज दाखल केला असता त्यांचा जामीन मंजुर करण्यात आला. यामध्ये ॲड. सुरज भगत यांच्या जामीन बाबत भक्कमपणे बाजु मांडली व त्या प्रकरणात विद्यमान न्यायालयाने आरोपीची जामीन मंजुर केली.

# निवेदनाची तत्काळ दखल; तहसीलदार शेतकऱ्यांच्या बांधावर



■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड तालुक्यातील गणेशपूर येथील शेतक-याच्या वतीने रिसोड तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर यांना कोरडा दुष्काळ जाहीर करण्याबाबत तसेच सोयाबीन पिकाचे झालेल्या नुकसानीबाबत निवेदन देण्यात आले होते. या निवेदनाची तात्काळ दखल घेत तहसीलदार थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली.

यावेळी शेतकऱ्यांनी पावसाअभावी करपून गेलेले सोयाबीन पीक, झालेली मोठी आर्थिक हानी व सध्याची बिकट परिस्थिती तहसीलदार यांच्या निदर्शनास आणून दिली. तहसीलदारांनी प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांची परिस्थिती जाणून घेतली.

काल निवेदन आणि आज प्रत्यक्ष बांधावर पाहणी झाल्याने प्रशासनाने शेतकऱ्यांच्या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेतल्याची भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली. यावेळी तहसीलदार तसेच मंडळ अधिकारी जावळे , तलाठी विजय राऊत, सरपंच व गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# राष्ट्रवादी काँग्रेस रिसोड शहराध्यक्षपदी गोपाल मगर



■ प्रतिनिधी | रिसोड ■

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या रिसोड शहराध्यक्षपदी गोपाल विठ्ठलराव मगर यांची नियुक्ती करण्यात आली. वाशिम जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माननीय चंद्रकांतदादा ठाकरे यांच्या हस्ते गोपाळ मगर यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी बोलताना चंद्रकांतदादा ठाकरे यांनी, 'गोपाल विठ्ठलराव मगर हे रिसोड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतील,' असा विश्वास व्यक्त केला.

समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी तसेच जनतेच्या हितासाठी प्रभावीपणे काम करण्याची जबाबदारी गोपाळ मगर यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे संघटनेला नवी ऊर्जा मिळणार असल्याचे सांगितले.यावेळी बोलताना गोपाल मगर म्हणाले, 'पक्षाने माझ्यावर टाकलेली जबाबदारी मी पूर्ण निष्ठेने पार पाडणार असून, आगामी काळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संघटनात्मक ताकद वाढवण्यासाठी तसेच शहरातील कार्यकर्ते आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणार आहे. पक्षाच्या विचारधारेनुसार रिसोड शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला अधिक बळकट करण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन काम करू.'

यावेळी गजानन पाटील, आरू प्रवक्ता विभाग वाशिम, तेजराव पाटील वानखडे, तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस रिसोड, श्रावण भाऊ जमदाडे, अमर कानडे, पत्रकार गजानन बाजड, प्रदेश सचिव अल्ताफ भाई घनकर, युवा तालुकाध्यक्ष प्रभाकर पाटील सरकटे, गोपाल मोरे शहर महामंत्री, भारत गुंजकर, सदाशिव कांबळे आदी मान्यवर, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शाडू मातीच्या गणेशमूर्तींतून विद्यार्थ्यांचा पर्यावरण संवर्धनाचा संदेश



■ प्रतिनिधी | कारंजा ■

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी वेदांत पब्लिक स्कूल, पोहा येथे शाडू मातीच्या गणपती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या अभिनव उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या कल्पकतेला आणि कलागुणांना साकार रूप देत स्वतःच्या हाताने आकर्षक गणेशमूर्ती तयार केल्या.

कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांनी केवळ गणेशमूर्ती साकारल्या नाहीत, तर आपल्या कलाकृतींच्या माध्यमातून 'पर्यावरणाचे रक्षण करा', 'प्लास्टिकचा वापर टाळा', 'स्वच्छता राखा', 'पाणी वाचवा' आणि 'वृक्षसंवर्धन करा' असे विविध सामाजिक व पर्यावरणपूरक संदेश प्रभावीपणे मांडले.

# ओझोनच्या संरक्षणासाठी वृक्षसंवर्धनाचा संदेश

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जागतिक ओझोन दिनानिमित्त एस.एम.सी. इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय जनजागृतीपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यशाळा प्राचार्य मीना उबगडे यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आली.यावेळी प्राचार्य मीना उबगडे यांनी प्रोजेक्टरच्या माध्यमातून विविध स्लाईडद्वारे विद्यार्थ्यांना ओझोन थराचे महत्त्व व पर्यावरण संरक्षणाबाबत मार्गदर्शन केले.

कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ओझोनचा थर सूर्यापासून निघणाऱ्या अतिनील किरणांपासून मानवासह संपूर्ण सजीवसृष्टीचे संरक्षण करतो, असे सांगण्यात आले. मात्र, गेल्या काही दशकांत प्रदूषण, रेफ्रिजरेटर व एअर कंडिशनरमधील काही हानिकारक



वायू तसेच क्लोरोफ्लोरो कार्बन्सच्या वापरामुळे ओझोनच्या थराला धोका निर्माण झाला आहे.

ओझोनच्या थराचे संरक्षण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे, वृक्षसंवर्धन करणे, ध्वनी व मृदा प्रदूषण कमी करणे, ग्लोबल वारमींग कमी करने,रेफ्रिजरेटर व एअर कंडिशनरचा कमीत कमी वापर करणे तसेच सण-उत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरे करणे, गरजेचे असल्याचे यावेळी सांगण्यात आले. पर्यावरणाचे रक्षण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाचे संस्कार अंगीकारून समाजात जनजागृती करावी, असे आवाहन यावेळी प्राचार्य मीना उबगडे यांच्या वतीने करण्यात आले. या कार्यशाळेस तंत्रसहाय पवन खंडेलवाल यांनी दिले तर कार्यशाळेचे आयोजन राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक तथा मास्टर ट्रेनर अभिजीत मुकुंदराव जोशी यांनी केले.

# बालविकास मंदिर प्राथमिक शाळेत तान्हा पोळा उत्साहात साजरा



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव येथील तहसील कार्यालयाजवळ बोरगाव रोडवरील श्री वेंकटेश सेवा समिती वाशिम द्वारा संचलित बालविकास मंदिर प्राथमिक शाळा, येथे भारतीय संस्कृती व ग्रामीण परंपरेचे जतन करण्याच्या उद्देशाने तान्हा पोळा उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत पारंपरिक वेशभूषेत सजविलेल्या बैलजोड्या शाळेत आणल्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला तान्हा पोळ्याचे महत्त्व, शेतकऱ्यांच्या जीवनातील बैलांचे स्थान तसेच बैलपोळा या सणामागील सांस्कृतिक व पारंपरिक मूल्यांची विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनुसार बैलांच्या प्रतिकृती आकर्षक पद्धतीने सजविल्या होत्या. रंगीबेरंगी कागदी सजावट, फुले, गोंडे व विविध अलंकारांनी सजविलेल्या बैलजोड्यांनी शाळेचा परिसर खुलून दिसत होता.

# राजुरा ग्रामस्थांची तहसील कार्यालयावर धडक

## पिक नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी; तहसीलदारांना दिले निवेदन

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव - तालुक्यातील राजुरा परिसरात गेल्या ४० दिवसां पासून पावसाचा खंड पडल्या मुळे शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना भरपाई द्यावी, या मागणी साठी शेतकऱ्यांनी निवासी नायब तहसीलदार रंजना गोरे यांना १६ सप्टेंबर रोजी निवेदन दिले .

गेल्या काही दिवसांपूर्वी झालेल्या मुसळधार पावसामुळे राजुरा-सुदी,अनसिंग, शिवारातील सोयाबीन, कापूस, तूर इत्यादी पिक. पावसा अभावी करपु लागली आहेत. तर दुसरीकडे पावसाने लांब दडी मारल्याने काही पिके माना टाकू लागली आहेत.



कोरडा दुष्काळा मुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. हातोंडाशी आलेले पीक वाया गेल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले आहे. बँकेचे कर्ज, बियाणे, खते यासाठी केलेला खर्चही निघणार नाही अशी परिस्थिती आहे. आज राजुरा येथील शेतकऱ्यांनी एकत्र येत तलाठी, मंडळ अधिकारी आणि तहसीलदार यांना निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे की, तात्काळ राजुरा शिवारात कृषी सहाय्यक आणि तलाठी यांनी संयुक्त पाहणी करून पंचनामे करावेत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीकविमा आणि शासकीय मदत तात्काळ जाहीर करावी. पंचनामे करताना कोणत्याही शेतकऱ्याला न वगळता सरसकट पंचनामे करण्यात यावे जर लवकर पंचनामे झाले नाहीत तर आम्हाला तहसील कार्यालयासमोर आंदोलन करावे लागेल' असा इशारा देखील शेतकऱ्यांनी दिला आहे. यावेळी मनोज मोहळे, ॲड नरेंद्र अढाव,शिवाजी सोनोने, शिवाजी खराटे,प्रतीक राजुरकर,नागेश गावंडे,अनीस पठाण, वसंता गोरे,माणीक अकोटकर,वाजीदखॉ पठाण, एकनाथ टोंचर, नारायण ढोबळे, नामदेव टोंचर, गोकुल पुरूषोत्तम, गंगाधर भगत, धम्मपाल इंगळे,उध्दव वानखेडे, गजानन गायकवाड, बळीराम सानप, गणेश काळे, सोपान मोहळे, नामदेव घुगे, सुनील आढाव, आकाश आढाव, इद्रीसखा पठाण, महादेव टोंचर यांच्या सह शेकडो शेतकरी उपस्थित होते

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २९२ ■ शुक्रवार, १८ सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# राज्याला निसर्गसंपन्न बनविण्यासाठी सामुदायिक वृक्षलागवडीची गरज - पालकमंत्री डॉ.पंकज भोयर

## ३०० कोटी वृक्ष लागवड, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा सन्मान

**वर्धा जनमाध्यम :** विकसित भारताचे उद्दिष्ट गाठत असतांना पर्यावरणाचा समतोल, वृक्षलागवड व संवर्धन देखील तितकेच महत्वाचे आहे. वृक्षलागवडीसाठी जास्तीत जास्त नोंदणी करून यास लोकचळवळ बनवावे आणि सामूहिक प्रयत्नातून राज्याला हिरवेगार, निसर्गसंपन्न बनविण्यासाठी हातभार लावावा, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले.

विकास भवन येथे वन विभागाच्यावतीने ३०० कोटी वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या संस्था, स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, उपवनसंरक्षक हरविर सिंह, विभागीय वनअधिकारी सुहास बढेकर, बोर व्याघ्र प्रकल्पाचे उपसंचालक मंगेश ठेंगडी, ?क्सिस बँकेचे विभागीय व्यवस्थापक राजू पवार आदी उपस्थित होते.

पिण्याचे पाणी विकत घेऊन प्यावे लागेल असा कुणी विचारही केला नसेल. परंतू आता पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. कोरोना काळात ऑक्सिजन विकत घेण्याची वेळ आली होती. कृत्रिम ऑक्सिजन घेण्याची वेळ येऊ नये यासाठी पर्यावरणाचा ऱ्हास कमी करणे आवश्यक असून मोठ्या प्रमाणात वृक्षरोपण करण्याची गरज आहे.



राज्य शासनाने २०४७ पर्यंत विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी ३०० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम हाती घेतला आहे. सामाजिक कार्यामध्ये जिल्ह्यातील अनेक संस्थांचे नाव राज्यात घेतले जाते. अशा संस्थांनी वृक्षारोपणासाठी चळवळ निर्माण करुन सामाजिक कार्यात योगदान द्यावे. यासाठी संस्थांना शासनाच्यावतीने काही मदत लागल्यास देण्यात येईल, असे पुढे बोलतांना पालकमंत्री डॉ.पंकज भोयर म्हणाले. यावर्षी देशात सर्वाधिक तापमानाची नोंद वर्ध्यात झाली. हे तापमान कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करुन वसुंधरेचे संरक्षण करण्याची गरज आहे. वृक्ष हा जात, पंथ, समाज न पाहता प्राणवायु देत असतो. त्याचे संवर्धन करणे आपल्या सर्वाची जबाबदारी आहे, असे सुधीर पांगुळ म्हणाले.

प्रास्ताविकात सुहास बढेकर यांनी यावर्षी विविध योजनेतून एकुण २२ रोपवन स्थळावर १३६.८५ हेक्टर क्षेत्रावर २.०६ लक्ष रोपे लागवड करण्याचे उद्दिष्ट आहे. त्याचबरोबर सामाजिक वनीकरण विभागामार्फत २.३५ लक्ष वृक्ष लागवड करण्यात आली असून ३०० कोटी वृक्ष लागवड अंतर्गत जिल्ह्यातील इतर यंत्रणांनी आजपर्यंत ६.७० लक्ष वृक्ष लागवड केली असल्याचे सांगितले.

यावेळी पालकमंत्री डॉ.भोयर यांच्याहस्ते निसर्ग सेवा समिती, वैद्यकीय जनजागृती मंच, वृक्ष सेवा समिती, ग्रामपंचायत पडेगाव, यशवंत विद्यालय वायफड, ग्रामपंचायत सारवाडी, नवोदय विद्यालय सेलूकाटे, एएमटीएस कॉन्वेन्ट मसाळा, वृक्षमित्र परिवार, आशिष भोयर, प्रहार समाज जागृती संस्था, वृक्षवल्ली आम्हा सोयरे संस्था, हरीत क्रांती ग्रुप, रोटरी क्लब वर्धा व बोर व्याघ्र प्रकल्पात वन्यजीवांना पाणी पुरवठ्यासाठी ट्रॅक्टर उपलब्ध करुन दिल्याबद्दल ?क्सिस बॅकेच्या व्यवस्थापकाचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला वृक्ष लागवड संस्थांचे अध्यक्ष, सचिव, प्रतिनिधी, वन्यप्रेमी, वृक्षप्रेमी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हक्कांवर गदा, बांधकाम कामगार रस्त्यावर; २८ सप्टेंबरला आक्रोश मोर्चा

## १३ जुलैच्या शासन निर्णयासह १५ मागण्यांसाठी स्वाभिमानी बांधकाम कामगार संघटना आक्रमक

**वर्धा जनमाध्यम :** नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासन आणि प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्वाभिमानी बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने २८ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. सकाळी ११ वाजता शिवाजी चौकातून मोर्चाला सुरुवात होणार असून जिल्ह्यातील मोठ्या संख्येने बांधकाम कामगार सहभागी होणार आहेत.

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष उमेश अग्निहोत्री यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात येणार आहे. १३ जुलैच्या शासन निर्णयामुळे कामगारांच्या पाल्यांसाठीच्या काही शैक्षणिक योजना बंद झाल्याचा संघटनेचा आरोप आहे. इयत्ता १ ते ९ तसेच बारावी ते पदवीपर्यंतची शैक्षणिक मदत पूर्ववत सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

गंभीर आजाराच्या उपचारासाठी मिळणारे एक लाख रुपयांचे अर्थसहाय्य पूर्ववत करावे. कामगाराच्या मृत्यूनंतर आर्थिक




मदतीसाठी असलेली तीन वर्षांच्या नूतनीकरणाची अट रद्द करावी. प्रसूती अनुदान तसेच कामगाराच्या स्वतःच्या विवाहासाठी ३० हजार आणि मुलीच्या विवाहासाठी ५१ हजार रुपयांचे अनुदान पूर्ववत सुरू करावे, अशा मागण्या आहेत.

नोंदणी आणि नूतनीकरणाचे प्रलंबित अर्ज निश्चित कालमर्यादेत निकाली काढावेत. ग्रामसेवकांकडून आवश्यक प्रमाणपत्रांची प्रक्रिया सुलभ करावी. वस्तू स्वरूपातील लाभाऐवजी रक्कम थेट बँक खात्यात जमा करावी. सुविधा केंद्रांवरील कथित अतिरिक्त वसुली थांबवावी आणि स्वतंत्र जिल्हा कार्यालय सुरू करावे, अशीही मागणी आहे.

कामगारांच्या पाल्यांसाठी क्रीडा कौशल्य योजना सुरू करावी तसेच २०२२ पासून रखडलेल्या आरोग्य तपासणीची चौकशी करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. विजय आष्टणकर, दिनेश धुर्वे, अतुल रेवस्कर, लीला बोभाटे, पुष्पा कराळे, आशा लाकडे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी कामगारांनी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.



## नमो दिव्यांनी उजळले वर्धा स्टेशन परिसर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त वर्धा स्टेशन परिसरात 'आशीर्वाद नमो दिवे' लावून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, जिल्हाध्यक्ष संजय गाते, नगरपरिषद उपाध्यक्ष प्रदीपसिंग ठाकूर, नगरसेविका राखी पांडे, वीरू पांडे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**-फोटो राहुल तेलरांधे वर्धा**

# लाकडाच्या ट्रकला पेटवले, वन पथकाला धमकी देत तस्करांचा धुडगूस

## परवाना नसल्याने कारवाई सुरू होताच संताप

### शासकीय कामात अडथळा; सात जणांवर गुन्हा

**आष्टी शहीद जनमाध्यम :** तळेगाव परिसरातून अवैधरित्या वृक्षतोड करून लाकडाची वाहतूक करणाऱ्या संशयितांनी वन विभागाच्या पथकावरच दबाव आणत लाकूड भरलेला ट्रक पेटवून दिल्याची धक्कादायक घटना १६ रोजी घडली. या प्रकारामुळे वन विभागाच्या कारवाईलाच आव्हान दिल्याची चर्चा असून परिसरात खळबळ उडाली आहे.



वर्धमनेरी परिसरातील नायरा पेट्रोल पंपापासून सुमारे १०० मीटर अंतरावर कालव्याच्या रस्त्याने तळेगावकडून आर्वीकडे लाकूड घेऊन जाणारा एमएच ०४ यूएल ७९५२ क्रमांकाचा ट्रक वन विभागाच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे अडविला. तपासणीत ट्रकमध्ये विविध प्रजातींचे लाकूड आढळले. लाकूड वाहतुकीचा परवाना मागितल्यानंतर आवश्यक कागदपत्रे नसल्याचे समोर आले. त्यामुळे वन विभागाने ट्रक ताब्यात घेत कायदेशीर कारवाई सुरू केली.

याचवेळी काही व्यक्तींनी वन अधिकाऱ्यांशी हुज्जत घालत शिवीगाळ केली आणि शासकीय कामात अडथळा निर्माण केला. त्यानंतर ट्रक तळेगावच्या दिशेने नेत असताना तो अडवून त्यावर पेट्रोल टाकून आग लावण्यात आली. वन कर्मचाऱ्यांनी प्रयत्न करून आग आटोक्यात आणली.

तळेगावचे वनपरिक्षेत्र अधिकारी अजय लोंबाडे यांच्या तक्रारीवरून सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गावठी दारूची तस्करी करणाऱ्यावर कारवाई

## कारसह ३.१५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** गावठी दारूची तस्करी करणाऱ्या व्यक्तीवर सावंगी मेघे पोलिसांनी कारवाई करत कारसह ३ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई नितीन किचन हॉटेलजवळ नाकाबंदी करून करण्यात आली.



शांतीनगर येथील संदीप श्रावण भगत वय ४४ हा एमएच ४३ आर ३६९२ क्रमांकाच्या कारमधून पांढरकवडा पारधी बेड्यावरून गावठी दारू घेऊन येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी नितीन किचन हॉटेलजवळ नाकाबंदी केली. संशयित कार थांबवून झडती घेतली असता त्यामध्ये ५० लिटर गावठी दारू आढळून आली.

पोलिसांनी संदीप भगत याला ताब्यात घेत कार व गावठी दारू जप्त केली. याप्रकरणी पुढील कारवाई सुरू आहे. ही कारवाई ठाणेदार विनोद गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली संजय पंचभाई केतन बावनेर श्याम सलामे गौरव नरताम आदींनी केली.

# एटीएम कार्ड बदलले अन् खात्यातून ४८ हजार उडवले

## उत्तर प्रदेशातील आरोपीला सेवाग्राम रेल्वेस्थानक परिसरातून अटक

**वर्धा जनमाध्यम :** एटीएम केंद्रात ग्राहकाची दिशाभूल करून हातचलाखीने एटीएम कार्डची अदलाबदल करीत खात्यातून ४८ हजार रुपये लंपास करणाऱ्या उत्तर प्रदेशातील आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी बेड्या ठोकल्या. जमशेद अली शौकत अली वय ४५ रा. जामा मशीदजवळ बाबरी जि. शामली असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून रोख रक्कम दुचाकी हेल्मेट तसेच विविध बँकांची एटीएम कार्ड असा सुमारे १ लाख ९९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



अमरावती येथील माधुरी अंबादास गवई या २ ऑगस्ट रोजी वर्धा रेल्वेस्थानकाजवळील एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेल्या होत्या. त्यांनी दोन हजार रुपये काढण्याचा प्रयत्न केला असता दोन अनोळखी व्यक्तींनी व्यवहार पूर्ण झाला नसल्याचे सांगून त्यांची दिशाभूल केली. त्यानंतर हातचलाखीने त्यांचे एटीएम कार्ड काढून त्याऐवजी स्वतःजवळील कार्ड त्यांना देण्यात आले.

यानंतर आरोपींनी गवई यांच्या बँक खात्यातून पाच व्यवहार करीत ४८ हजार रुपये काढले. याप्रकरणी वर्धा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सेवाग्राम रेल्वेस्थानक परिसरातून जमशेद अली याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने साथीदारासह गुन्हा केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. पुढील कारवाईसाठी आरोपीला वर्धा शहर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

# जिल्हा परिषदेत जिल्हाधिकारी वान्मथी सी, सीईओं पराग सोमण यांच्या उपस्थितीत मानवी रांगोळी

## जिल्ह्यात सेवा संकल्प अभियानास सुरुवात

**वर्धा जनमाध्यम :** सर्वसामान्य नागरिकांपर्यंत शासकीय योजना व सेवा प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी जिल्ह्यात १७ ऑक्टोबरपर्यंत सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात आज एकाच दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन करून अभियानास सुरुवात झाली. जिल्हा परिषदेच्या प्रांगणात जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्या उपस्थितीत तिरंगा ध्वजाची मानवी रांगोळी साकारण्यात आली.

यावेळी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, परिविक्षाधिन आयएएस अधिकारी शोभिका पाठक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक



वैशाली रसाळ, जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वरकड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल भोसले, डॉ.ज्ञानदा फणसे, मनिषा कुरसंगे, कार्यकारी अभियंता शुभम गुंडतवार, समाजकल्याण अधिकारी प्रतिभा भागवतकर यांच्यासह जिल्हा परिषदेचे अधिकारी, कर्मचारी तसेच सुशील हिंमतसिंहका विद्यालयाचे विद्यालयाचे वर्ग ७ वीचे विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते.

शिक्षण विभागाने आज जिल्हाभर जनकल्याणकारी योजना, राष्ट्रीय प्रतिके, विकसित भारताची संकल्पना या विषयांवर शाळांमध्ये चित्रकला रांगोळी काढण्याचा उपक्रम राबविण्यात आला. समाजकल्याण विद्यार्थी वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी मानवी साखळीद्वारे अशोक चक्र रेखाटले. सेलू येथे तहसिलदार डॉ.शकुंतला पाराजे यांच्या उपस्थितीत मतदार जनजागृती शिबिर घेण्यात आले.

क्रीडा विभागाच्यावतीने शालेय बुद्धीबळ स्पर्धा घेण्यात आली. आंजी येथे 'स्वच्छता ही सेवा' हा उपक्रम राबविण्यात आला. पोलिस विभागाच्यावतीने न्यू आर्ट्स कॉलेज येथे पोलिस निरिक्षक चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत सायबर जनजागृती कार्यशाळा घेण्यात आली. आदिवासी विकास विभागाच्यावतीने विभागाच्या योजनांचा जनजागृती रथ जिल्ह्यात फिरवून त्याद्वारे योजनांची जनजागृती करण्यात आली. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्यावतीने स्वच्छता ही सेवा या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.



## आज गौरी पूजन

रुईकर परिवाराच्या घरी पाच पिढ्यांपासून गौरी पूजन भक्तिभावाने पूजा करण्याची परंपरा जपली जात आहे. शारदानगर, श्रीनिवास कॉलनी, वर्धा येथे धार्मिक श्रद्धेसोबत सामाजिक एकोपा आणि संस्कारांची परंपरा आजही कायम आहे.

# वाघाच्या दब्यात शेतकरी, थोडक्यात बचावला जीव

## हिंगणी सोनेगाव शिवारात थरार, कपाशीच्या शेतातून झेप घेण्याच्या तयारीत असलेल्या वाघापासून प्रसंगावधानाने बचाव

**सेलू जनमाध्यम :** रायपूर जंगली येथील वाघाच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच बोर व्याघ्र प्रकल्पाच्या लगतच्या हिंगणी सोनेगाव शिवारात पुन्हा एकदा वाघाने शेतकऱ्याचा जीव घेण्याचा प्रयत्न केल्याची थरारक घटना गुरुवारी सकाळी घडली. कपाशीच्या शेतात दबा धरून बसलेल्या पट्टेदार वाघाने अंगावर झेप घेण्याची तयारी केली. मात्र शेतकरी शेख हबीब यांच्या प्रसंगावधानामुळे त्यांचा जीव थोडक्यात बचावला.

शेख हबीब हे नेहमीप्रमाणे सकाळी शेतातील मशागतीची कामे करण्यासाठी गेले होते. काम आटोपून सकाळी सुमारे दहा वाजता हिंगणीकडे परतण्याच्या तयारीत असताना कपाशीच्या पिकात काही अंतरावर दबा धरून बसलेला पट्टेदार वाघ त्यांच्या नजरेस पडला. वाघाची हालचाल लक्षात येताच त्यांनी क्षणाचाही विलंब न करता वाहनाकडे धाव घेतली आणि तेथून सुरक्षित अंतर गाठले.



हबीब यांनी आरडाओरड केल्याने परिसरातील शेतकरी घटनास्थळी धावून आले. वाढता जमाव आणि आरडाओरड यामुळे वाघाने शेतालगतच्या नाल्याकडे धूम ठोकली. काही क्षणांचा हा थरार संपला असला तरी शेतकऱ्यांच्या मनातील भीती मात्र कायम आहे.

रायपूर जंगली येथील दुर्घटनेनंतर काही दिवसांतच हिंगणी परिसरात वाघाचा हा प्रकार घडल्याने वन विभागाच्या उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. शेतात काम करायचे तरी कसे असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. हिंगणी आणि सोनेगाव शिवारात वन विभागाने तातडीने गस्त वाढवावी. वाघाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात आणि नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

मोठा अनर्थ घडल्यानंतर जागे होण्यापेक्षा वन विभागाने आताच ठोस पावले उचलावीत असा संतप्त सूर ग्रामस्थांमधून उमटत आहे.

# नीलगायीच्या धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

## शिरसगाव-वडनेर मार्गावरील अपघातात एक जखमी; नीलगायीचाही मृत्यू

**वडनेर जनमाध्यम :** शिरसगाव ते वडनेर मार्गावर दुचाकी आणि नीलगायीची जोरदार धडक होऊन झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य एक जण जखमी झाला. ही घटना बुधवारी सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास घडली. निलेश रामाजी अड्रस्कर वय ४२ रा. वडकी ता. राळेगाव जि. यवतमाळ असे मृताचे नाव आहे. विजय आत्राम हे जखमी झाले असून त्यांच्यावर वडनेर ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, निलेश अड्रस्कर आणि विजय आत्राम हे दोघे दुचाकीने शिरसगावकडून वडकी गावाकडे जात होते. शिरसगाव-वडनेर मार्गावर अचानक नीलगाय दुचाकीसमोर आली. दुचाकीची नीलगायीला जोरदार धडक झाल्याने दोघेही रस्त्यावर फेकले गेले. या अपघातात निलेश अड्रस्कर यांचा जागीच मृत्यू झाला. विजय आत्राम जखमी झाले. धडकेत नीलगायीचाही मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे कर्मचारी सोयाम यांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. मृत निलेश अड्रस्कर यांच्या कुटुंबीयांनी वनविभाग आणि शासनाकडे आर्थिक मदतीची मागणी केली आहे. घटनेचा पुढील तपास वडनेर पोलिसांकडून सुरू आहे.

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर M0890337 वरील माझे **PURVA BABHULKAR BABHULKAR** असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वरील **PURVA ULHAS BABHULKAR** नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ताः आंबेडकर वॉर्ड समुद्रपूर जिल्हा वर्धा ४४२३०५**

**अपर जिल्हा दंडाधिकारी चंद्रपूर, यांचे कार्यालय**

ई-मेल : chandrapur.rdc@gmail.com दूरध्वनी क्रमांक - ०७१७२-२५०६५९
वर्ग क्र. एमआरसी-८१/प्रकरण क्र. ५८३/२०२६ मौजा. केळझर ता. मुल. जि. चंद्रपूर

**नोटीस**

प्रति,
**अर्जदार** – महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादीत,
कार्यकारी अभियंता यांच्यामार्फत
अतिउच्चदाब (EHV) प्रकल्प विभाग, एम. एस. ई. टी. सी. एल.
६६ के.व्ही. उपकेंद्राच्या मागे, बंगाली कॅम्प, मुल रोड, चंद्रपूर ता.जि. चंद्रपूर

**विरुद्ध**

**गैरअर्जदार** :- १. कैलास प्रभाकर घडसे
२. किशोर प्रभाकर घडसे
३. अल्का प्रभाकर घडसे
४. छाया प्रभाकर घडसे (मयत) – त्यांचे अज्ञात वारसांमार्फत
५. दारमबाबाई प्रभाकर घडसे

**कलम १६(१) इंडियन टेलीग्राफ ॲक्ट, १८८५ अन्वये**

**गैरअर्जदार क्र. ४ छाया प्रभाकर घडसे या मयत झालेल्या असून त्यांचे कायदेशीर वारस कोण आहेत हे माहित नसल्याने / सापडत नसल्याने त्यांना नोटीस पेपर पब्लिकेशनद्वारे बजावणे आवश्यक आहे.**

यातील अर्जदार व गैरअर्जदार यांना कळविण्यात येते की, सदर प्रकरणाची सुनावणी दिनांक २४.०९.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता ठेवण्यात आलेली असून, सदर दिवशी अपर जिल्हा दंडाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे आपले लेखी स्पष्टीकरणासह हजर राहावे. गैरहजर राहिल्यास या संबंधाने आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरून एकतर्फी कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वा./-
अपर जिल्हा दंडाधिकारी
चंद्रपूर

स्थळ : चंद्रपूर
दिनांक : १६.०९.२०२६




जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
✦ शुक्रवार १८ सप्टेंबर २०२६




# एन.चंद्रशेखरन यांची फेरनियुक्ती बेकायदेशीर

## टाटा ट्रस्ट्सचा विरोध, नोएल टाटांचे विरोधात मतदान

**मुंबई/प्रतिनिधी :** टाटा सन्समध्ये ६६ टक्के हिस्सा असलेल्या टाटा ट्रस्ट्सने एन. चंद्रशेखरन यांची टाटा सन्सच्या अध्यक्षपदी पुन्हा नियुक्ती करण्याच्या प्रस्तावाला विरोध केला आहे. कंपनीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत हा प्रस्ताव मांडण्यात आला होता. यावेळी चंद्रशेखरन यांच्या फेरनियुक्तीच्या प्रस्तावाच्या बाजूने टाटा सन्सच्या चार संचालकांनी मतदान केले. तर टाटा ट्रस्ट्सचे संचालक नोएल टाटा यांनी प्रस्तावाच्या विरोधात मतदान केले.

टाटा सन्सच्या आर्टिकल्स ऑफ असोसिएशनमधील नियमांनुसार हा प्रस्ताव कायदेशीरदृष्ट्या वैध नसल्याचे टाटा ट्रस्ट्सने म्हटले आहे. टाटा सन्सच्या नियमांनुसार अध्यक्षाची नियुक्ती करण्यासाठी ट्रस्टच्या दोन्ही नामनिर्देशित संचालकांनी प्रस्तावाच्या बाजूने मतदान करणे आवश्यक आहे. हा नियम नवीन अध्यक्षाची नियुक्ती असो किंवा विद्यमान अध्यक्षाची फेरनियुक्ती असो, दोन्ही परिस्थितीत लागू होतो, असे टाटा ट्रस्ट्सने म्हटले आहे.



ट्रस्टचे दोन्ही नामनिर्देशित संचालक उपस्थित नसतील तर अध्यक्षाच्या नियुक्ती किंवा फेरनियुक्तीबाबत संचालक मंडळाची बैठक घेता येत नाही. तसेच दोन्ही संचालकांनी प्रस्तावाच्या बाजूने मतदान केल्याशिवाय असा प्रस्ताव मंजूरही करता येत नाही, असेही टाटा ट्रस्ट्सने म्हटले आहे. दरम्यान, वेंकटरामन वेनू श्रीनिवासन आणि नोएल टाटा हे टाटा ट्रस्ट्सचे टाटा सन्सच्या संचालक मंडळावरील नामनिर्देशित संचालक आहेत.

नोएल टाटा यांनी चंद्रशेखरन यांच्या फेरनियुक्तीच्या प्रस्तावाला विरोध केल्यामुळे हा प्रस्ताव कायदेशीरदृष्ट्या रद्द ठरतो आणि त्याला कोणताही कायदेशीर आधार नाही, असे टाटा ट्रस्ट्सने म्हटले आहे. चंद्रशेखरन यांनी त्यांचा कार्यकाळ २० फेब्रुवारी २०२७ रोजी संपल्यानंतर पुन्हा अध्यक्षपदासाठी अर्ज न करण्याचा निर्णय घेतला, हा निर्णय त्यांनी स्वतः घेतला असून तो टाटा ट्रस्ट्सने स्वीकारला आहे. हा निर्णय आता अंतिम असल्याचेही ट्रस्ट्सने स्पष्ट केले.

# न्यायालयात ६६ लाख प्रकरणे रखडून

**नवी दिल्ली :** उच्च न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या खटल्यांची संख्या ६६ लाखांचा टप्पा ओलांडणार असून, न्यायासाठी दीर्घकाळ प्रतीक्षा करणा-या याचिकाकर्त्यांना आता थेट सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावावे लागत आहेत. मात्र, संबंधित उच्च न्यायालयांना



प्रकरणांची लवकर सुनावणी घेण्याचे निर्देश देण्याऐवजी सर्वोच्च न्यायालयाकडून याचिकाकर्त्यांना लवकर सुनावणीसाठी अर्ज करण्याची मुभा दिली जात आहे. उच्च न्यायालयांमध्ये सुमारे १५ लाख प्रकरणे दशकाहून अधिक काळ प्रलंबित आहेत.राजस्थानमधील जालोर जिल्ह्यातील एका आरोग्य कर्मचा-याचे प्रकरण याचे उदाहरण ठरले आहे. या कर्मचा-याची १९९९ मध्ये सेवा समाप्त करण्यात आली होती. जोधपूर कामगार न्यायालयाच्या निर्णयावर नाराज होउन त्याने २००४ मध्ये राजस्थान उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. मात्र, तब्बल २२ वर्षे उलटूनही या याचिकेवर सुनावणी झालेली नाही. या प्रकरणात लवकर सुनावणी घेण्याची मागणी करणारी याचिका या आरोग्य कर्मचा-याने बुधवारी सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर केली.

उच्च न्यायालयांना घटनात्मकदृष्ट्या स्वतंत्र दर्जा असल्याने आणि प्रत्येक न्यायाधीशासमोरील दररोजच्या मोठ्या संख्येने असलेल्या प्रकरणांचा विचार करता, सरन्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने नेहमीचा आदेश देत याचिका स्वीकारण्यास नकार दिला. मात्र, संबंधित याचिकेच्या लवकर सुनावणीसाठी अर्ज करण्याची मुभा याचिकाकर्त्याला देण्यात आली. उच्च न्यायालयांमधील प्रलंबित प्रकरणांमध्ये अलाहाबाद उच्च न्यायालय आणि राजस्थान उच्च न्यायालय आघाडीवर आहेत.

**मुंबई उच्च न्यायालयात ६.४ लाख प्रकरणे-** अलाहाबाद आणि राजस्थान उच्च न्यायालयांनंतर मुंबई उच्च न्यायालयात सुमारे ६.४ लाख प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यानंतर मद्रास उच्च न्यायालयात ५.६ लाख, मध्य प्रदेश उच्च न्यायालयात ४.९ लाख, कर्नाटक उच्च न्यायालयात ३.३ लाख, तर आंध्र प्रदेश उच्च न्यायालयात २.५ लाख प्रकरणे प्रलंबित आहेत. याच्या तुलनेत दिल्ली आणि कलकत्ता उच्च न्यायालयांतील प्रलंबित प्रकरणांची संख्या तुलनेने कमी आहे.

# राज्य मंडळातर्फे दहावी, बारावीच्या परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) इयत्ता दहावी, बारावीच्या फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये होणा-या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार बारावीची लेखी परीक्षा ८ फेब्रुवारी ते १६ मार्च या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा १५ फेब्रुवारी ते ११ मार्च या कालावाधीत घेतली जाणार आहे. राज्य मंडळाचे सचिव डा दीपक माळी यांनी या बाबत परिपत्रकाद्वारे माहिती दिली. राज्य मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या विभागीय मंडळांमार्फत या परीक्षा घेतल्या जातात.? विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना अध्ययन-अध्यापनाचे योग्य नियोजन करता यावे, तसेच विद्यार्थ्यांवरील परीक्षेचा ताण कमी व्हावा, या उद्देशाने राज्य मंडळाने लेखी, प्रात्यक्षिक परीक्षांच्या या संभाव्य तारखा जाहीर केल्या आहेत. राज्य मंडळाच्या वेळापत्रकानुसार इयत्ता बारावीचे प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन २० जानेवारी ते ६ फेब्रुवारी या कालावधीत होणार आहे. तर लेखी परीक्षा ८ फेब्रुवारी ते १६ मार्च या कालावधीत घेतली जाणार आहे. इयत्ता दहावीची प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन २८ जानेवारी ते १३ फेब्रुवारी या कालावधीत, तर लेखी परीक्षा १५ फेब्रुवारी ते ११ मार्च या कालावधीत होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. दहावी, बारावीचे विषयनिहाय वेळापत्रक राज्य मंडळाच्या संकेतस्थळावर जाहीर केले जाणार आहे, असे डॉ. माळी यांनी नमूद केले.




# लालबागच्या दर्शन रांगेत चोरांचा सुळसुळाट

**मुंबई / प्रतिनिधी-** गणेशोत्सवानिमित्त लालबागच्या राजासह इतर मंडळांमध्ये भक्तांची प्रचंड गर्दी होत असल्याचा फायदा चोरटे घेत आहेत. १४ सप्टेंबर रोजी लालबाग परिसरातील दर्शनाच्या रांगेत चोरट्यांनी भाविकांना लक्ष्य करत सोन्याचे दागिने, मोबाईल फोन आणि रोख रक्कम लांबवल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. याप्रकरणी पोलिसांनी मध्य प्रदेशातील दोन जणांना बेड्या ठोकल्या असून भाविकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. दरम्यान, १४ सप्टेंबर रोजी दुपारी १:३० च्या सुमारास मालाड येथे सुरक्षारक्षक म्हणून काम करणारे मायकल बब्लू नाडर (वय, २८) दर्शनाच्या रांगेत उभे होते. त्यावेळी चोरट्यांनी त्यांच्या खिशातील २५,००० रुपयांचा मोबाईल आणि २,३०० रुपयांची रोख रक्कमेची चोरी केली. चोरी झाल्याचे लक्षात येताच नाडर यांनी आरडाओरडा केला. पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या दोन्ही संशयितांना भाविकांनी पाठलाग करून पकडले आणि चांगलाच चोप दिला. दरम्यान, साध्या वेशात गस्त घालणा-या कालाचौकी पोलिसांच्या पथकाने मध्यस्थी करत दोन्ही संशयितांना ताब्यात घेतले. आरिफ सॅमसनसिंग गुर्जर (वय, २४) आणि सोमनाथ समनसिंग राठोड (वय, २३) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.



# सोने-चांदीच्या दरात घसरण

**वाशिंग्टन :** अमेरिकेच्या फेडरल बँकेने व्याजदरात ०.२५ बेसिक प्वाईंटची वाढ केली आहे. या निर्णयाचा परिणाम वायदे बाजारात सोनेचांदीच्या किमतीवर झाला आहे. या निर्णयामुळे सोने चांदीच्या किमतीत मोठी घसरण झाली आहे. सोने आणि चांदीच्या दरात गुरुवारी अचानक मोठी घसरण झाली. चांदीच्या दरात



 ४५०० पेक्षा जास्त घसरण झाली, ज्यामुळे ती उच्चांकापेक्षा जवळपास १.९० लाख स्वस्त झाली. तर सोने २००० रुपयांनी स्वस्त झाले आहे. गुरुवारी वायदे बाजार उघडताच सोने आणि चांदीच्या दरात अचानक मोठी घसरण झाली. मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर वायदे व्यवहार सुरू होताच, दोन्ही मौल्यवान धातूंच्या किमती कोसळल्या. बुधवारच्या बंद भावाच्या तुलनेत १ किलो चांदीचा भाव २.३२ लाखांपर्यंत घसरला. या लक्षणीय घसरणीमुळे, चांदीचा भाव आता त्याच्या आतापर्यंतच्या उच्चांकी भावापेक्षा प्रति किलो अंदाजे १.९० लाखांनी कमी झाला आहे. सोन्याच्या किमतीदेखील जवळपास २,००० ने घसरल्या. ४ डिसेंबर रोजी मुदत संपणा-या चांदीच्या किमती प्रति किलो २,३०,२२१ पर्यंत कोसळल्या. आदल्या दिवशी, बुधवारी, या मौल्यवान धातूचा भाव २,३४,७८६ वर बंद झाला होता. परिणामी, चांदीच्या दरात एकाच झटक्यात ४,५६५ (अंदाजे ४,५६५) ची घसरण झाली. चांदीच्या दरात झालेल्या या लक्षणीय घसरणीनंतर, ती तिच्या आतापर्यंतच्या उच्चांकावरून आणखी खाली कोसळली आहे. या वर्षी जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात, चांदीच्या दरांनी इतिहासात प्रथमच ४ लाख प्रति किलोचा ऐतिहासिक टप्पा ओलांडून ४२०,०४८ प्रति किलोचा उच्चांक गाठला होता. चांदी आता या उच्चांकावरून १८९,८२७ प्रति किलो इतक्या स्वस्तात उपलब्ध आहे. चांदीप्रमाणेच एमसीएक्सवर सोनेही स्वस्त झाले आहे. ५ ऑक्टोबर रोजी मुदत संपणा-या २४ कॅरेट सोन्याच्या १० ग्रॅमचा भाव आदल्या दिवशी १,५२,४७० रुपयांवर बंद झाला होता, पण तो घसरून गुरुवारच्या सुरुवातीला भाव १,५०,४८३ होता. याचा अर्थ सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम १,९८७ रुपयांनी घसरला आहे.

# वीज कोसळून दोघांचा मृत्यू

**चंद्रपूर :** जिल्ह्यात गुरुवारी (ता. १७) दुपारी झालेल्या वादळी पावसादरम्यान वीज कोसळून दोघांचा मृत्यू झाला, तर नउ जण जखमी झाले. पोंभुर्णा तालुक्यात शेतक?याचा, तर मूल तालुक्यात गुराख्याचा मृत्यू झाला. ब्रह्मपुरी तालुक्यातील बरडकीन्ही येथे मिरचीच्या शेतात वीज कोसळून आठ जण जखमी झाले. पोंभुर्णा तालुक्यातील चेकठाणेवासना येथे शेतातून पत्नीसमवेत घरी परतत असताना वीज कोसळून केशव डोनु गुडी (५५) यांचा मृत्यू झाला. पत्नी वैशाली गुडी (४५) गंभीर जखमी झाल्या. त्यांना पोंभुर्णा ग्रामीण रुग्णालयात दाखल करून प्रकृती चिंताजनक असल्याने चंद्रपूर जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. मूल तालुक्यातील उसराळा येथे शेळ्या चारण्यासाठी गेलेले गुराखी दीपक नारायण मडावी (३५) यांच्या अंगावर वीज कोसळल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. दुपारी दोनच्या सुमारास ही घटना घडली. ब्रम्हपुरी तालुक्यातील बरडकीन्ही गावाबाहेरील जनाबाई मारुती तलमले यांच्या शेतात मिरची लागवडीचे काम सुरू असताना वीज कोसळून आठ जण जखमी झाले. त्यात तलमले कुटुंबातील पाच जणांचा समावेश आहे. जखमींना आरमोरी येथील शासकीय उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मनीषा गोकुळदास ठाकरे (२२) यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना ब्रह्मपुरीतील खासगी रुग्णालयात हलविण्यात आले. उर्वरित सात जखमींवर उपचार सुरू आहेत.

# आकाशातून आता शत्रुवर तुटून पडणार श्वान पथक

**नवी दिल्ली :** जमिनीवरील अनेक आव्हानात्मक मोहिमा यशस्वीरीत्या पार पाडल्यानंतर आता भारतीय लष्कराचे श्वान सैनिक आकाशातून शत्रुवर झेप घेण्यासाठी सज्ज झाले आहेत. मध्य भारतातील बेहाट ड्रॉप झोनमध्ये एका पॅराटूपरने संपूर्ण युद्ध साहित्यासह डाग हँडलर आणि त्याच्या श्वानासह विमानातून यशस्वी टँडम पॅराशूट जंप पूर्ण केली. भारतीय सैन्याच्या इतिहासात डॉग हँडलर आणि श्वानाने एकत्रित केलेली ही पहिलीच अशा प्रकारची यशस्वी उडी मानली जात आहे. लष्कराच्या सेंट्रल कमांडने या कामगिरीचे कौतुक करताना, हा जवान आणि श्वानातील अतूट नाते, परस्पर विश्वास आणि लष्करी सज्जतेचा अनोखा पुरावा आहे असे नमूद केले.

# तात्काळ दुष्काळ जाहीर करा; ऊद्धव ठाकरेंचा आक्रमक पवित्रा

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी-** भाजप पुढच्या वेळी पुन्हा सत्ता पाहू शकणार नाही, असा मोठा दावा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला आहे. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून आज, गुरुवारी ( दि. १७) आयोजित तुमसे ना हो पाएगा कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी मराठवाड्यात तात्काळ दुष्काळ जाहीर करून शेतक-यांना थेट आर्थिक मदत देण्याची आग्रही मागणी केली, तसेच सत्ताधा-यांवर चौफेर टीकास्त्र डागले.१७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस आणि प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती असल्याचा उल्लेख करत ठाकरे म्हणाले, मराठवाड्यातील मोठमोठे होर्डिंग्ज पाहून सर्वकाही आलबेल असल्याचे भासवले जात आहे; पण प्रत्यक्षात मराठवाडा तीव्र दुष्काळाच्या छायेत आहे.



मुक्तिसंग्राम दिनाला उपस्थित न राहता स्वतःच स्वतःला पुरस्कार खरेदी करणारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गुजरात दौ-यावर गेले. येथील शेतक-यांच्या व्यथा आणि वेदना त्यांना कधीच कळणार नाहीत.

मराठवाड्यातील सत्ताधारी आमदारांवर तोफ डागत ठाकरे म्हणाले, मराठवाड्याच्या व्यथा पंतप्रधानांसमोर मांडण्याची हिंमत येथील एकाही लोकप्रतिनिधीत नाही. हैदराबाद मुक्तीसाठी सरदार वल्लभभाई पटेलांनी फौजा उतरवल्या होत्या. पश्चिम बंगालमध्ये निवडणूक जिंकण्यासाठी फौजा पाठवणा-या या सरकारमध्ये पाकव्याप्त काश्मीरमध्ये सैन्य घुसवण्याची हिंमत आहे का?

**५ ऑक्टोबरनंतर शिवसैनिक पीक पंचनामे तपासणार-** शेतक-यांच्या मदतीबाबत बोलताना ठाकरे यांनी शिवसैनिकांना थेट मैदानात उतरण्याचे आदेश दिले. राज्य सरकार ५ ऑक्टोबरपासून पीक नुकसानीचे पंचनामे सुरू करणार आहे. आपल्या शिवसैनिकांनी प्रत्येक गावात प्रत्यक्ष हजर राहून पंचनामे योग्य पद्धतीने होतात की नाही हे तपासावे. एकाही शेतक-याची फसवणूक होणार नाही आणि सर्वांना मदत मिळेल, याची खात्री करण्याचे आवाहन त्यांनी केले.

# विमा नसल्यास पेट्रोल-डिझेल मिळणार नाही

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सर्वोच्च न्यायालयाच्या विमा नाही, तर इंधन नाही या प्रस्तावाची अंमलबजावणी करण्यासाठी इन्शुरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट अथ?रिटी ऑफ इंडिया (आयआरडीएआय) लवकरच एका नव्या प्रणालीची चाचणी घेणार आहे. या अंतर्गत, ऑटोमेटेड नंबर प्लेट रिकग्निशन प्रणालीद्वारे वाहनांच्या नोंदणी क्रमांकांची पडताळणी इन्शुरन्स इन्फार्मेशन ब्युरो आणि वाहन पोर्टलवरील रेकार्डशी केली जाईल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

आयआरडीएआय देशातील काही निवडक शहरांमध्ये या प्रणालीची चाचणी घेणार असून अद्याप शहरांची नावे निश्चित झालेली नाहीत. या प्रस्तावित यंत्रणेमुळे भविष्यात पेट्रोल किंवा डिझेल पंपांवर वैध थर्ड-पार्टी मोटार विमा नसलेल्या वाहनांना इंधन देणे बंद करणे शक्य होईल. जर ही चाचणी यशस्वी ठरली, तर विम्याविना धावणारी लाखो वाहने अधिकृत विमा बाजाराच्या कक्षेत येण्याची शक्यता आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ४ ऑगस्ट रोजी दिलेल्या निकालात आयआरडीएआयला रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या सल्लामसलतीने वैध वाहन विम्याची स्थिती आणि इंधन पुरवठा यांचा संबंध जोडणारी प्रायोगिक व्यवस्था विकसित करण्याचे निर्देश दिले होते. या यंत्रणेत एएनपीआर कॅमे-यांच्या मदतीने विमा नसलेली किंवा नोंदणी नसलेली वाहने ओळखली जाउ शकतात. त्यानंतर संबंधित वाहनमालकाला अनिवार्य विमा काढण्यास प्रवृत्त केले जाउ शकते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिल्लीपासून या प्रकल्पाची सुरुवात करून त्यासाठीची रूपरेषा आणि कालमर्यादा सादर करण्यास सांगितले होते. वाहन क्रमांकावरून विम्याची स्थिती रिअल-टाइममध्ये तपासता यावी, अशी तंत्रज्ञान आणि डेटा प्रणाली तयार करणे हे आयआरडीएआयसमोरचे मुख्य आव्हान आहे. आयआयबीकडे विम्याची माहिती असते, तर वाहनकडे वाहनांची नोंदणी माहिती असते. एएनपीआर कॅमे-यांनी टिपलेला वाहन क्रमांक हा क?मन आयडेंटिफायर म्हणून वापरला जाईल. आयआरडीएआयने यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाला सांगितले होते की, महामार्ग, टोल नाके आणि शहरातील रस्त्यांवर बसवलेल्या एएनपीआर कॅमे-यांच्या माध्यमातून विमा नसलेली वाहने ओळखता येतील.

# पाटलाचे उपोषण स्थगित; मराठा आरक्षणासाठी सरकारला ३ महिन्यांची मुदत

**बीड / प्रतिनिधी-** मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणासाठी गेली २० दिवस उपोषणाला बसले होते. आज सरकारच्या शिष्टमंडळाशी झालेल्या चर्चेनंतर मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण स्थगित केले आहे. मात्र आंदोलन सुरु च राहणार आहे.मनोज जरांगे पाटील म्हणाले की, ५८ लाख नोंदी सरकार रद्द करणार नाही, हैदराबाद गॅझेटचा जीआर सुधारित करणार आहे. माझे काम मराठा समाजासाठी लढण्याचे आहे ते मी करत आहे. मी केवळ समाजासाठी लढू शकतो. ते काम करतो आहे. सरकारची मस्ती मोडणे गरजेचे होते ते आम्ही केले. सरकारला समाजापुढे वाकायला लावले, असे जरांगे यांनी म्हटले आहे. मनोज जरांगे पाटील यांची सरकारच्या शिष्टमंडळाने भेट घेतली यावेळी घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. सरकारच्या शिष्टमंडळात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, दादा भुसे, आमदार प्रसाद लाड आणि आमदार सुरेश धस यांचा समावेश होता.

यापुढे काही दगाफटका किंवा धोका



झाला, तर उपोषण करणार नाही; थेट मुंबईवर धडकणार, असा इशारा जरांगे पाटील यांनी या वेळी दिला. तसेच, मुंबईत जवळपास १ लाख तरुण गेले आहेत, त्यांनी आता गणपतीचे दर्शन घेउन माघारी यावे. सरकारला ३ महिन्यांचा वेळ दिला म्हणजे आंदोलन संपले असे होत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**यापुढे जरांगेंना आंदोलन करण्याची वेळ येणार नाही-** यापुढे मनोज जरांगे पाटील यांच्यावर पुन्हा आंदोलन करण्याची वेळ येणार नाही; देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे समाजाच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेत आहेत, असे वक्तव्य शिष्टमंडळाकडून करण्यात आले.

**मराठा समाजाशी खुन्नस ठेवणे योग्य नाही-** मनोज जरांगे पाटील म्हणाले की, ५८ लाख नोंदी कमी होणार नाहीत, याची सरकारने खात्री द्यावी. या नोंदी शोधण्यासाठी आम्ही स्वतः माणसे देतो. शिंदे समिती काम करत नाही आणि सरकारही याकडे लक्ष देत नाही. हे आंदोलन यशस्वी झाल्याशिवाय थांबणार नाही. आम्हाला आश्वासन दिले, तरी आंदोलन सुरूच राहणार आहे. मराठा समाजाशी खुन्नस ठेवणे योग्य नाही. राधाकृष्ण विखे पाटील चुकतात, तरी त्यांच्यावर प्रेम करा. एकनाथ शिंदेंवरही आपण प्रेम करू. जीआर काढून गॅझेटियरची अंमलबजावणी करावी. ५८ लाख नोंदींमधील एकही नोंद कमी व्हायला नको नोंदी कमी करणार नाही, याची लेखी हमी द्यावी, अशी मागणी मनोज जरांगेंनी केली.

**..तोपर्यंत थांबणार नाही**

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आंदोलन पूर्ण यशस्वी झाल्याशिवाय आपण थांबणार नाही, हे मी आधीच सांगितले होते. सरकार सातारा आणि कोल्हापूर गॅझेटसाठी वेळ मागत आहे. सरकार फसवणूक करत आहे असे वाटत असले, तरी त्यांना ३ महिने देउन ही शेवटची संधी देत आहोत. या ९० दिवसांत काही फरक पडणार नाही. ५८ लाख नोंदी कमी केल्या जाणार नाहीत, असे सरकारने स्पष्ट केले आहे.

**ओबीसी मंत्री प्रमाणपत्र देउ देत नाही**

मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले, सरकार ५८ लाख नोंदी कमी करणार नाही. हैदराबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्र वाटप करताना जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी तहसीलदारांना प्रत्यक्ष सोबत घेउन बसावे. काही ओबीसी मंत्री अधिका-यांना फोन करून प्रमाणपत्रे वाटप करू नका असे सांगत आहेत.

# वाघाच्या दहशतीत विद्यार्थ्यांची जंगलवाट

## अभिजित दिपकेंनी दिलेल्या भेटीत समोर आले धक्कादायक वास्तव

**गडचिरोली :** एका बाजूला दुर्गम आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासनाकडून विविध योजना आणि उपक्रम राबविले जात असल्याचे सांगितले जाते; तर दुसरीकडे एटापल्ली तालुक्यातील कोसालेंगा गावातील वास्तव या दाव्यांना छेद देणारे आहे. गावात शाळेची इमारत असूनही शिक्षक नसल्याने तीन विद्यार्थिनींना तब्बल दोन किलोमीटर अंतरावरील कोहका गावातील शाळेत जंगलातून पायी जावे लागत आहे. परिसरात



वाघाची दहशत असतानाही या विद्यार्थिनींची रोजची शिक्षणासाठीची पायपीट सुरू आहे.काक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी गडचिरोली दौ-यादरम्यान एटापल्ली तालुक्यातील अतिदुर्गम कोसा आलेंगा गावाला भेट दिली. यावेळी त्यांनी गावातील शाळेची पाहणी करून ग्रामस्थांशी चर्चा केली. गावातील शाळेची इमारत जीर्ण अवस्थेत असल्याचे दिसून आले. शिक्षक उपलब्ध नसल्याने गावातील तीन विद्यार्थिनींना दोन किलोमीटर अंतरावरील कोहका येथील शाळेत पाठविले जात असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.दिपके यांनी यावेळी या विद्यार्थिनींसोबत कोहका गावातील शाळेपर्यंत प्रवास करून तेथील परिस्थितीची पाहणी केली. कोसा आलेंगा येथील शाळा कोहका येथे भरविण्यात येत असल्याचा फलक तेथे लावण्यात आला आहे. मात्र, प्रत्यक्षात कोहका येथील शाळेतही शिक्षकांची कमतरता असल्याचे चित्र आहे. एका खोलीत पहिली ते चौथीचे वर्ग एकत्र भरविले जात असल्याचे यावेळी निदर्शनास आले.कोहका येथील शाळेत २७ विद्यार्थी असून त्यांच्यासाठी दोन शिक्षक असल्याची माहिती देण्यात आली. परिणामी, एकाच खोलीत विविध वर्गांचे अध्यापन करण्याची वेळ शिक्षकांवर आली आहे. कोसा आलेंगा येथील विद्यार्थ्यांसाठी तर परिस्थिती आणखी गंभीर आहे. शाळा गावात असतानाही शिक्षक नसल्याने त्यांना दोन किलोमीटर अंतरावरील शाळेपर्यंत जावे लागते. हा प्रवास जंगलातून होत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. वाघाच्या दहशतीतून ही मुले रोज शाळेत येतात. जंगलातून येताना सर्पदंश झाला किंवा एखाद्या हिंस्त्र प्राण्याने हल्ला केला तर त्याची जबाबदारी कोण घेणार? असा सवाल दिपके यांनी उपस्थित केला.

# पंतप्रधानांच्या वाढदिवसानिमित्त ऊज्जैनमध्ये ३५ लाख दिवे लावले

## उत्तराखंडमध्ये पंतप्रधानांच्या नावाने पूजा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** आज पंतप्रधान मोदींचा ७६ वा वाढदिवस आहे. या निमित्ताने सेवा-संकल्प अभियानांतर्गत देशभरात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मध्य प्रदेशात दीपोत्सव साजरा होत आहे. सर्वात मोठा कार्यक्रम ऊज्जैनमध्ये पार पडला, जिथे शिप्रा नदीच्या घाटांवर आणि महाकाल लोक येथे २५ लाख दिवे लावण्यात आले, तर घरे आणि दुकानांमध्ये १० लाख दिवे लावण्यात आले.उत्तराखंडमधील डेहराडून येथे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी यमुना घाटावर पंतप्रधान मोदींच्या नावाने पहिली पूजा आणि आरती केली. मोदींच्या वाढदिवसानिमित्त बिहारमध्ये २१ लाख दिवे लावण्यात आले.दरम्यान, गुजरातच्या वडनगर येथे गृहमंत्री अमित शहा म्हणाले की, पंतप्रधान मोदी हे जगातील सर्वात लोकप्रिय नेत्यांपैकी एक आहेत. त्यांनी मोदींचे जन्मस्थान वडनगरपासून वाराणसीपर्यंत सुमारे १,३०० किलोमीटरच्या बाईक रॅलीला हिरवा झेंडा दाखवला. वाराणसीहून वडनगरपर्यंतही बाईक रॅलीला सुरुवात झाली.






**२५ वर्षांच्या अविरत सेवेवर** - पंतप्रधान मोदींनी राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर २५ वर्षे अविरतपणे काम केले. मोदींनी एकही दिवस सुट्टी न घेता दिवसाला १६-१८ तास काम केले.

**'इंडिया फर्स्ट' मंत्रावर –** पंतप्रधान मोदींनी २५ वर्षे 'इंडिया फर्स्ट' या मंत्राचा पुरस्कार केला आणि देशाला विकासाच्या दिशेने नेण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

# संपादकीय

## प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# ‘यूपीआय शुल्क’

युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस अर्थात यूपीआय ही भारतातील सर्वाधिक यशस्वी आर्थिक पायाभूत सुविधांपैकी एक. जुलै महिन्यामध्ये यूपीआयवर २,३६६ कोटी रुपयांचे व्यवहार झाले, तर ऑगस्टमध्ये व्यवहारसंख्या २,४५१ कोटींवर गेली. यूपीआयचा वापर किती झपाट्याने वाढत आहे, हे यावरून दिसते. ब्रिक्स परिषदेत भारताने डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचा जो डंका वाजवला त्यामध्ये यूपीआय केंद्रस्थानी होते. भारतात यूपीआयचे सर्वव्यापी लोकशाहीकरण होण्याची दोन मुख्य कारणे. एक म्हणजे, व्यवहारसुलभता आणि दुसरे, शुल्करहित रचना. यातील दुसरा घटक अधिक महत्त्वाचा. ऑनलाईन बँकिंगच्या सुरुवातीच्या काळात आरटीजीएस, एनईएफटीद्वारे पैसे ट्रान्स्फर करण्यासाठी शुल्क आकारले जात होते. त्यामुळे अनेक जण ही सुविधा वापरत नसत. याचा परिणाम आर्थिक व्यवहारांच्या डिजिटलायजेशनची प्रक्रिया संथ गतीने होण्यात झाला. पेटीएमने २०१४ मध्ये परवानाधारक वॉलेट बाजारात आणले तेव्हा व्यापाऱ्यांसाठी प्रतिव्यवहार प्रक्रिया शुल्क आकारले जात होते. फेब्रुवारी २०१६ मध्ये ते रद्द केले. कारण असे शुल्क छोट्या व्यापाऱ्यांना डिजिटल पेमेंट स्वीकारण्यापासून परावृत्त करत होते. त्यानंतर नोटबंदी झाली आणि डिजिटल पेमेंटचा विस्फोट झाला. आज एक दशकानंतर पुन्हा व्यापारी व्यवहारांवर शुल्क आकारणीचा निर्णय घेतल्याने सरकारच्या मनात काय आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. १५ ऑक्टोबरपासून होणाऱ्या बदलानुसार व्यक्तीकडून व्यक्तीकडे होणारे सर्व यूपीआय व्यवहार मोफत असतील. मित्राला, कुटुंबीयांना रक्कम देणे किंवा स्वतःच्या खात्यांमध्ये पैसे हस्तांतरित करणे यावर शुल्क नसेल. ग्राहकांकडून यूपीआय ॲपला प्लॅटफॉर्म शुल्क किंवा छुपे शुल्क घेण्याचीही परवानगी नाही. व्यापाऱ्यांना केलेले २,००० पर्यंतचे व्यवहारही शुल्कमुक्त राहतील. बदल मुख्यतः २,००० पेक्षा अधिक रकमेच्या नियमित व्यापारी व्यवहारांत आहे. त्यावर ०.४ टक्के एमडीआर आकारला जाईल. त्यानुसार ३,०००च्या व्यवहारावर १२ रुपये, तर ५०,०००च्या व्यवहारावर २०० इतका एमडीआर होईल. ७५,००० आणि त्यापुढील व्यवहारासाठी मात्र कमाल मर्यादा ३०० ठेवली आहे. हा पैसा सरकारचा कर नाही. बँका, पेमेंट सेवा पुरवठादार आणि यूपीआय ॲपसह पेमेंट व्यवस्थेतील घटकांमध्ये तो विभागला जाणार आहे. एमडीआर म्हणजेच मर्चंट डिस्काऊंट रेट. ही संकल्पना भारतात कार्ड पेमेंटच्या काळापासून अस्तित्वात आहे. यूपीआय व्यवहारांवर एमडीआर आकारला जाणार असला तरी सुमारे ९६ टक्के व्यवहार यामुळे प्रभावित होणार नाहीत, असे सरकार म्हणते. कोणतेही कार्ड मशिन न घेता छापील क्यूआर कोडच्या साहाय्याने अत्यंत छोट्या व्यवसायाला डिजिटल पेमेंट स्वीकारता आले, हे यूपीआयचे खरे सामर्थ्य आहे. त्याच घटकावर खर्चाचा पहिला भार पडला असता, तर गेल्या दशकातील आर्थिक समावेशनाची दिशा उलटी फिरण्याचा धोका निर्माण झाला असता. नव्या एमडीआरमध्ये आणखी एक शहाणपणाचा भाग म्हणजे सर्व उद्योगांना ०.४ टक्क्यांचा एकच दर लावलेला नाही. रेल्वे, दूरसंचार, विमा, इंधन आणि कृषी निविष्ठांसारख्या अत्यावश्यक किंवा कमी नफ्याच्या क्षेत्रांत दोन हजारांपेक्षा अधिक रुपयांच्या व्यवहारासाठी सरसकट ५ रुपये एमडीआर असेल. वीज, पाणी, पाईपद्वारे मिळणाऱ्या नैसर्गिक वायूच्या देयकांसाठीही सवलतीची रचना लागू असेल. त्यामुळे दहा हजारांचा विमा हप्ता किंवा मोठ्या रकमेचे इंधन बिल भरताना सामान्य ०.४ टक्के दराचा भार व्यापाऱ्यावर पडणार नाही. भांडवली बाजारासाठी वेगळी रचना आहे. म्युच्युअल फंड, सिक्युरिटीज, शेअर दलाल आणि संबंधित गुंतवणूक व्यवहारांसाठी एमडीआर ०.०२ टक्के असून, कमाल मर्यादा ३०० रुपये आहे. १ लाखाच्या पात्र व्यवहारावर या दराने २० रुपये एमडीआर होतो. किरकोळ गुंतवणूकदारांचा औपचारिक वित्तीय बाजारातील सहभाग कमी होऊ नये, हा कमी दरामागील हेतू असल्याचे अर्थ मंत्रालयाने म्हटले आहे. एमडीआरबाबत सरकारी युक्तिवाद असा की, इतक्या मोठ्या व्यवस्थेचा खर्च शून्य असू शकत नाही. यूपीआयच्या प्रत्येक व्यवहारामागे बँकांची संगणकीय यंत्रणा, सर्व्हर, डेटा सेंटर, सायबर सुरक्षा, फसवणूक शोधणाऱ्या प्रणाली, व्यवहारांची अंतिम पूर्तता, तक्रार निवारण आणि सातत्याने वाढवावी लागणारी क्षमता आहे. ग्राहकाला क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर काही सेकंदांत ‘पेमेंट सक्सेसफुल’ चा संदेश येतो. त्या काही सेकंदांत पडद्याआड देशव्यापी आर्थिक पायाभूत व्यवस्था कार्यरत असते. आतापर्यंत प्रोत्साहन योजनांद्वारे या खर्चाचा काही भाग सरकारने उचलला. २०२४-२५ च्या योजनेत छोट्या व्यापाऱ्यांच्या २,००० पर्यंतच्या पात्र यूपीआय व्यवहारांसाठी ०.१५ टक्के प्रोत्साहन होते. म्हणजे यूपीआय मोफत नव्हतेच; त्यासाठीच्या यंत्रणेचा खर्च अप्रत्यक्षपणे जनतेच्या पैशांतूनच होत होता. आताही सरकारने स्पष्ट केले आहे की, एमडीआर ग्राहकाकडून घेतला जाणार नाही आणि व्यापाऱ्यानेही तो ग्राहकावर ढकलू नये. त्यासाठी बँकांना सूचना दिल्या आहेत. कागदावर ही बाजू स्पष्ट असली, तरी व्यापाऱ्याच्या प्रत्येक व्यवहाराचा खर्च वाढला तर तो दीर्घकाळ त्याची भरपाई स्वतःच्या नफ्यातूनच करत राहील, असे मानणे अतिभाबडेपणाचे ठरेल. व्यवसायातील अनेक खर्च अखेरीस वस्तू किंवा सेवांच्या एकूण किंमत रचनेत मिसळतातच. त्यामुळे ग्राहकाच्या पावतीवर ‘यूपीआय शुल्क’ म्हणून १० रुपये दिसणार नसले तरी व्यापाऱ्याच्या व्यवहार खर्चात वाढ झाल्यास त्याचा किमतींवर परिणाम होणे अटळ आहे. याची दुसरी बाजूही महत्त्वाची आहे. उत्पन्नाचे साधनच नसेल, तर बँका आणि पेमेंट कंपन्यांकडून वाढत्या व्यवहारांसाठी अमर्याद गुंतवणुकीची अपेक्षा करता येणार नाही. सर्व्हर क्षमता, सायबर सुरक्षा, फसवणूक प्रतिबंधावर खर्च वाढेल; पण पारदर्शकतेसाठी आणि नागरिकांच्या मनातील शंकांचे निरसन होण्यासाठी हा खर्च प्रत्यक्षात किती होतो, सरकारची मदत किती आहे, भविष्यात किती गुंतवणूक आवश्यक आहे, शुल्काशिवाय कोणते पर्याय आहेत, याची माहिती सार्वजनिक झाली पाहिजे. अन्यथा, यूपीआय व्यवहार टाळण्याकडे कल वाढेल. व्यापाऱ्याने मूळ किमतीत किरकोळ वाढ केली तर त्याचा मागोवा कोण आणि कसा घेणार? दुसरा प्रश्न दोन हजारांच्या मर्यादेचा आहे. १,९९९चा व्यवहार पूर्णपणे मोफत आणि २,००१ पासून पात्र व्यापाऱ्याला एमडीआर, ही सीमारेषा व्यवहाराच्या स्वरूपात कृत्रिम बदल घडवू शकते. बिलांचे विभाजन करून दोन किंवा अधिक व्यवहार केल्यास प्रोत्साहन मिळणार का? याचेही स्पष्टीकरण आवश्यक आहे. सुमारे ९६ टक्के व्यापारी व्यवहार नव्या एमडीआरच्या बाहेर राहणार असले तरी उरलेल्या व्यवहारांचे मूल्य किती आहे आणि त्यातून वर्षाला किती एमडीआर गोळा होईल, याचा अंदाजही उपलब्ध असायला हवा. नव्या एमडीआरमधून मिळणाऱ्या पैशाच्या बदल्यात पेमेंट उद्योगाकडून नेमके काय मिळणार, हाही प्रश्न महत्त्वाचा आहे. आधी मोफत सेवा द्या, लोकांना त्याची सवय लावा आणि अवलंबित्व वाढल्यानंतर सेवा सशुल्क करा, ही रणनीती कॉर्पोरेट खासगी उद्योगांकडून नेहमीच वापरली जाते. शासनाकडून अशी रणनीती अवलंबली जाऊ लागल्यास जनतेकडून तिचे समर्थन कसे करता येईल?

# महागाईचे बदलणारे स्वरूप

**सध्याच्या बदलत्या जीवनशैलीत महागाईचे स्वरूपही झपाट्याने बदलत चालले आहे. पूर्वी महागाईचा अर्थ केवळ भाजीपाला, गॅस, पेट्रोल किंवा अन्नधान्याच्या वाढलेल्या किमतींशी जोडला जात असे; परंतु आज त्याची व्याप्ती वाढली असून मनोरंजनापासून ते छोट्या छोट्या आनंदाच्या क्षणांपर्यंत प्रत्येक गोष्ट महाग झाली आहे. या नव्या आर्थिक वास्तवाचे वर्णन करण्यासाठी ‘फनफ्लेशन’ आणि ‘ट्रीटफ्लेशन’ यांसारख्या शब्दांचा वापर केला जात आहे. हे बदल जगण्याच्या आणि खर्च करण्याच्या सवयींनाही पूर्णपणे बदलत आहेत.**

महागाई म्हटले की, आतापर्यंत डोळ्यांसमोर यायचं ते कांदा-बटाटा, टोमॅटो, धान्य, पेट्रोल आणि स्वयंपाकाचा गॅस, पण आता या यादीत एक नवा शब्द जोडला गेला आहे – ‘फनफ्लेशन’. सिनेमाची तिकिटं, कॉन्सर्ट, वीकेंड ट्रिप, कॅफेतली कॉफी, डेट आणि फूड डिलिव्हरी यांसारख्या रोजच्या छोट्या छोट्या विरंगुळादायी घटकांवरही आता महागाईचा थेट परिणाम दिसू लागला आहे. अर्थव्यवस्थेतील हा बदलता चेहरा समजावण्यासाठी दोन नवे शब्द चलनात आले आहेत – फनफ्लेशन आणि लाईफस्टाईल फ्लेशन. या दोन्ही संकल्पना छोट्या छोट्या आनंदांना महाग बनवत असून लोक आता आपला खर्च गुपचूप कमी करण्याचे मार्ग शोधत आहेत. आंतरराष्ट्रीय कलाकारांच्या भारतातील कॉन्सर्टच्या तिकिटांची किंमत कधी कधी एका कुटुंबाच्या महिनाभराच्या रोजच्या खर्चाइतकी असल्याचे दिसून आले आहे. या भाववाढीमागचं एक मोठं कारण समोर आले आहे. जूनमध्ये एफएमसीजी (फास्ट मूव्हिंग कन्झ्युमर गुड्स) कंपन्यांनी कर दरात पाच टक्के वाढ झाल्याचं कारण देत वाढलेल्या खर्चापैकी तब्बल ३० टक्के भार थेट ग्राहकांवर टाकला आहे. विशेष म्हणजे या कंपन्यांनी थेट किंमत वाढवण्याऐवजी एक वेगळी युक्ती वापरली, ती म्हणजे पॅकेटमधील उत्पादनाचे प्रमाणच कमी करून टाकले. याला ‘श्रिंकफ्लेशन’ असंही संबोधतात.

देशभरातील किरकोळ बाजारात खाद्यतेलाच्या सरासरी दरांत मोठी झेप दिसून येते. ऑगस्ट २०२५ ते ऑगस्ट २०२६ या एका वर्षात सर्वच प्रकारच्या खाद्य तेलांच्या किमती १० ते २७ टक्क्यांनी वधारल्या आहेत. विशेषतः पामतेलाच्या दरात सर्वाधिक म्हणजेच २७.४ टक्क्यांची वाढ झाली असून ऑगस्ट २०२५ मध्ये १३१ रुपये प्रति किलो असणारे हे तेल ऑगस्ट २०२६ मध्ये १६७ रुपयांवर पोहोचले आहे. सूर्यफूल तेलाच्या किमतीतही मोठी उडी पाहायला मिळाली असून एका वर्षापूर्वी १६१ रुपये असणारे सूर्यफूल तेल आता २०१ रुपयांना (२४.८ टक्के वाढ) विकले जात आहे. याशिवाय, शेंगदाणा तेलाचे भाव १८७ रुपयांवरून वाढून २०७ रुपये (१०.७ टक्के वाढ) झाले आहेत. मोहरीच्या तेलाचे दर १८८ रुपयांवरून २०३ रुपयांवर (८ टक्के वाढ) गेले आहेत. वनस्पती तुपाची किंमत १५४ रुपयांवरून वाढून १६७ रुपये (१२.१ टक्के वाढ) झाली आहे, तर सोयाबीन तेल १४७ रुपयांवरून १६५ रुपयांवर (१२.२ टक्के वाढ) पोहोचले आहे.

साखर कारखान्यांना साखरेसाठी मिळणाऱ्या भावात वाढ झालेली नसली तरी ऐन सणासुदीच्या काळात साखरेच्या दराने उसळी घेतली आहे. अनेक शहरांत साखरेचा भाव प्रतिकिलो ७५ रुपयांपुढे गेला आहे. साखरेच्या निर्यातीवर बंदी घातल्यामुळे देशांतर्गत बाजारात साखरेचे दर पडतील, अशी अपेक्षा असताना ही वाढ झाली आहे हे विशेषत्वाने लक्षात घ्यायला हवे. यामागचे कारण म्हणजे केंद्र सरकारकडूनच देशात विक्रीसाठी या महिन्यासाठी अवघा २० लाख टनाचा कोटा देण्यात आला आहे. यामुळे बाजारात साखर कमी आहे म्हणून दर वाढत आहेत. देशांतर्गत बाजारात एका महिन्यात साखरेच्या किमतीत १० टक्क्यांनी वाढ झाली असून जूनपासून आतापर्यंत ही वाढ तब्बल ३० टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे.




फनफ्लेशनला जोडूनच आणखी एक संकल्पना समोर आली आहे – ट्रिपफ्लेशन. यात प्रवास आणि हॉटेलमधील छोट्या छोट्या गोष्टीही महागल्याचे म्हटले जाते. फूड डिलिव्हरीमध्ये प्लॅटफॉर्म फी, पॅकेजिंग चार्ज, सर्ज प्राइसिंग बिल वाढवत आहेत, तर फूड डिलिव्हरीचा खर्चही ८ ते ९ टक्क्यांनी वाढला आहे. या संपूर्ण चित्राचे विश्लेषण केले असता एक गोष्ट अधोरेखित होते ती म्हणजे महागाई आता केवळ जगण्यासाठी आवश्यक वस्तूंपुरती मर्यादित राहिलेली नाही. एकीकडे किराणा, खाद्य तेल आणि साखर यांसारख्या जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढत असताना दुसरीकडे मनोरंजन आणि विश्रांती-विरंगुळ्याच्या खर्चांवरही तितकाच भार पडतो आहे. यामुळे मध्यमवर्गीय कुटुंबांचे बजेट दुहेरी दबावाखाली आले आहे. कंपन्यांनी थेट किंमतवाढीऐवजी प्रमाण कमी करण्याचा मार्ग स्वीकारल्यामुळे ग्राहकांना ही वाढ लगेच लक्षातही येत नसली तरी हळूहळू खिशावरचा ताण वाढत जात आहे.

सर्वात चिंतेची बाब म्हणजे महागाईचं हे संकट येत्या काही महिन्यांत आणखी गडद होण्याची शक्यता आहे. एसबीआय रिसर्चच्या ताज्या अहवालानुसार, ऑगस्ट महिन्यात किरकोळ महागाई दर जुलैमधील ४.७ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. इतकेच नाही, तर ऑक्टोबर आणि नोव्हेंबर या दोन महिन्यांत महागाईचा दर तात्पुरता ६ टक्क्यांची पातळीही ओलांडू शकतो, त्यानंतर आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या चौथ्या तिमाहीत तो पुन्हा सुमारे ५ टक्क्यांपर्यंत खाली येण्याची शक्यता या अहवालात वर्तविण्यात आली आहे.

याचाच अर्थ, सणासुदीच्या काळात जेव्हा कुटुंबं मोठ्या प्रमाणात खरेदी आणि मौजमजेवर खर्च करतात, नेमक्या त्याच वेळी महागाईचा वेग सर्वाधिक असणार आहे. यातील दिलासादायक बाब म्हणजे सुरुवातीला कमकुवत राहिलेला मान्सून जुलै आणि ऑगस्टमध्ये सावरला असून एकूण पावसाची तूट जूनमधील जवळपास ४० टक्क्यांवरून घटून आता सुमारे १३ टक्क्यांपर्यंत आली आहे. खरीप पेरणीही गेल्या हंगामाच्या तुलनेत केवळ २ टक्क्यांनी कमी झाल्याचे समोर आले आहे. अन्नधान्य पुरवठा सुधारल्यास महागाईला काहीसा लगाम बसू शकतो.

तथापि, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनीही महागाईबाबत सावध पवित्रा घेतला आहे.

व्याज दरात कोणताही बदल करण्यापूर्वी महागाईच्या दिशेबाबत अधिक स्पष्टता येण्याची प्रतीक्षा असल्याचे त्यांनी पत धोरण समितीच्या ऑगस्ट बैठकीच्या इतिवृत्तात नमूद केले आहे.

सलग चौथ्यांदा समितीने रेपो दर ‘जैसे थे’ ठेवला असला तरी अन्नधान्य, इंधन आणि इनपुट खर्चातील व्यापक वाढीमुळे भविष्यात दरवाढीचा पर्यायही खुला असल्याचा इशारा गव्हर्नरांनी दिला आहे. चलनवाढ किंवा महागाई ही उत्पन्न, बचत, गुंतवणूक, रोजगार आणि आर्थिक वाढ या सगळ्यांशी जोडलेली प्रक्रिया आहे.

महागाई वाढली की, ग्राहकांचा खर्च करण्याचा कल बदलतो, बचत कमी होऊ शकते आणि गुंतवणुकीचे निर्णयही प्रभावित होतात. एखाद्या व्यक्तीने वर्षानुवर्षे पैसे साठवले, पण त्या बचतीवर मिळणारा परतावा महागाईच्या दरापेक्षा कमी राहिला तर कागदावर रक्कम वाढत असली तरी तिची प्रत्यक्ष क्रयशक्ती कमी होत असते. उदाहरणार्थ, ठेवीवर ६ टक्के व्याज मिळत असताना महागाईचा दर त्याच पातळीवर असेल, तर व्याज मिळूनही संपत्तीची वास्तविक वाढ जवळ जवळ होत नाही. त्यामुळे महागाईच्या काळात कुटुंबांना रोजच्या गरजांसाठी अधिक पैसा खर्च करावा लागतो आणि बचतीसाठी उरणारी रक्कम कमी होते. दीर्घकाळ अशी परिस्थिती राहिली तर घर खरेदी, निवृत्ती, मुलांचे शिक्षण किंवा आकस्मिक वैद्यकीय खर्चासाठी केलेले आर्थिक नियोजनही अपुरे पडू शकते. विशेषतः निश्चित उत्पन्नावर अवलंबून असलेल्या कुटुंबांना महागाईचा फटका अधिक तीव्रतेने बसतो.

अन्न, इंधन, घर, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या अनिवार्य खर्चात वाढ झाली की, अनावश्यक वस्तू, मनोरंजन, प्रवास किंवा इतर सेवांवरील खर्च कमी केला जातो. मागणी कमी झाली तर उद्योगांच्या विक्रीवर परिणाम होतो आणि त्याचा परिणाम उत्पादन, गुंतवणूक आणि रोजगारावर होऊ शकतो.

दुसरीकडे, महागाई रोखण्यासाठी मध्यवर्ती बँकेला व्याजदर वाढवावे लागले तर कर्ज महागते. त्यामुळे उद्योगांच्या विस्ताराच्या योजना पुढे ढकलल्या जाऊ शकतात आणि घरगुती कर्जाचा भारही वाढतो. त्यामुळे केंद्र सरकार आणि आरबीआय या दोघांनी समन्वयाने चलनवाढ कमी करण्यावर भर देणे आवश्यक आहे.

फनफ्लेशन आणि लाईफस्टाईलफ्लेशन हे ‘जेन झी’मधील निम्न किंवा मध्यम उत्पन्न असणाऱ्या वर्गामध्ये निर्माण झालेल्या असंतोषाचेही एक कारण आहे हे लक्षात घ्यायला हवे.

**सागर शहा**

# संवाद

## UPI वरील शुल्क आकारणीचा फेरविचार व्हावा

देवाणघेवाणीच्या व्यवहारात जुन्या काळापासून आतापर्यंत अभूतपूर्व क्रांती झाली आहे. पूर्वी वस्तूच्या बदल्यात वस्तू दिली जात होती, तर आज कॅशपेक्षा ँ कोडद्वारे व्यवहार मोठ्या प्रमाणात होत आहेत. जवळपास जगातील ५० टक्के ळझ्‍ व्यवहार भारतात होतात. अशा प्रगतीपथावर असलेल्या डिजिटल पेमेंटची सवय लागल्यानंतर त्यावर शुल्क लावून जनतेला पुन्हा कॅशकडे नेण्याचा सरकारचा विचार आहे का? कामगार वर्ग आधीच इन्कम टॅक्स, जीएसटी, घर टॅक्स, टोल टॅक्स असे कितीतरी कर भरतो. त्यानंतरही निःशुल्क सेवेवर कर लावणे कितपत योग्य आहे?

एकीकडे सरकार डिजिटल क्रांतीला प्रोत्साहन देते आणि दुसरीकडे स्वतःच्याच योजनेला खीळ घालते. सामान्य जनतेवर कर नाही असे म्हटले तरी व्यापारी वर्ग हाही सामान्यच आहे. तो कर भरेल आणि तोच भार पुन्हा सामान्य जनतेकडून वसूल करेल, याचा सरकारने विचार करावा.

शुल्क लावायचेच असेल तर त्याची टक्केवारी कमी असावी. तसेच जीवनावश्यक वस्तू, दैनंदिन वापरातील वस्तू, शेतीविषयक व्यवहार, वैद्यकीय उपचार, औषधी यांसारखे महत्त्वाचे व्यवहार यातून वगळावेत. केवळ महागड्या चैनीच्या वस्तूंच्या व्यवहारावर कर लावावा. एकीकडे ‘लाडकी बहीण’सारख्या योजनेतून पैसे वाटायचे आणि दुसरीकडे कर भरणाऱ्या नागरिकांवरच आणखी कर लादायचा, हा विरोधाभास आहे. त्यामुळे ळझ्‍ वरील शुल्काबाबत सरकारने फेरविचार करून जनतेला दिलासा देणारा निर्णय घ्यावा, हीच अपेक्षा.

**डॉ. भारती हेडाऊ,** यवतमाळ

## सुरक्षित गणेशोत्सव महत्त्वाचा..

अलीकडेच दोन ठिकाणी गणेशमूर्ती पडून हानी झाल्याच्या घटना समोर आल्या. अशा घटना केवळ अपघात म्हणून विसरून जाण्यापेक्षा त्यातून शिकण्याची गरज आहे. मूर्ती जितकी भव्य आणि उंच, तितकी तिची उभारणी, वाहतूक, प्रतिष्ठापना आणि सुरक्षिततेची जबाबदारी अधिक वाढते. गणरायाला उंच आसनावर बसवणे ही श्रद्धा असू शकते, मात्र त्या उंचीमुळे सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असेल तर आपण विचार करायला हवा. ईश्वराला नेमके काय हवे आहे, याचा विचार केवळ मनात करून उपयोग नाही, तो कृतीत उतरला पाहिजे.

श्री गणेशाला बुद्धी आणि विवेकाची देवता मानले जाते. त्यामुळे गणेशोत्सवात विवेकाचा वापर करणे, सुरक्षिततेला प्राधान्य देणे आणि अनाठायी उंचीच्या स्पर्धेतून बाहेर पडणे, हीच गणरायाच्या शिकवणुकीला साजेशी कृती ठरेल. ‘मूर्ती उंच असावी’ यापेक्षा ‘उत्सव सुरक्षित असावा’, ‘देखावा भव्य असावा’ यापेक्षा ‘विचार भव्य असावेत’ आणि ‘स्पर्धा मोठी असावी’ यापेक्षा ‘भक्ती आणि संस्कार मोठे असावेत’, हा विचार स्वीकारण्याची वेळ आली आहे. गणेशोत्सव हा आनंदाचा, श्रद्धेचा आणि मांगल्याचा उत्सव आहे. त्यामुळे कोणत्याही भक्ताला, कार्यकर्त्याला किंवा नागरिकाला हानी पोहोचणार नाही, याची काळजी घेणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे.

**रमा देशमुख**

## ब्रिक्स परिषदेच्या निमित्ताने जगात भारताचा डंका

नवी दिल्ली येथे नुकतेच ब्रिक्सचे १८ वे अधिवेशन भारताच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. सुरुवातीच्या काळात ब्रिक्समध्ये केवळ चार देश होते, आज ही संख्या २१ झाली आहे. लोकसंख्येचा विचार करता जगातील अर्धी लोकसंख्या ब्रिक्सशी जोडली गेली आहे. दिल्लीतील भारतमंडपम् येथे झालेल्या तीन दिवसीय अधिवेशनाकडे सर्व जगाचे लक्ष लागले होते. कारण र्ळें, सौदी अरेबिया आणि इराणसारखे एकमेकांच्या वाऱ्याला उभे न राहणारे राष्ट्राध्यक्ष एकाच मंचावर येणार होते. शिवाय चीन, भारत आणि रशिया या तीन महासत्ता एकत्र येणार असल्याने संमेलनाच्या यशाबद्दल अनेकांच्या मनात शंका होती. मात्र ही शंका फोल ठरली.

पंतप्रधान मोदींच्या एका बाजूला चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग तर दुसऱ्या बाजूला रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन हातात हात घालून उभे असल्याचे विलोभनीय दृश्य जगाने पाहिले. यातून भारतीय संस्कृतीची समृद्धता आणि सहिष्णुता दिसून आली. भारतीयांमध्ये असलेली सहिष्णुता, काम करण्याची जिद्द, बुद्धिमत्ता, चिकाटी, कला-कौशल्य आणि संकटावर मात करण्याची तयारी यांचे मनोज्ञ दर्शन घडले. भारताला संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत स्थायी सदस्यत्व द्यावे, डोकलाम किंवा गलवानसारखे प्रसंग टाळावेत आणि सीमेवर शांतता प्रस्थापित व्हावी, याला चीनने मान्यता दिली, ही भारताच्या दृष्टीने मोठी जमेची बाजू आहे.

पहलगाम येथील धर्म विचारून केलेल्या आतंकी हल्ल्याचा भारताने या परिषदेत स्पष्ट शब्दांत निषेध केला. आतंकवादाला कुठेही थारा असता कामा नये, मतभेद सामोपचाराने सोडवावेत, युद्धाने समस्या सुटत नाहीत तर चर्चा आणि सहमतीनेच सुटतात, यावर सर्वांनी सहमती दर्शवली. अनेक देशांनी भारताशी व्यापार, तंत्रज्ञान आणि खनिजांबाबत करार केले. भारताने ब्रिक्सचे अध्यक्षपद मोठ्या जबाबदारीने आणि कुटुंबप्रमुखाच्या नात्याने पार पाडल्याने हे संमेलन यशस्वी झाले, असे अनेक राष्ट्राध्यक्षांनी सांगितले. सर्व राष्ट्रप्रमुख सुखरूपपणे मायदेशी परतले, हेही भारताचे मोठे यश आहे.

**संध्या काटदरे**

## सागरी सुरक्षेवर ब्रिक्स मंचावरून भारताचा मोठा संदेश

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ब्रिक्स बिझनेस फोरमच्या नेत्यांच्या सत्रात सागरी सुरक्षेचा आणि खलाशांच्या संरक्षणाचा मुद्दा जोरदारपणे मांडला. पश्चिम आशियातील होर्मुझची सामुद्रधुनी आणि काळा समुद्र (ब्लॅक सी) क्षेत्रातील भू-राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर त्यांचे हे वक्तव्य अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जात आहे. नवी दिल्लीतील ब्रिक्स बिझनेस फोरममध्ये बोलताना पंतप्रधान म्हणाले, ‘जेव्हा सागरी मार्ग पूर्णपणे सुरक्षित असतील, पुरवठा साखळी खुली असेल आणि खलाशी सुरक्षित असतील, तेव्हाच जागतिक व्यापाराची प्रगती होऊ शकते.’ भारत हा आंतरराष्ट्रीय जलक्षेत्रात जहाजांच्या निर्बाध हालचालीचा आणि खलाशांच्या सुरक्षेचा खंबीर समर्थक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जागतिक व्यापाराचा सुरळीत प्रवाह हा सुरक्षित सागरी मार्गांवर अवलंबून आहे. वाढत्या व्यापार आणि वाहतूक अडथळ्यांवर भारत आर्थिक पूल बांधण्यासाठी काम करत आहे. दरम्यान, पंतप्रधान मोदींनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन आणि इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांच्यासोबतच्या द्विपक्षीय बैठकीतही काळा समुद्र आणि आखाती देशांमधील सागरी व्यापार आणि भारतीय खलाशांच्या सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केला. सागरी सुरक्षा हा केवळ वाहतुकीचा मुद्दा नाही, तर तो थेट जागतिक आर्थिक आणि राष्ट्रीय सुरक्षेशी जोडलेला आहे, असा ठाम संदेश भारताने या १८ व्या ब्रिक्स परिषदेत दिला.

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल,**
वर्धा.
मो. ९५६१५९४३०६

## सण नव्हे इव्हेंट

सण उत्सव हा आपल्या संस्कृतीचा भाग आहे. जगात सर्वाधिक सण भारतात साजरे केले जातात मुळातच भारत उत्सवप्रिय देश आहे. मात्र, अलीकडे हे सण उत्सवातील पावित्र्य नष्ट होत चालले आहे. ज्या उद्देशासाठी हे सण उत्सव साजरे केले जातात तो उद्देशच हरवला आहे आता हे सण उत्सव म्हणजे इव्हेंट बनले आहेत. कोणताही सण घ्या तो सण न राहता इव्हेंट बनला आहे मग तो दिवाळी असो की गणेशोत्सव. दिवाळीमध्येही फटाक्यांचे प्रदूषण आणि आगीच्या घटना घडतातच दिवाळी हा दिव्यांच्या सण आहे मात्र अलीकडे तो फटाक्यांच्या सण बनला आहे त्यामुळे ध्वनीप्रदूषणासोबतच वायू प्रदूषणही होते मात्र मोठ्या आवाजाचे प्रदूषण करणारे फटाके उडवून दिवाळी साजरी करण्याकडेच अनेकांचा कल असतो. मागील काही वर्षात गणेशोत्सवाचे पावित्र्यही लोप पावले आहे. लोकमान्य टिळकांनी ज्या उद्देशाने सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला तो उद्देशच आपण विसरलो आहोत. गणेशोत्सवातील उंचच उंच मूर्तींची स्पर्धा, नवसाला पावणाऱ्या गणेश मंडळातील स्पर्धा यामुळे गणेशोत्सव सण आहे की स्पर्धा असा प्रश्न पडतो. गणेशोत्सव म्हणजे राजकीय नेत्यांना पक्षांना आपले शक्तिप्रदर्शन करण्याचे हक्काचे व्यासपीठ वाटते. गणेश ही बुद्धीची देवता मानली जात असताना बुद्धी गुंडाळून त्याची खरी आराधना भक्ती करताच येत नाही. नवरात्रीमध्येही हीच परिस्थिती असते एकूणच आज सणांचे स्वरूप पूर्ण पालटले आहे. त्यातील पावित्र्य नष्ट झाले असून आता सण उत्सव म्हणजे केवळ इव्हेंट बनले आहे. सण उत्सव म्हणजे राजकीय नेत्यांसाठी शक्तीप्रदर्शन करण्याचे व्यासपीठ बनले आहे.

**श्याम ठाणेदार**

शुक्रवार, दि. १८ सप्टेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# वाघ-बिबट्याच्या दहशतीत बाभूळगाव..! वन विभागाच्या निष्क्रियतेमुळे मानवहानीची प्रतीक्षा?

**अंतरगाव शिवारात वाघाचा वावर, कानगोकुळमध्ये झाडावर बिबट्या,शहरातील रस्त्यावरही वाघाचे दर्शन, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाभूळगाव, दि. १७ : बाभूळगाव तालुक्यात वाघ आणि बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी तसेच नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**





अंतरगाव शिवारात तुरीच्या शेतात पट्टेदार वाघ आढळून आला, तर कानगोकुळ शिवारात बाभळीच्या झाडावर बिबट्या दिसल्याने वन विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मानवहानी होण्याची वाट पाहत आहात का, असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. नेहरूनगर येथील रहिवासी वासुदेव अर्जुने हे सपत्नीक अंतरगाव शिवारातील शेतात गेले असता त्यांना तुरीच्या शेतात पट्टेदार वाघ दिसला. त्यांनी तत्काळ मोबाईलद्वारे वन विभागाला माहिती दिली. त्यानंतर दहा वन कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पाहणीदरम्यान वाघाने रानडुकराची शिकार केल्याचे निदर्शनास आले. पाऊलखुणांवरून वाघाच्या उपस्थितीची खात्री झाल्याची माहिती वन विभागाने दिली. वाघाच्या हालचाली टिपण्यासाठी ड्रोन कॅमेरे बोलावण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले. परिसरातील प्रज्वल तुंबडे, मुरलीधर तुंबडे, काझी, अर्जुन गुप्ता व डफळे यांच्या शेताजवळ वाघ दिसल्याच्या घटनेला दुजोरा मिळाला. दरम्यान, नांदुरा-कानगोकुळ शिवारात ट्रॅक्टरचालकाला बिबट्या बाभळीच्या झाडावर दिसला. घाबरलेल्या चालकाने तेथून पळ काढला. बेंबळा प्रकल्पाच्या भिंतीजवळ ही वाघ दिसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले असून, त्याचे मोबाईल व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. बाभूळगाव शहरातील पोलीस स्टेशन रस्त्यावर रात्रीच्या वेळी वाघ दिसल्याने नागरिकांनी आरडाओरड केली. एका चारचाकी वाहनाने त्याला पिटाळून लावल्यानंतर तो सावंगी मांग रस्त्याच्या दिशेने पळून गेला. यापूर्वी वाघाने शेळीवर हल्ला करून तिला फस्त केल्याचे सांगण्यात येते.

### वन विभागाचा ड्रोन केव्हा?

**रानडुकराने गणोरी येथील व्यक्तीवर तहसील कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ केलेल्या हल्ल्याची घटना ताजी असतानाच वाघ-बिबट्याचा वावर वाढला आहे. मानवहानी टाळण्यासाठी वन विभागाने तातडीने गस्त वाढवून ड्रोनद्वारे निगराणी करावी. वाघ व बिबट्याला सुरक्षितपणे जेरबंद करून योग्य अधिवासात स्थलांतरित करण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी धास्तावलेल्या नागरिकांकडून होत आहे.**

## घरात ११ जण झोपेत, मध्यरात्री घरफोडीचा थरार!

**जगदंबा नगरीत दरवाजाला ड्रिल मशीनने तीन छिद्रे.**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**दिग्रस, दि. १७ :** दिग्रस शहरातील मानोरा रोडवरील जगदंबा नगरी (प्लॉट नं. ११ बी, १२ ए) येथे घरात तब्बल ११ जण झोपलेले असताना मध्यरात्री घरफोडीचा धाडसी प्रयत्न झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. चोरट्यांनी गेटचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर किचनच्या सागवानी दरवाजाला ड्रिल मशीनने तीन ठिकाणी छिद्रे पाडून दरवाजा फोडण्याचा प्रयत्न केला.

या घटनेने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, शितील संभाजी सोनुलकर यांनी दिग्रस पोलिसांत लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, १६ सप्टेंबर रोजी रात्री साडेदहा वाजता कुटुंबीय झोपी गेले. १७ सप्टेंबर रोजी पहाटे दोनच्या सुमारास चोरट्यांनी समोरील गेटचे कुलूप तोडले. घरामागील गॅलरीतील कूलरचे स्टँड वापरून मागील अंगणात प्रवेश केला. काचेच्या खिडक्यांतून रेकी केल्यानंतर किचनच्या सागवानी दरवाजाला एक इंच आकाराची तीन छिद्रे पाडण्यात आली. जाळीचे गेट उघडून दरवाजा फोडण्याचाही प्रयत्न झाला. घरात सोनुलकर कुटुंबातील ११ सदस्य झोपलेले होते. त्यामुळे हा प्रकार केवळ चोरीचा प्रयत्न होता की गंभीर गुन्ह्याचा कट, याचा तपास होणे आवश्यक आहे, अशी शंका तक्रारदाराने व्यक्त केली आहे.



### अनोळखींच्या वास्तव्याची चौकशी कधी?

**मानोरा रोडलगत साठे ले-आउटमधील बंद व्यापारी संकुलात काही अनोळखी महिला-पुरुष मुलांसह राहत असल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. या व्यक्तींची ओळख पटवून संबंधित ठिकाणी पोलिसांनी तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. मात्र, या व्यक्तींचा घरफोडीशी संबंध असल्याचे अद्याप सिद्ध झालेले नाही. घटनेनंतर पोलिसांनी पंचनामा करून श्वान पथकाच्या मदतीने तपास सुरू केला आहे. ठाणेदार वैजनाथ मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू असून, जगदंबा नगरीत रात्रीची गस्त वाढविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.**

## थोडक्यात

### राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत शिवदीप खडसे डंका

**५ मिनिटांत ८१ गणिते अचूक सोडवत पटकावले 'चॅम्पियन'पदक**



**यवतमाळ :** एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीतर्फे आयोजित राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाइन अबॅकस स्पर्धेत यवतमाळच्या शिवदीप गणेश खडसे याने उल्लेखनीय कामगिरी करत 'चॅम्पियन प्राईज' पटकावले. देशभरातील शेकडो विद्यार्थ्यांच्या सहभागाने झालेल्या या स्पर्धेत शिवदीपने आपल्या वेगवान गणन कौशल्याची आणि अचूकतेची प्रभावी छाप पाडली.एनसीपी स्तरावरील स्पर्धेत शिवदीपने अवघ्या पाच मिनिटांत बेरीज-वजाबाकीची तब्बल ८१ गणिते अचूक सोडवून प्रथम क्रमांक मिळविला. त्याच्या या यशाची दखल घेत अकॅडमीतर्फे अधिकृत प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.शिवदीपच्या यशामागे कठोर मेहनत, नियमित सराव आणि मार्गदर्शक शिक्षिका अमृता ठाकरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीचे अध्यक्ष अभय काळे यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या यशाबद्दल शिवदीपचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



### महिला वाहकावर हल्ल्याचा आरोपी मोकाट, २४ तासांत अटकेचा इशारा

**भारतीय आदिवासी पँथर संघटनेचे निवेदन.**

**पुसद :** पुसद बस आगारातील आदिवासी महिला वाहक आशा ब्रह्मटेके यांच्यावर लोखंडी रॉडने हल्ला करून अश्लील शिवीगाळ करणाऱ्या आरोपीवर गुन्हा दाखल होऊनही अनेक दिवस उलटले आहेत. मात्र, अद्याप आरोपीला अटक करण्यात न आल्याने भारतीय आदिवासी पँथर संघटनेने पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या प्रकरणातील आरोपीवर अॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल असल्याचा दावा संघटनेने केला आहे. असे असतानाही अटकेबाबत ठोस कारवाई झालेली नसल्याने पीडित महिलेला न्याय कधी मिळणार, असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी संघटनेच्या वतीने उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद यांना निवेदन देण्यात आले. यामध्ये संबंधित आरोपीला २४ तासांच्या आत अटक करण्याची मागणी करण्यात आली आहे. निर्धारित मुदतीत अटक न झाल्यास भारतीय आदिवासी पँथर संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला. यावेळी देविदास डाखोरे, गजानन उघडे, सुभाष राठोड, ज्ञानेश्वर मेटकर, गजानन पाचंगे यांच्यासह संघटनेचे कार्यकर्ते व समाजबांधव उपस्थित होते.

### नवनियुक्त शिक्षकांचा सहयोग ग्रुपकडून सत्कार



**झरी :** सहयोग ग्रुप मुकुटबनच्या वतीने पवित्र पोर्टलद्वारे जिल्हा परिषद शाळेत नवनियुक्त झालेल्या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. सहयोग ग्रुपचे सदस्य, कवी व लेखक तथा आदर्श शिक्षक विपीन वडके यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. मुकुटबन येथील मनिषा तिपर्तीवार, लिंगटी येथील आशिक शेख, कोसारा येथील समीर गांवडे व रोशन भोयर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नवनियुक्त शिक्षकांनी आपल्या संघर्षमय प्रवासाबद्दल मनोगत व्यक्त केले. सुरेंद्र गेडाम व गणेश बुट्टे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला सहयोग ग्रुप व निसर्ग पर्यावरण मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र गेडाम, विपीन वडके, केतन ठाकरे, वामण बाडलवार, लोकनाथ खडसे, विलास देवढगले यांच्यासह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गजानन गद्दलवार यांनी केले, तर आभार पंकज जाधव यांनी मानले.

### अनुसूचित जाती आयोगाचा पोलिसांना अहवालाचा आदेश..!

**यवतमाळ :** यवतमाळ येथील सामाजिक कार्यकर्ता व आरटीआय कार्यकर्ता चंदन सुदाम हातागडे यांच्या तक्रारीची राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने दखल घेतली असून, यवतमाळ पोलीस अधीक्षकांना नोटीस बजावण्यात आली आहे. ११ सप्टेंबर २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या नोटिशीनुसार, नोटीस प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत प्रकरणाचा सविस्तर कारवाई अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तक्रारीनुसार, २० एप्रिल २०२१ रोजी अपहरण, अमानुष मारहाण, अपमान तसेच फोटो-व्हिडिओ काढून समाजमाध्यमांवर प्रसारित केल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. या प्रकरणी अपराध क्रमांक ४८१/२०२१ आणि ७८६/२०२५ दाखल असल्याचे नमूद आहे. तक्रारीत मोहम्मद सगीर जाबीर अन्सारी, साज अहमद, अजय गोलाईत, सय्यद मस्जिद, सय्यद अफसर, शेख रहीम, शेख इमरान, अब्दुल समीर, अब्दुल हमीद, सचिन महल्ले व मन्सूर दाऊद यांच्यासह इतर व्यक्तींची नावे नमूद करण्यात आली आहेत. तपासात गंभीर त्रुटी, काही कलमांमध्ये बदल, 'अ' समरीचा संशयास्पद निर्णय आणि डिजिटल पुरावे दडपल्याची शक्यता असल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे. आयोगाने एफआयआर, आरोपींची अटक स्थिती, चार्जशीट, अंतिम अहवाल आणि नुकसानभरपाईचा तपशील मागविला आहे.

## काही तासांच्या पावसाने नगरपरिषदेच्या स्वच्छता मोहिमेची पोलखोल!

**तहसील चौकात नाल्याचा गाळ रस्त्यावर, नागरिकांसह व्यावसायिकांना नाहक त्रास**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १७ :** यवतमाळ शहरातील स्वच्छता व्यवस्थेचा ढिसाळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. शहरातील मुख्य रस्त्यांपैकी एक असलेल्या तहसील चौक परिसरातील सिमेंट रस्त्यावर काही तासांच्या पावसानंतरच नाल्याचे साचलेले पाणी आणि गाळ पसरल्याचे चित्र समोर आले आहे.

त्यामुळे परिसरातील छोटे व्यावसायिक, पादचारी तसेच वाहनचालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. पावसाचे पाणी साचून राहिल्याने अस्वच्छता निर्माण झाली असून, नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. यवतमाळ जिल्ह्यात अनेक दिवसांच्या पावसाच्या खंडानंतर मागील दोन दिवसांपासून रिमझिम पाऊस सुरू आहे. त्यातच गुरुवारी सकाळी झालेल्या काही तासांच्या पावसाने नगरपरिषदेच्या नालेसफाईच्या कामांची वास्तविकता समोर आणली. नाल्यांची नियमित सफाई झाली असती, तर रस्त्यावर गाळयुक्त पाणी साचण्याची वेळ आली असती का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. शहरातील विविध भागांमध्ये नालेसफाई आणि घनकचरा व्यवस्थापनाच्या कामांवर नगरपरिषद प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. स्वच्छता मोहिमेच्या घोषणा आणि प्रत्यक्ष रस्त्यांवरील परिस्थिती यामध्ये मोठी तफावत असल्याची नागरिकांची भावना आहे. विशेष म्हणजे, संबंधित प्रभागातील लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीतही अशी परिस्थिती निर्माण होत असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नालेसफाईच्या कामाची पाहणी करून संबंधित ठेकेदार आणि जबाबदार विभागाच्या कार्यपद्धतीची चौकशी करावी. दोष आढळल्यास नियमानुसार कारवाई करून तातडीने नालेसफाई व रस्त्याची स्वच्छता करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. स्वच्छ शहराचा दावा करण्यापेक्षा प्रत्यक्ष स्वच्छता राखण्याची जबाबदारी नगरपरिषदेने पार पाडावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## महाप्रसादात घरगुती गॅस वापराल तर कारवाईला सामोरे जा!

**गणेश मंडळांच्या परवानगीपत्रात व्यावसायिक सिलेंडरची अट सक्तीची.**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**यवतमाळ, दि. १७:** गणेशोत्सवाच्या काळात भाविकांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या महाप्रसाद व भोजनाच्या कार्यक्रमांमध्ये घरगुती गॅस सिलेंडरचा व्यावसायिक वापर करण्याच्या प्रकारांना आता प्रशासनाने लगाम घालण्याचा निर्णय घेतला आहे. सार्वजनिक गणेश मंडळांसह सर्व उत्सव मंडळे, संघटना व संस्थांना महाप्रसाद तयार करण्यासाठी केवळ व्यावसायिक गॅस सिलेंडरचा वापर करणे बंधनकारक राहणार आहे.

यासंदर्भातील अट मंडप, ध्वनी व महाप्रसादाच्या परवानगीपत्रात स्पष्टपणे समाविष्ट करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पुरवठा शाखेने सर्व तहसीलदारांना दिले आहेत. जिल्हा पुरवठा अधिकारी संघपाल मेश्राम यांनी १५ सप्टेंबर २०२६ रोजी जारी केलेल्या पत्रात ग्राहक दक्षता कल्याण फाउंडेशन, नागपूर यांच्या ४ सप्टेंबरच्या निवेदनाचा संदर्भ दिला आहे. सार्वजनिक उत्सवांमध्ये मोठ्या प्रमाणावर भोजन तयार करताना अनेक मंडळांकडून अज्ञान अथवा दुर्लक्षामुळे घरगुती सिलेंडरचा वापर केला जातो. मात्र, मोठ्या क्षमतेची भांडी व भटारखान्यांमध्ये अशा सिलेंडरचा वापर केल्यास गॅस दाब आणि बर्नरमधील फरकामुळे गंभीर अपघात होण्याची शक्यता असल्याचे प्रशासनाने निदर्शनास आणले आहे. अपघात झाल्यास पदाधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाईचा धोका निर्माण होतो.घरगुती सिलेंडरचा व्यावसायिक किंवा सार्वजनिक कामासाठी बेकायदेशीर वापर केल्याचे आढळल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते. अपघात घडल्यास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल होण्याची शक्यता असून, बेकायदेशीर वापर सिद्ध झाल्यास विमा संरक्षण नाकारले जाऊ शकते, असा इशारा देण्यात आला आहे. याशिवाय घरगुती सिलेंडरवरील अनुदानाचा गैरवापर झाल्याने शासनाच्या महसुलाचे नुकसान होत असल्याचेही पत्रात नमूद आहे. सर्व सार्वजनिक मंडळांना पूर्वकल्पना देण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था व पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे सूचनापत्र किंवा परिपत्रक काढावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. तहसीलदारांनी आपल्या तालुक्यातील मंडळांना व्यावसायिक सिलेंडर वापरण्याची सक्तीची अट कळवून, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास तातडीने सादर करावा, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. उत्सवाचा आनंद सुरक्षिततेच्या चौकटीतच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या मंडळांवर प्रशासन काय भूमिका घेते, याकडे आता लक्ष लागले आहे.

## बहुजन समाजाच्या हक्कांसाठी जनजागृतीची हाक; हुडी बु. येथे केडर कॅम्प उत्साहात

**बामसेफ, भारत मुक्ती मोर्चा व राष्ट्रीय पिछडा वर्ग मोर्चाचा संयुक्त उपक्रम**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. १७ :** महात्मा ज्योतिराव फुले द्विशताब्दी जयंती पर्व आणि महाड मानवमुक्ती संग्राम शताब्दी वर्षानिमित्त बामसेफ, भारत मुक्ती मोर्चा, राष्ट्रीय पिछडा (ओबीसी) वर्ग मोर्चा व सर्व ऑफशूट विंग्स यांच्या संयुक्त विद्यमाने हुडी बु. येथे १३ सप्टेंबर रोजी बहुजन समाजासाठी विशेष केडर कॅम्प (प्रशिक्षण शिबिर) आयोजित करण्यात आले. उत्साहपूर्ण वातावरणात शिबिराची यशस्वी सांगता झाली.

बहुजन समाजातील एससी, एसटी, ओबीसी व अल्पसंख्याक समाजाला वर्तमान सामाजिक समस्यांची जाणीव करून देणे, समस्यांच्या मुळाशी असलेल्या कारणांचा अभ्यास करणे आणि समाजात वैचारिक जागृती निर्माण करणे, हा प्रशिक्षणाचा प्रमुख उद्देश होता. हक्क, सामाजिक प्रश्न आणि संघटनात्मक जागरूकतेवर शिबिरात मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन राष्ट्रीय पिछडा वर्ग मोर्चाचे कार्यकारी अध्यक्ष रामराव होटगीर यांच्या हस्ते झाले. बामसेफचे राज्य प्रचारक विद्वान केवटे यांनी मुख्य मार्गदर्शक व प्रशिक्षक म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी गणपत गव्हाळे, भोलानाथ कांबळे, पंजाब जाधव, संगिता दवने, बी. बी. मारकड, संतोष पोले व वसेकर यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. भारत कांबळे यांनी प्रास्ताविक केले, तर बंडूभाऊ गंगावणे यांनी सूत्रसंचालन केले. शिबिराच्या यशस्वितेसाठी भगवान हनवते, दिलीप गायकवाड, मारोती खंदारे व देवराव पाईकराव यांनी परिश्रम घेतले. स्मृतिशेष शरद कांबळे यांच्या स्मरणार्थ त्यांचे चिरंजीव सम्राट कांबळे यांनी भोजनदान केले. रोहित कांबळे यांनी आभार मानले. शिबिराला महिला, विद्यार्थी, शेतकरी, युवक व नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

## स्वच्छता ही सेवा अभियानाला प्रारंभ..! लोकसहभागातून कृतीचा संकल्प!

**१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान विविध उपक्रम.**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १७ :** स्वच्छ भारताच्या संकल्पनेला लोकसहभागाची जोड देण्यासाठी 'स्वच्छता ही सेवा (SHS)-२०२६' अभियानाला आज, १७ सप्टेंबरपासून सुरुवात झाली आहे. २ ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या अभियानात स्वच्छतेच्या केवळ घोषणा न करता सार्वजनिक ठिकाणांचे रूपांतर, कचरा वर्गीकरण आणि नागरिकांच्या प्रत्यक्ष सहभागावर भर देण्यात आला आहे. गांधी जयंतीच्या दिवशी अभियानाची सांगता करण्यात येणार आहे. 'स्वच्छते मध्ये सहभाग, स्वच्छ भारत, विकसित भारत' ही यंदाची संकल्पना असून, शासकीय यंत्रणा, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था, युवक, विद्यार्थी आणि नागरिकांनी एकत्रितपणे स्वच्छता उपक्रम राबविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अस्वच्छ व अडचणीची ठिकाणे तसेच नागरिकांची मोठी वर्दळ असलेल्या सार्वजनिक जागांचे नकाशीकरण करून विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. मात्र, या मोहिमेची खरी कसोटी नियमित स्वच्छता, कचरा संकलन आणि देखभालीत दिसून येणार आहे. शालेय विद्यार्थी व युवकांसाठी 'स्वच्छता ज्ञान यात्रा', घनकचरा व्यवस्थापन केंद्रांना भेटी आणि 'स्वच्छता व जल संचय संवाद' आयोजित केले जाणार आहेत. सफाईमित्र व स्वच्छता कामगारांसाठी आरोग्य तपासणी, शासकीय योजनांशी जोडणी, PPE किट वितरण आणि सन्मान सोहळे घेण्यात येतील. घराघरांत कचरा वर्गीकरण व संकलनाबाबत जनजागृती करताना चार प्रकारच्या कचरा वर्गीकरणावर भर दिला जाणार आहे. वृक्षारोपण, 'एक पेड माँ के नाम', हरित पर्व, 'कचऱ्यापासून संपत्ती' व 'कचऱ्यापासून कलाकृती' यांसह जुनी पुस्तके, कपडे दान आणि RRR उपक्रम राबविण्यात येणार आहेत.


### १ ऑक्टोबरला देशव्यापी श्रमदान

**अभियानाचा महत्त्वाचा टप्पा म्हणून १ ऑक्टोबरला 'एक दिन, एक घंटा, एक साथ' या आवाहनातून देशव्यापी श्रमदान प्रस्तावित आहे. २ ऑक्टोबरला विशेष ग्रामसभा व परिषद बैठका घेता येणार आहेत. जिल्ह्यांना कृती आराखडा तयार करून अभियानातील उपक्रमांची माहिती दररोज 'स्वच्छता ही सेवा २०२६' आयटी पोर्टलवर अपलोड करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.**

## यवतमाळ मल्लखांब अकादमीला राज्य योगासन स्पर्धेत उपविजेतेपद

**मुक्ता मेश्रामने पटकाविले सुवर्णपदक, परी डोळसे तृतीय तर शिवाजी राऊत चा पाचवा क्रमांक.**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**यवतमाळ, दि. १७ :** ३८ व्या राष्ट्रीय योगासन अजिंक्यपद स्पर्धेसाठीची निवड चाचणी व २० वी राज्यस्तरीय योगासन स्पर्धा नागपूर येथे नुकतीच पार पडली. कामगार कल्याण केंद्र, सक्करदरा, नागपूर येथे १५ व १६ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या राज्यस्तरीय योगासन स्पर्धेत यवतमाळ मल्लखांब अकादमीच्या एकूण १३ खेळाडूंनी सहभाग घेत उल्लेखनीय कामगिरी केली.

अकादमीचे प्रशिक्षक किसन प्रजापती व वंशिक वाडे यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी विविध वयोगटांमध्ये योगासनाच्या ट्रेडिशनल व रिदमिक प्रकारात सहभाग घेतला. ६ ते १० वर्षे वयोगट मुलींमध्ये नक्षत्रा तुपकर, शाश्वती जोशी आणि ज्ञानेश्वरी चौहान यांनी सहभाग घेतला. तर मुलांमध्ये शिवाजी राऊत आणि राजरत्न पाटील यांनी सहभाग घेतला. यामध्ये शिवाजी राऊत याने ५ वा क्रमांक पटकाविला. १० ते १४ वर्षे वयोगट मुलांमध्ये वंश कुमरे याने सहभाग घेतला. तर मुलींमध्ये परी डोळसे हिने ट्रॅडिशनल व रिदमिक या दोन्ही प्रकारांत सहभाग घेतला. रिदमिक प्रकारात तिने तृतीय क्रमांक मिळवत कांस्यपदक पटकावले. याशिवाय विभा डोळसे, रश्मी कुमरे आणि परिणीती दबाडे यांनी ट्रेडिशनल प्रकारात सहभाग घेतला. १४ ते १८ वर्षे वयोगटात मुक्ता मेश्राम हिने ट्रेडिशनल प्रकारात सहभाग घेत सुवर्णपदक पटकावले. या सर्व स्पर्धकांनी नेहरू स्टेडियम येथे अकादमीचे प्रशिक्षक किसान प्रजापती व वंशिक वाडे यांच्याकडून तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेतले. यशस्वी खेळाडूंचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## मनपूर ग्रामपंचायतीत 'सेवा संकल्प अभियानाचा' शुभारंभ

**सीईओ विशाल खत्री यांच्या उपस्थितीत विविध शासकीय योजनांच्या लाभांचे नागरिकांना वाटप**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १७ :** यवतमाळ पंचायत समिती अंतर्गत मनपूर ग्रामपंचायतीमध्ये जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल खत्री यांच्या उपस्थितीत 'सेवा संकल्प अभियानाचा' शुभारंभ करण्यात आला. या अभियानाच्या माध्यमातून ग्रामपंचायत स्तरावरील नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला.

यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) जालींदर आभाळे, जिल्हा आरोग्य अधिकारी सुभाष ढोले, गटविकास अधिकारी पद्माकर मडावी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. अभियानांतर्गत प्रातिनिधिक स्वरूपात नागरिकांना आयुष्यमान कार्ड, जन्म व मृत्यू प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. तसेच दिव्यांग लाभार्थ्यांना धनादेश, विकसित भारत राष्ट्रीय आजीविका मिशन अंतर्गत जॉब कार्ड, स्तनदा मातांना किट आणि शालेय विद्यार्थ्यांना प्रोत्साहन पर बक्षिसे देण्यात आली. दरम्यान, मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल खत्री यांनी आरोग्य विभागाच्या वतीने आयोजित आरोग्य तपासणी शिबिराला भेट देऊन पाहणी केली. तसेच महिला व बालविकास विभागांतर्गत अंगणवाडी केंद्रास भेट देत तेथील व्यवस्थेची पाहणी केली. या कार्यक्रमास गावातील महिला-पुरुष नागरिकांसह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# राज्यातील शाळांमध्ये 'सेवा संकल्प अभियान'ला प्रारंभ

## शालेय शिक्षण विभागाचा निर्णय

**अमरावती/प्रतिनिधी**

राज्यातील सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आणि खाजगी अनुदानित, विनाअनुदानित शाळांमध्ये १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संविधानात्मक पदावरील कार्यकाळाला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सामान्य प्रशासन विभागाच्या मार्गदर्शनानुसार हे अभियान आयोजित करण्यात आले आहे. या काळात शाळांमध्ये विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग निश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.या अभियानांतर्गत शाळांमध्ये विविध उपक्रम राबविले जाणार आहेत.शाळास्तरावर विद्यार्थ्यांसाठी 'माझ्या स्वप्नातील भारत' आणि 'विकसित भारत - २०४७' या विषयांवर स्पर्धा घेतल्या जातील. यातील उत्कृष्ट सादरीकरणाचे व्हिडिओ आणि चित्रे तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर प्रदर्शित केली जातील. २ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रत्येक तालुक्यात या विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल. याद्वारे केंद्र व राज्य सरकारच्या जनकल्याणकारी योजनांची माहिती कला पथक किंवा नाट्य पथकाद्वारे विद्यार्थी, पालक व नागरिकांपर्यंत पोहोचवली जाईल.'सेवा माझे योगदान' यामध्ये स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, प्लास्टिकमुक्त जनजागृती, कचरा वर्गीकरण, सायबर सुरक्षा, 'फिट इंडिया' खेळ सत्र आणि पोषण व ?निमित्त जनजागृती यासारखे विविध सामाजिक उपक्रम राबवले जातील. शाळांमध्ये वंचित मुलांसाठी शैक्षणिक सहकार्य, इयत्ता ९ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर कौन्सिलिंग सत्र, डिजिटल साक्षरता आणि विद्यार्थ्यांना आवश्यक असणारी विविध प्रमाणपत्रे मिळवून देण्यासाठी विशेष मार्गदर्शन सत्रे आयोजित केली जातील.

**अंमलबजावणी आणि संनियंत्रण**

या अभियानाचे शाळास्तरावर मुख्याध्यापक, तालुकास्तरावर गट शिक्षण अधिकारी आणि जिल्हास्तरावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) हे संनियंत्रण व समन्वय पाहणार आहेत. राज्यस्तरावर शिक्षण संचालक (प्राथमिक) हे मुख्य नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील. तसेच शाळांनी राबविलेल्या उपक्रमांचे संक्षिप्त अहवाल, फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसिद्धीसाठी संकलित करून शिक्षण विभागास सादर करावे लागणार आहेत.

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अंजनगाव सुर्जी पोलीस सज्ज

### संवेदनशील मार्गांवर रूट मार्च

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**



आगामी श्री गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशन अंतर्गत शहरात भव्य 'रूट मार्च' आणि 'दंगा काबू' योजनेची यशस्वी रंगीत तालीम (मॉक ड्रील) घेण्यात आली.सदर रंगीत तालीम अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम आणि अंजनगाव सुर्जी उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील हूड यांच्या थेट मार्गदर्शनाखाली पार पडली.

पोलीस स्टेशनवरून सुरु झालेला हा मार्च शनिवारा, पानाटाई, गुल्जारपुरा, पटेल मंगल कार्यालय मार्गे नवीन पूल आठवडी बाजार येथे पोहोचला. तेथून पुढे सती माता मंदिर ते चारा साथ मशीद, पाचपावली, आलम चौक, शनिवारा आणि ओम चौक मार्गे परत पोलीस स्टेशन येथे या रूट मार्चचा समारोप करण्यात आला.रूट मार्च दरम्यान नवीन पूल आठवडी बाजार येथे आपत्कालीन किंवा दंगलीची परिस्थिती हाताळण्यासाठी विशेष प्रात्यक्षिके घेण्यात आली. यामध्ये हँड ग्रेनेड, डायनामाईट, ग्रेनेड आणि अश्रूधूर यांचा वापर कसा करावा, याचे अत्यंत प्रभावी आणि जिवंत प्रात्यक्षिक पोलीस दलातर्फे करून दाखवण्यात आले.या रंगीत तालीमीसाठी आणि रूट मार्चसाठी विविध विभागातील मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला होता. यामध्ये अंजनगाव सुर्जीचे ठाणेदार पोलीस निरीक्षक सूरज बोंडे यांच्यासह अंजनगाव पोलीस स्टेशनचे ५ अधिकारी व २५ अंमलदार, ३७ सैनिक आणि एस.आर.पी.एफ.ची (SRPF)एक संपूर्ण प्लाटून हजर होती.याशिवाय, पो. स्टे. पथ्रोटचे २ अधिकारी व ८ अंमलदार, पो. स्टे. रहिमापूरचे १ अधिकारी व १० अंमलदार, आर.पी.टी.एस. (RPTS) अकोला येथील १० प्रशिक्षणार्थी अंमलदार, आर.पी.टी.एस. नागपूर येथील ५ महिला प्रशिक्षणार्थी अंमलदार, नाशिक येथील २ प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक (PSI) आणि लोहमार्ग रेल्वे पोलिसांचे ५ अंमलदार सहभागी झाले होते. अशाप्रकारे एकूण १० अधिकारी, ९३ अंमलदार आणि ३७ सैनिकांनी या बंदोबस्तात सक्रिय सहभाग घेतला.या रंगीत तालीमीमुळे आगामी गणेशोत्सव काळात शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासन पूर्णपणे सज्ज आणि सतर्क असल्याचा संदेश नागरिकांना देण्यात आला असून, शांततेत उत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# ३१ किलो अंजीर आणि मखाना पासून साकारली 'श्री'ची मूर्ती

## जयहिंद गणेशोत्सव मंडळाने दिला पर्यावरणपूरक संदेश

**अमरावती/का.प्र.**

स्वकलेने पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारण्याचा विशेष इतिहास असलेल्या बडनेरा, जुने शहर, बारीपुरा येथील जयहिंद गणेशोत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांनी दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा स्वकलेने 'अंजीर आणि मखाना' पासून पर्यावरणपूरक 'श्री'ची मूर्ती साकारली आहे.

मागील वर्षीच्या तब्बल ७५ किलो खारीक या पूजेच्या पदार्थाचा उपयोग करुन स्वकलेने साकारलेल्या पर्यावरणपूरक गणरायानंतर यंदाही मंडळाच्याच कार्यकर्त्यांनी स्वकलेने 'अंजीर आणि मखाना' या पदार्थापासून श्रींची मूर्ती साकारली आहे. यासाठी तब्बल ३१ किलो अंजीर चा अप्रतिम उपयोग करण्यात आला असून, सोबतच मखाना या पदार्थाचा योग्य उपयोग करुन बाप्पांच्या धोतीला सजावण्यात आले आहे.

मूर्तीसह आकर्षक आरास डोळ्यांत साठवून घेण्यास गणेश भक्तांची दररोज अलोट गर्दी होत आहे. ही पर्यावरणपूरक मूर्ती साकारण्याची कल्पना मंडळाचेच प्रज्वल पोकळे यांच्यासह मयूर अंबाडकर, ऋतिक अंबाडकर आणि अन्य कार्यकर्त्यांची आहे. मंडळाचे हे ३८ वे वर्ष असून



यावर्षी मंडळाच्या अध्यक्षपदी संकेत दारोकर, उपाध्यक्षपदी निकेश निचत, सचिव प्रज्वल पोकळे, कोषाध्यक्ष मयूर अंबाडकर यांची निवड करण्यात आली आहे.तसेच, सदस्यांमध्ये शैलेश अंबाडकर, प्रतीक दाभाडे, गौरव अंबाडकर, प्रतिक दुधे, वैभव अंबाडकर, गौरव दातीर, श्रेयस पोकळे, अतुल पोकळे, आकाश पोकळे, प्रतीक अंबाडकर, यश पोकळे, सर्वेश निचत, अनिकेत दातीर, सारंग अंबाडकर, अंकुश डकरे, भूषण तायडे, मयूर दुधे, वैभव दुधे आदित्य गडलिंग, वेदांत अंबाडकर, प्रसन्न अंबाडकर, उत्कर्ष दारोकार, देवाशिष अंबाडकर, यश वसुले, संस्कार दारोकार, अमोल दातीर, मोहन अंबाडकर, संजय अंबाडकर, मिलिंद अंबाडकर, संजय दुधे, संदीप अंबाडकर, अरविंद अंबाडकर, प्रमोद दातीर, नरेन्द्र अंबाडकर, धनंजय दरोकार इत्यादींची निवड करण्यात आली आहे.

या आधीसुद्धा मंडळाच्याच कार्यकर्त्यांनी स्वकलेने पर्यावरणपूरक कापसाचा गणपती, भांड्यांचा गणपती, मडक्यांचा गणपती, टोपल्यांचा गणपती, चमकीचा गणपती, डिस्को मण्यांचा गणपती, ५१ किलो लाल सुपारीचा गणपती, विविध सुकामेवा आणि उपवासाच्या पदार्थांचा गणपती, मोतीचा गणपती, नऊ विविध प्रकारच्या तब्बल पाच हजार चॉकलेटचा गणपती, २१ हजार पवित्र रुद्राक्षांचा गणपती, ५१ किलो समुद्री शिंपल्यांचा गणपती तसेच मागच्याच वर्षी तब्बल ७५ किलो खारीक या पूजेच्या पदार्थापासून गणपती बाप्पा साकारले होता.

सन २०१६ साली याच माध्यमातून मंडळाच्या कार्यकर्त्यांनी ६ फूट उंची असलेली '५१ किलो लाल सुपारीची गणेश मूर्ती' आणि 'जल हैं तो कल हैं' या विषयावर आधारित देखावा साकारुन पाणी हे किती मोलाचे आहे, याचे महत्त्व प्रेक्षकरुपी माध्यमातून गणेशभक्तांना समजविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.केवळ एक प्रयत्न म्हणून सुरु झालेला हा प्रवास मंडळाला थेट 'लोकमान्य महोत्सव २०१६ च' महाराष्ट्र शासनाचे अमरावती जिल्हास्तरीय द्वितीय बक्षिस देऊन गेला.तसेच २०२४ च्या ७५ किलो खारीक च्या पर्यावरणपूरक गणेशमूर्तीला अमरावती महापालिकेच्या 'आदर्श गणेशोत्सव स्पर्धा-२०२५' तत्कालीन महापालिका आयुक्ता सौम्या शर्मा यांच्या शुभहस्ते दुसऱ्या क्रमांकाच्या पारितोषिकाने गौरविण्यात आले. मागील सलग सात वर्षांपासून मंडळाला पोलिस आयुक्तालय व महापालिका आयुक्तांच्या आदर्श गणेशोत्सव स्पर्धेचे पारितोषिके मिळत आलेले आहे, हे विशेष।

# सार्वजनिक उपक्रमात राजभाषा हिंदी जन संवादाचे प्रमुख माध्यम - डॉ. राहुल खटे

## आयआयएमसीत हिंदी पंधरवाडा निमित्य विशेष व्याख्यान

**अमरावती/ का.प्र.**

राजभाषा हिंदीच्या वापराबाबत केवळ इंग्रजी मजकुराचे हिंदीत भाषांतर करण्याच्या दृष्टिकोनातून बाहेर पडून नागरिकांशी थेट आणि प्रभावी संवाद साधणाऱ्या हिंदीचा वापर करण्याची गरज व्यक्त होत आहे. सार्वजनिक उपक्रमात राजभाषा हिंदी जन संवादाचे प्रमुख माध्यम असल्याचे मत राजभाषा अधिकारी डॉ. राहुल खटे यांनी व्यक्त केले. आयआयएमसीत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

भारतीय जन संचार संस्थान मध्ये हिंदी पंधरवाडा 'सार्वजनिक उपक्रमात जनसंपर्क आणि राजभाषा हिंदी' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून भारतीय स्टेट बँक अमरावती शाखेचे राजभाषा अधिकारी डॉ. राहुल खटे होते. अध्यक्षस्थानी संस्थानचे क्षेत्रीय संचालक डॉ. राजेश सिंह कुशवाहा होते. यावेळी विचारमंचावर डॉ. विनोद निताळे, जयंत सोनोने, रोहन तायडे आदी उपस्थीत होते. डॉ. राहुल खटे पुढे म्हणाले, इंग्रजीतील मजकुराचे केवळ हिंदीत भाषांतर करणे म्हणजे जनसंवाद नव्हे. भाषांतराची भाषा अतिशय क्लिष्ट, कृत्रिम किंवा शब्दबंबाळ असल्यास नागरिकांना माहिती समजून घेण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात.परिणामी माहिती नागरिकांपर्यंत पोहोचण्याऐवजी त्यांच्यापासून दूर जाण्याची शक्यता असते. भारतीय भाषांचा आदर आणि सन्मान करण्याचे ही त्यांनी यावेळी सांगितले. या प्रसंगी डॉ. राहुल खटे यांनी विद्यार्थ्यांना कार्यालयीन हिंदी शब्दावलीचा सराव दिला. अध्यक्षीय भाषणात डॉ. राजेश सिंह कुशवाहा यांनी हिंदी भाषेच्या समृद्ध परंपरेवर प्रकाश टाकला. विविधतेत एकतेने नटलेल्या भारतात हिंदीने अनेक भारतीय भाषांमधील शब्द, विचार आणि सांस्कृतिक अभिव्यक्ती आत्मसात करत स्वतःला सातत्याने समृद्ध केले आहे. त्यामुळे हिंदीतील बहुभाषिकता ही तिची कमजोरी नसून, व्यापकता आणि सामर्थ्याचे प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी केवळ उपलब्ध सामग्रीचे अनुकरण न करता स्वतंत्र विचार, सखोल अध्ययन आणि मूल्याधारित दृष्टिकोन विकसित करणे आवश्यक असल्याचेही डॉ. कुशवाहा यांनी नमूद केले.प्रास्ताविक रोहन तायडे यांनी केले. या प्रसंगी केंद्रीय रेल्वे, माहिती व प्रसारण मंत्रालय तसेच इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांचा हिंदी भाषा दिनानिमित्य दिलेल्या संदेशाचे वाचन करण्यात आले, त्याचबरोबर भारतीय जन संचार संस्थानचे कुलगुरू डॉ. प्रज्ञा पालीवाल गौड यांचा हिंदी पंधरवाडा संबंधी संदेशाचे वाचन करण्यात आले. कार्यक्रमात प्रज्वल वरुडकर याने पाहुण्यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन जयश्री व कृष्णा यांनी केले, तर आभार लक्ष्मी ठोसर हिने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी

# १५ वर्षीय मुलीचे मरणोपरांत नेत्रदान

## वडिलांचा घेतला नेत्रदानाचा निर्णय

**अमरावती/ का.प्र.**



राहुल नगर, कॅम्प, अमरावती येथील रहिवासी गौरी श्रीकांत दांडगे (वय १५) यांचे निधन झाले. दांडगे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला. परंतु अशाही परिस्थितीत वडील श्रीकांत दांडगे यांनी मुलगी गौरी हिचे नेत्रदान करण्याचा निर्णय घेतला.

दिशा ग्रुप व दिशा एज्युकेशन फाऊंडेशन द्वारा संचालित दिशा इंटरनॅशनल आय बँक या धर्मदाय नेत्रपेढीत ही नेत्रदान प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.या सेवाभावी कार्यात दांडगे परिवारातील श्रीकांत दांडगे,संगीता वानखडे,सतीश दांडगे, ॲड. नरेश पारडशिंगे तसेच परिवारातील इतर सदस्यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. दिशा ग्रुप व दिशा इंटरनॅशनल आय बँकेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी गौरी दांडगे यांना श्रद्धांजली अर्पण केली. नेत्रदानाचे पवित्र कार्य केल्याबद्दल संचालक मंडळाद्वारे दांडगे कुटुंबियांचे आभार व्यक्त करण्यात आले.

# 'श्री खाटू श्याम' देखाव्याने आझाद हिंद मंडळ उजळले

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती

**अमरावती/ का.प्र.**




गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आझाद हिंद मंडळ, बुधवारा यांच्या वतीने साकारण्यात आलेल्या भव्य आणि आकर्षक 'श्री खाटू श्याम' देखाव्याचे उद्घाटन करण्यात आले. या उद्घाटन सोहळ्याला प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.उद्घाटन जिल्हाधिकारी आशिष येरेकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी आणि अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांच्या हस्ते करण्यात आले. आकर्षक सजावट, कलात्मक मांडणी आणि धार्मिक वातावरणामुळे हा देखावा भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे.

उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी आझाद हिंद मंडळाच्या उपक्रमाचे कौतुक केले. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक एकोपा, सांस्कृतिक परंपरा आणि जनजागृतीचा संदेश देणारा उत्सव व्हावा, यासाठी मंडळांकडून करण्यात येणारे प्रयत्न महत्त्वपूर्ण असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.दरम्यान, 'श्री खाटू श्याम' देखावा पाहण्यासाठी परिसरातील नागरिक तसेच शहरातील भाविक मोठ्या संख्येने भेट देत आहेत. धार्मिक श्रद्धा आणि कलात्मकतेचा सुंदर संगम साधण्यात आल्याने हा देखावा गणेशोत्सवातील प्रमुख आकर्षण ठरत आहे.या कार्यक्रमप्रसंगी गणेशोत्सवाचे अध्यक्ष सचिन वानखडे, कार्याध्यक्ष दीपक साहू सम्राट, स्वागताध्यक्ष प्रवीण मानेकर, उपाध्यक्ष विजय अग्रवाल, नितीन पांडेय, विनोद वैद्य, अब्दुल रफ्फू पत्रकार, ज्ञानेश्वर हिवसे, मंडळाचे कार्याध्यक्ष विलास इंगोले, उपाध्यक्ष अनंतराव गुडे, डॉ. किशोर फुले, सचिव दिलीप कालोती, कोषाध्यक्ष दिलीप दाभाडे, ज्येष्ठ सदस्य राजाभाऊ माजलगावकर, प्रदीप वडनेरे, विवेक कालोती, संतोष बद्रे, किशोर बोराटणे, प्रा. गणेश मालोकार, तसेच मंडळाचे ज्येष्ठ सदस्य भूषण पुसतकर, प्रसाद मोरे, रामाभाऊ चावंडे, दिवाकर चिखलकर, नितीन सराफ, ॲड. विजय संगेकर, मयूर जलतारे, राजेश जायदे, जयंत कालोती, नंदू गुम्बळे, निलेश सराफ, गुड्डू ढोले, संतोष चिखलकर, अजय इंगोले, उदापुरे बंधू, भैया इंगोले, अण्णा करणे, नितीन इंगोले, पांडुरंग रायकवार, राजू हिरपूरकर, सुनील महल्ले, संजय हिरपूरकर, नंदू माकवाने, सुरेश चिखलकर, अशोक बामणगांवकर, ॲड. चंदू डोरले, डॉ. संजय तिरथकर, विशाल फाटे, डॉ. आकाश मोरे, विनोद घोडेगावकर, दीपक इंगोले, किरण उदापुरे, उमेश देशमुख, संजय कदम, नितीन फुसे, मनीष चौधरी, मनीष काजणेकर, अमित काजणेकर, अवी अनासने, संदीप कुटारिया, राजू बोराटणे, सुरेश वैश्य, मदन पुसतकर, नाना उदापुरे, राजा पिंजरकर, सतीश बद्रे, सागर इंगोले, रोशन पुसतकर, अनिकेत नवघरे, किशोर पुसतकर, संजय गुम्बळे, नितीन कोहळे, रवि पाटमासे, सचिन कोहळे, मुन्ना दुलारे, किरण विंचूरकर, प्रेमानंद पुसतकर, अजय पुसतकर, रेवण पुसतकर, प्रथमेश बाखडे, कृष्णा हिवसे, आर्यन ढोले, वेदांत डांगे, राहुल कथलकर, योगेश पुंड, सचिन भेरडे, अशोक पोहेकर, राहुल चिखलकर, विजू गावंडे, सुनील तिप्पट, संजय पाटील यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त

### विद्यापीठात केशव सिताराम ठाकरे जयंती



**अमरावती**-संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात केशव सिताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करून विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, उपकुलसचिव मंगेश वरखेडे, सहा. कुलसचिव रविंद्र सयाम तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व प्रबोधनकार ठाकरे यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

### श्री चक्रधर स्वामी अवतार दिन



**तिवसा**-स्थानिक श्री राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय, तिवसा येथे महानुभाव पंथाचे प्रवर्तक सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांचा अवतार दिवस अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रामुख्याने आमदार राजेश वानखडे प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांच्या शुभहस्ते श्री चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून हारार्पण करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी स्वामींच्या चरणी लीन होऊन अभिवादन केले.आमदार राजेश वानखडे यांनी आपल्या मार्गदर्शनात श्री चक्रधर स्वामी यांच्या सामाजिक आणि आध्यात्मिक कार्याचा गौरव केला. स्वामींनी दिलेली समता, बंधुता आणि अहिंसेची शिकवण आजच्या काळातही तितकीच प्रासंगिक आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.या कार्यक्रमाला तिवसा येथील जैष्ठ नागरिक माळोदे काका, संजय देशमुख,पप्पू देशमुख,तेजस्विनी वानखडे, अजय गुल्हाने, आकाश देशमुख, सुमित अनासाने, मयूर वानखडे,आकाश सिंग बावरी,राहुल धडांगे,मोनिका येवले, प्रणाली कमळापुरे, विशाल गडलिंग, रोशन डगवार व वाचनालयाचे पदाधिकारी तसेच परिसरातील नागरिक आणि वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### डॉ.तन्मय बुब यांचे व्याख्यान



**अमरावती**- महाराष्ट्र होमिओ डॉक्टर्स असोसिएशन तर्फे हॉटेल ओक राजापेठ अमरावती येथे डॉ तन्मय बुब यांचे उच्चरक्तदाब या विषयावर व्याख्यान घेण्यात आले.या वेळी मंचावर MHDA संघटनेच्या अध्यक्षा डॉ स्वाती लबडे - पडोळे, सचिव डॉ नंदकिशोर भूतडा, PP फोरम अध्यक्ष डॉ शशांक दुबे, लेडीविंग चेअरपर्सन डॉ शीतल आचार्य प्रकल्प प्रमुख डॉ विपुल भट्टड, प्रमुख अतिथी डॉ राजेश बुब, CME स्पीकर डॉ तन्मय बूब उपस्थित होते.दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली. मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. डॉ विपुल भट्टड यांनी कार्यक्रमाचा अहवाल सादर केला व डॉ राणी चौधरी यांनी सहप्रकल्प प्रमुख म्हणून त्यांना मदत केली.डॉ तन्मय बुब यांनी अतिशय सुंदर आणि सोप्या शब्दात उच्च रक्तदाब या विषय मार्गदर्शन केले.संचालन डॉ विकी आणि डॉ स्नेहा पिंजणी यांनी केले.संघटनेचे पूर्वाध्यक्ष डॉ राधेश्याम मालानी यांच्या वाढदिवस देखील साजरा करण्यात आला.संघटनेकडून डॉ राजेश बूब व डॉ तन्मय बूब यांच्या शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.कार्यक्रमाला संघटनेचे पूर्वाध्यक्ष, उपाध्यक्ष, तालुका प्रतिनिधी, महिला डॉक्टर्स मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमांची माहिती संघटनेच्या प्रसिद्धी प्रमुख डॉ वैशाली टेम्भे आणि सहप्रसिद्धी प्रमुख डॉ प्रज्ञा घाटोळ यांनी दिली.

# २,५६० शेतकऱ्यांना आता दिवसा मिळणार वीज

## ३३ केव्ही सावळापूर–आसेगाव पूर्णा लिंक लाईनचे काम पूर्ण

### आपत्कालीन परिस्थितीत बॅकफीडिंगचीही सुविधा

**आसेगाव पूर्णा/ वार्ताहर**



डीपीडीसी योजनेअंतर्गत १२ किलोमीटर लांबीच्या ३३ केव्ही सावळापूर–आसेगाव पूर्णा लिंक लाईनचे काम पूर्ण झाले आहे. या नवीन वीजवाहिनीमुळे आसेगाव पूर्णा परिसरातील कृषी ग्राहकांना मोठा दिलासा मिळणार असून, २,५६० शेतकऱ्यांना दिवसा शेतीसाठी वीजपुरवठा उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे.

या कामासाठी कार्यकारी अभियंता विकास शाहदे यांच्या मार्गदर्शनाखाली उपकार्यकारी अभियंता उमेश राठोड (सिटी-१) तसेच सहायक अभियंता गौरव निस्ताने यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या लिंक लाईनमुळे ३३/११ केव्ही आसेगाव आणि ३३/११ केव्ही सावळापूर उपकेंद्रे परस्पर जोडली गेली आहेत. त्यामुळे विविध कृषी वाहिन्यांवरील वीजपुरवठ्याचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. शेतीसाठी रात्रीच्या वीजपुरवठ्यावर अवलंबून राहण्याची गरज कमी होऊन शेतकऱ्यांना दिवसा सिंचन करता येणार असल्याने त्यांच्या अडचणी कमी होण्याची अपेक्षा आहे.


**सहा कृषी वाहिन्यांना थेट लाभ**

या प्रकल्पाचा परिसरातील सहा प्रमुख कृषी वाहिन्यांवरील एकूण २,५६० कृषी ग्राहकांना थेट लाभ मिळणार आहे. दिवसा वीज उपलब्ध झाल्याने सिंचनाचे नियोजन अधिक सोयीचे होणार असून कृषी कामकाजातही सुलभता येणार आहे.

**बिघाडाच्या काळात पर्यायी वीजपुरवठा**

या प्रकल्पाचा आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे बॅकफीडिंगची पर्यायी व्यवस्था निर्माण झाली आहे. आसेगाव आणि सावळापूर उपकेंद्रे लिंक लाईनद्वारे जोडली गेल्याने एखाद्या उपकेंद्रात तांत्रिक बिघाड किंवा आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास दुसऱ्या बाजूने वीजपुरवठा सुरू ठेवण्याचा पर्याय उपलब्ध राहणार आहे.त्यामुळे कृषी वाहिन्यांवरील वीजपुरवठ्याची विश्वासार्हता वाढण्यास मदत होणार असून, शेतकऱ्यांना नियमित व सुरळीत वीजपुरवठा मिळण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे. दिवसा वीजपुरवठा आणि बॅकफीडिंगची सुविधा उपलब्ध झाल्याने आसेगाव पूर्णा परिसरातील कृषी क्षेत्राला या नव्या वीजवाहिनीचा मोठा फायदा होणार आहे.

# 'पार्थिव' गणेशाच्या परंपरेचा पुनर्शोध



गल्लीतून येणाऱ्या ढोल-ताशांचा आवाज, दारातली फुलांची आरास, उदबत्तीचा दरवळ आणि स्वयंपाकघरातून येणारा मोदकांचा गोड सुगंधष्ठ बाप्पांच्या आगमनाने घराचे वातावरणच बदलून गेले होते. काही क्षणांपूर्वीची लगबग आता आरतीच्या स्वरांत विरली होती. फुलांनी सजलेल्या मखरात बाप्पा विराजमान झाले होते आणि प्रत्येकाच्या चेहऱ्यावर एक वेगळेच समाधान खुलले होते. आरती संपली. घरातली लगबग थोडी शांत झाली. अथर्व मात्र बाप्पांसमोरच बसून राहिला. बराच वेळ त्या मूर्तीकडे पाहिल्यानंतर त्याने आईला विचारले..'आई, बाप्पांच पाण्यात विसर्जन का करतो गं आपण?'.

प्रश्न छोटासा होता; पण त्यात गणेशोत्सवाचा एक गहन अर्थ दडला होता. कारण ज्याला आपण इतक्या प्रेमाने देवत्व देऊन घरी आणतो, तो बाप्पा सुरुवातीला मात्र असतो पृथ्वीच्या कुशीतली साधी माती. त्या मातीला कलाकाराचा स्पर्श मिळतो, आकार मिळतो आणि आपल्या श्रद्धेने त्यात गणरायाचे रूप साकारते. काही दिवस तो आपल्या घराचा लाडका सदस्य बनतो आणि मग विसर्जनाच्या वेळी पुन्हा निसर्गाच्या कुशीत परततो. मातीपासून देवत्वाकडे आणि देवत्वापासून पुन्हा निसर्गाकडे हा केवळ मूर्तीचा प्रवास नाही; हा श्रद्धा, परंपरा आणि निसर्ग यांना जोडणारा एक सुंदर दुवा आहे.

'पार्थिव' म्हणजे पृथ्वीतलावरील मातीचा वापर करून बनलेली गणेशाची मूर्ती. पण माती म्हणजे केवळ धुळीचे कण नाहीत. ती एक जिवंत परिसंस्था आहे. तिच्यात खनिजांचे कण, पाणी, हवा, सेंद्रिय पदार्थ आणि असंख्य सूक्ष्मजीव असतात. जीवाणू, बुरशी, शैवाळ यांसारखे सूक्ष्मजीव सेंद्रिय पदार्थांच्या विघटनात, पोषकद्रव्यांच्या चक्रात आणि वनस्पतींच्या वाढीसाठी आवश्यक असलेल्या अनेक जैवरासायनिक प्रक्रियांमध्ये सहभागी असतात. आपल्या पायाखाली दिसणारी माती वरून साधी वाटते; पण तिच्या कुशीत असंख्य जीवांची अखंड लगबग सुरू असते आणि याच मातीतून गणपतीची मूर्ती घडवली जाते, यात एक सुंदर प्रतीक दडलेलं आहे. ते म्हणजे जीवनाला आधार देणाऱ्या मातीतून देवाचं रूप घडतं आणि तेच रूप पुन्हा मातीत विलीन होते.

**विज्ञानाच्या आधीचे निसर्गज्ञान**

आज आपल्याकडे सूक्ष्मदर्शक आहेत, प्रयोगशाळा आहेत. मातीतील सूक्ष्मजीव, सेंद्रिय पदार्थांचं विघटन, पोषकद्रव्यांचं चक्र , जैव रासायनिक प्रक्रिया यांचा शास्त्रीय अभ्यास आपण सहजपणे करू शकतो. पण पूर्वीच्या माणसाकडे ही आधुनिक साधनं नव्हती, तेव्हाही त्याच्याकडे होतं निसर्गाचं बारकाईने निरीक्षण करण्याची कला.

माती ओलसर झाल्यावर तिच्यात होणारे बदल, सेंद्रिय पदार्थ मिसळल्यानंतर जमिनीची बदलणारी गुणवत्ता, शेणखताचा पिकांवर होणारा परिणाम, सूक्ष्मजीव आणि मातीचा पोत, पावसाळ्यानंतर जमिनीतील बदल या सगळ्या गोष्टी अनुभवाच्य ज्ञानानी पिढ्यान्पिढ्या अवगत होत गेल्या. गोमयाचा वापरही शेती आणि मातीच्या संदर्भात अनेक पारंपरिक पद्धतींमध्ये होत आला आहे. योग्य प्रकारे तयार केलेल्या शेणखतात सेंद्रिय पदार्थ आणि विविध सूक्ष्मजीव असतात, जे मातीतील जैविक प्रक्रियांना मोलाचा हातभार लावू शकतात हे माणसाला समजलं, याचा अर्थ पूर्वजांना आधुनिक अर्थाने 'सूक्ष्मजीवशास्त्र' संपूर्णपणे माहीत होते,असा होत नाही. पण त्यांची निसर्गातले बदल, अनुभव, वातावरणातल्या चढउतारानं बदलणारा मातीचा पोत ओळखण्याची त्यांची क्षमता निश्चितच उल्लेखनीय होती.

**विसर्जनातून नवी सुरुवात**

गणपती बाप्पाच्या स्थापनेच्या वेळी साध्या मातीला आकार मिळतो. डोळे, कान, सोंड, मुकुट यांतून देवत्व साकार होते. काही दिवस त्या रूपाची भक्तीभावाने पूजा होते. घर आनंद, उत्साह आणि आपलेपणानं भरून जातं. आणि मग विसर्जनाचा दिवस येतो. मूर्ती पाण्याच्या संपर्कात येते. माती भिजते, मऊ होते आणि नैसर्गिक परिस्थितीत हळूहळू पुन्हा निसर्गाच्या चक्रात सामील होते. ही प्रक्रिया आपल्याला निसर्गाचा एक साधा पण गहन नियम सांगते.

निसर्गात काहीही कायम एका रूपात राहात नाही; किंबहुना राहू शकत नाही. मातीपासून रूप, रूपातून पुन्हा माती आणि त्या मातीतून पुन्हा जीवन. म्हणून पार्थिव गणेशाचे विसर्जन म्हणजे केवळ निरोप नाही; तो निसर्गाने निसर्गाकडे परतण्याचा प्रवास आहे.

इथेच आधुनिक काळाने आपल्यासमोर एक महत्त्वाचा प्रश्न उभा केला आहे. आजची युवा पिढी पर्यावरणीय हिताचा विचार करून शाडू मातीच्या बाप्पाच्या मूर्ती कडे वळली असली तरी, मूर्ती मातीची असली तरी तिच्यावर वापरलेले कृत्रिम रंग, प्लास्टिक, थर्माकोल किंवा इतर अविघटनशील सजावटीचे घटक पर्यावरणावर परिणाम करू शकतात. म्हणून पर्यावरणपूरक गणेशोत्सव म्हणजे केवळ मातीची मूर्ती आणणे नव्हे. मूर्ती कोणत्या पदार्थाची आहे, रंग कोणते आहेत, सजावट कशाची आहे, निर्माल्याचे व्यवस्थापन कसे होते आणि विसर्जन कशा पद्धतीने केले जाते या प्रत्येक टप्प्याचा विचार करणे अत्यावश्यक आहे.श्रद्धा जपताना निसर्गाची किंमत मोजावी लागू नये, एवढीच किमान अपेक्षा.

आपण श्रीगणेशाला 'विघ्नहर्ता' म्हणतोष्ठ आपल्या आयुष्यातील अडथळे दूर करणारा. मग त्याची पूजा करताना प्रत्येकानं स्वतःलाही एक छोटासा प्रश्न विचारायला हवा की, आपल्या अविचारी कृतींमुळे निसर्गासाठी नवी विघ्नं तर निर्माण होत नाहीत ना? ज्याला आपण 'विघ्नहर्ता' म्हणतो, त्याचाच उत्सव साजरा करण्याच्या आपल्या उत्साहामुळे नदी, तलाव, माती आणि जलजीवनासाठी संकट निर्माण होऊ नये, हीदेखील आपलीच जबाबदारी आहे.ही जबाबदारी श्रद्धेच्या आड येणारी नाही; उलट श्रद्धेला कृतीची जोड देणारी आहे.

उत्सवात आनंद हवा, भक्ती हवी, परंपरा हवी पण त्या आनंदाची किंमत निसर्गाने चुकवू नये.विसर्जनाबरोबर केवळ मूर्ती नाही, तर निसर्ग जपण्याची जाणीवही आपल्या मनात रुजली तर? कदाचित हाच बाप्पांचा खरा आशीर्वाद असेल.

**अपूर्वा सिरसीकर**
**देऊळगांवकर**

## जय मातादी..!

गणेश गौराईचा उत्सव
फुलवी भक्तिचा मळा
मनी आत्म समाधानाचा
आनंद मिळे वेगळा ....!

संसाराचा गाडा ओढता
मन जेंव्हा जेंव्हा हारते
भिऊ नकोस आहे पाठीशी
हे आश्वासन उभारी देते ..

श्री गणेश महालक्ष्मीदेवी
घरी होता विराजमान
क्लेश चिंता
समस्या मिटूनी
मिळे स्वास्थ
समृध्दी सन्मान..!

**प्रा.अशोक सारडा,** मेहकर
मो.९४२१३९४३३९

## गणराया आले आमच्या घरी

गणराया आले
आमच्या घरी,
झाला आनंद बहु या मनी;
रूप मोहक सुंदर त्यांचे,
सुख नांदले माझ्या अंगणी!

नेत्रांत दोन हिरे शोभती,
रूप नयनमनोहर भासती;
पाहाता रूप सुंदर त्यांचे,
मनाला अपार
शांती लाभती!

पार्वतीसुत, विघ्नहर्ता
गणराया,
तुझ्या येण्याने
आली नवचेतना;
भक्ती, प्रेम आणि
आनंदाने,
पूर्ण करिसी भक्तांची
भावना!

कृपा तुझी सदैव भक्तांवरी,
दर्शनाने लाभे नित्य
मनःशांती;
विघ्नहर्ता, तुझ्या
कृपाछायेत,
उजळे साऱ्यांच्या जीवनाची
कांती!

नित्य घडो माझ्या हातून,
गणनायका, अखंड तुझी
सेवा;
आम्हा भक्तांवर नित्य तुझा,
देवा, वरदहस्त कायम
ठेवा!

**अलका भवारी-कोंढवळे**
(खेड-पुणे )

# महाराष्ट्रात श्री गणेशाची साडेतीन पीठे

सर्व साधारणपणे सर्वांना महाराष्ट्रातील अष्टविनायक माहित आहेत. मात्र श्री गणेशाची साडेतीन पीठे आहेत.ही माहिती फार कमी लोकांना माहीत आहे.महाराष्ट्रामध्ये श्री गणेशाची साडेतीन पीठे आहेत.

मोरगावी कमलासुराचा मयुरेश्वराने वध केला. त्याचे शीर जिथे पडले ते प्रथम पीठ म्हणजे मोरगाव.जिथे कमरे पर्यंतचा धडाचा भाग पडला. ते राजूर गांव दुसरे पीठ .कमरे पासून पाया पर्यंतचा भाग जिथे पडला. ते पद्मालय हे तिसरे पीठ होय. महान गाणपत्य मोरया गोसावी यांना नदीत स्नान करताना, त्याच्या ओंजळीत गणपतीची मूर्ती आली.ही मूर्ती घेऊन मोरया गोसावी, भाद्रपद व माघी चतुर्थीला मोरगांवी जात असत. मोरगावचा मोरेश्वर चिंचवडी आला. म्हणून हे अर्ध पीठ ओळखले जाते.'गणपती बाप्पा मोरया' हा घोष तेव्हा पासून सुरु झाला.







**पहिले पीठ श्रीक्षेत्र मोरगाव**

'भूस्वानंदपूर' म्हणजेच आजचे प्रचलित 'मोरगाव'.गाणपत्य सांप्रदायाचे आद्यपिठ मोरगाव.या क्षेत्राचा आकार मोरासारखा आहे.ब्रम्ह,विष्णू,महेश, सूर्य व शक्ती या पाचदेवांनी ॐकार स्वरूपी गणेशाची तिथे स्थापना केली.उन्मत्त सिंदुरासुराचा वध केला. या दिवशी तेथे मोठा उत्सव होतो. येथे श्रु गणेशा पुढे नंदी आहे. हे येथिल वैशिष्ठ्य आहे.

**दुसरे पीठ श्रीक्षेत्र राजुर (जालना)**

श्री राजूरेश्वर - राजूर म्हणजेच पूर्वीचे राजापूर. वरण्य राजाचा राजवाडा या भागात होता. कृष्णाच्या तोंडून म्हणजेच प्रत्यक्ष भगवंताच्या तोंडून अर्जूनाने गीता ऐकली. तद्वत साक्षात गणेशाने आपल्या मुखातून वरण्य राजाला गणेशगीता सांगितली. त्यामुळे गाणपत्य सांप्रदायात या स्थानाला फार महत्व आहे. राजा वरण्याने प्रतिष्ठापना केलेल्या या क्षेत्राला राजूरचा 'महागणपती' म्हणतात.मराठवाड्यातील जालन्या पासून २२ कि.मी. वर हे क्षेत्र आहे. राजूर गावानजीक एका टेकडीवर, हे श्री गणेश मंदिर असून येथे वरण्य राजाची मूर्ती आहे. या ठिकाणाला गड म्हणतात.हा गणपती नवसाच्या समईला पावतो अशी आख्यायिका आहे. येथील श्री . गणेश मुर्ती पुढे अंदाजे, सव्वाशे समया रोज तेवत असतात. शेकडो समई मधील ज्योतींच्या मंद व मंगल प्रकाशात, ही मूर्ती फारच विलोभनीय दिसते. पराशर ऋषींच्या आश्रमातून श्री गणेशाला वरण्य राजाने, चैत्र शु.प्रतिपदेला राजूर (राजापूर) येथे आणले, म्हणून गुढीपाडव्याला या गणेशाचे दर्शन घेणे ही पर्वणी मानली जाते.

**तिसरे पीठ पद्मालय (जळगाव)**

पद्मालय येथे दोन गणेश मूर्ती आहेत. महान दत्तभक्त सहस्त्रार्जुनाने स्थापन केलेला 'प्रवाळ गणेश'. त्याच्या शेजारी शेषाने स्थापन केलेला 'धरणीश्वर गणेश'. यातील गणेशाची मूर्ती एक उजव्या सोंडेची व दुसरी डाव्या सोंडेची आहे. जळगाव जिल्ह्यातील एरंडोल गावापासून ८ कि.मी. वर पद्मालय आहे. हे मंदिर डोंगरावर असून, तेथील तलावात विविध प्रकारची पद्म (कमळे) फुलतात. म्हणून या क्षेत्राला 'पद्मालय' असे नाव पडले.

समुद्रमन्थनाच्या वेळी शेष समुद्रतळाशी होता. अमृत कुंभ देवांना आपल्यामुळे मिळाला असा अहंकार त्याला निर्माण झाला. त्याचा अहंकार पाहून संतप्त होऊन शिवाने त्याला खडकावर आपटले. त्याच्या डोक्याचे दहा तुकडे झाले. नारदाने त्याचे सांत्वन करून, त्याला गणेश उपासना करावयास सांगितले. त्यानुसार त्याने ती केली. गणेश त्यावर प्रसन्न झाले. तू सहस्त्रवदन होशील.तसेच माझा सहवास तुला लाभावा. यासाठी मी तुला माझ्या उदरावर धारण करीन. तसेच पृथ्वी तू तुझ्या फण्यावर ,फुलासारखी तोलून धरशील. असा आशीर्वाद दिला. म्हणून शेषाने स्थापन केलेल्या मूर्तीला 'धरणीश्वर गणेश' म्हणतात.

**अर्धपीठ श्रीक्षेत्र चिंचवड**

**चिंचवड** - चिंचवड हे गणपती क्षेत्र पुराणोक्त नाही. महान गाणपत्य साधू मोरया गोसावी यांच्या मुळे, या स्थानाला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. मोरया गोसाव्यांना मोरगाव येथे करा नदीत स्नान करताना, श्री . गणेश तांदळाच्या स्वरुपात आला. तो घेऊन ते मोरगांवी वारी करीत असत. सध्या तो तांदळा चिंचवड येथे देऊळवाड्यात आहे. मोरया गोसावींनी मार्गशीर्ष वद्य षष्ठी शके १३८३ रोजी जिवंत समाधी घेतली.अशा प्रकारे श्री.गणेशाची साडे तीन पीठे महाराष्ट्र आहेत.


**राजाभाऊ देशमुख**
चांदूरबाजार

# गणपती बाप्पाला २१ मोदक अन् २१ दुर्वाच का?

गणेशोत्सवाच्या दिवसांत श्रीगणेशाला २१ मोदकांचा नैवेद्य दाखवण्याची आणि २१ दुर्वांची जुडी वाहण्याची प्राचीन परंपरा आहे. परंतु, गणपतीच्या पूजेत २१ या संख्येलाच एवढे अनन्यसाधारण महत्त्व का दिले गेले आहे? यामागे पौराणिक कथांसोबतच आरोग्यदायी कारणेही दडली आहेत.

२१ मोदकांचा नैवेद्य का?

पौराणिक कथेनुसार, एकदा महर्षी अत्री आणि त्यांच्या पत्नी अनुसया यांच्या आश्रमात श्रीगणेश गेले होते. बाप्पाला तीव्र भूक लागली होती. माता अनुसया यांनी गणपतीला अनेक पक्वान्ने वाढली, परंतु बाप्पाची भूक काही केल्या शमली नाही.त्यानंतर अनुसया यांनी विचार करून गणपतीसमोर एक लहानसा



'मोदक' वाढला. तो एकच मोदक खाताच गणपती बाप्पाचे पोट पूर्ण भरले आणि त्यांनी तृप्तीची मोठी ढेकर दिली. बाप्पांसोबतच स्वर्गातील देवराज इंद्रासह सर्व ३३ कोटी देवांचे पोट भरले आणि तेही तृप्त झाले.हे पाहून माता अनुसया यांनी जाहीर केले की, 'इथून पुढे गणपतीला जो कोणी २१ मोदकांचा नैवेद्य दाखवेल, त्याच्यावर बाप्पा नेहमी प्रसन्न राहतील आणि संपूर्ण जगाला तृप्तीचा आनंद मिळेल.'

**२१ दुर्वाच का वाहतात?**

दुर्वा अर्पण करण्यामागे 'अनलासुर' नावाच्या राक्षसाची कथा प्रसिद्ध आहे. अनलासुर नावाचा दैत्य ऋषीमुनी आणि मानवांना जिवंत गिळत असे. त्याच्या त्रासापासून मुक्ती मिळवण्यासाठी सर्व देवांनी श्रीगणेशाचा धावा केला.श्रीगणेशाने अनलासुराचा वध करण्यासाठी त्याला जिवंत गिळले. मात्र, त्यामुळे गणपतीच्या पोटात प्रचंड आग (दाह) होऊ लागली. अनेक उपचारांनंतरही बाप्पाच्या पोटातील जळजळ कमी होत नव्हती. तेव्हा ८८ हजार ऋषीमुनींनी एकत्र येऊन प्रत्येकी २-२ अशा एकूण २१ दुर्वांच्या जुड्या गणपतीच्या मस्तकावर ठेवल्या. दुर्वांचा थंड गुणधर्म आणि ऋषींचे प्रेम यामुळे गणपतीच्या पोटातील दाह त्वरित शांत झाला. तेव्हापासून गणपतीला २१ दुर्वा वाहण्याची प्रथा सुरू झाली.

**आरोग्यदायी आणि वैज्ञानिक महत्त्व**

शरीरातील उष्णता नियंत्रण: दुर्वा ही अत्यंत गुणकारी वनस्पती आहे. ती शरीरातील उष्णता कमी करते. भाद्रपद महिन्यात ऋतू बदलामुळे होणाऱ्या त्रासांवर दुर्वांचे सेवन किंवा स्पर्श गुणकारी मानला जातो.

२१ घटकांचे प्रतीक: आयुर्वेदानुसार आपल्या शरीरात ५ ज्ञानेन्द्रिये, ५ कर्मेन्द्रिये, ५ प्राण, ५ महाभूते आणि १ मन असे एकूण २१ घटक असतात. २१ दुर्वा किंवा मोदक अर्पण करणे म्हणजे आपले हे २१ घटक (पूर्ण अस्तित्व) ईश्वराच्या चरणी समर्पित करणे होय.त्यामुळेच गणपती बाप्पाच्या पूजेत २१ मोदक आणि २१ दुर्वा अर्पण करून भक्त आपल्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी बाप्पाला साकडे

दिवाळी विशेषांक - २०२६
दरवर्षी प्रमाणे यंदाही आम्ही 'जनमाध्यम'दिवाळी विशेष अंक प्रकाशित करणार आहोत. या अंकाच्या माध्यमातून आम्ही नवसाहित्यीकांना व्यासपीठ मिळवून देणार आहोत. साहित्यीकांचे राजकीय, सामाजिक, वैचारिक लेख, कविता, व्यंगचित्र, चारोळ्या, संवाद, प्रतिक्रिया आदी साहित्य प्रसिद्ध करण्यात येणार आहे. हा अंक आमच्या ऑनलाईन पोर्टलवर सुद्धा उपलब्ध राहणार आहे. सदर दिवाळी अंक हा फक्त दिवाळीच्या पाच दिवसात वाचून संपावा असा नसून एक संग्राह्य असा आहे. तरी या दिवाळी अंकाकरिता आपल्या बोलीभाषेतून दर्जेदार साहित्याचा समावेश करावा अशी दैनिक 'जनमाध्यम' तर्फे विनंती...आपले साहित्य atimadhyam@gmail.com या ई-मेल वर किंवा ९८२२६६४०६७ या व्हाट्सअ‍ॅप नंबर वर पाठवावे. तसेच कागदावर लिहिलेले साहित्य हे जनमाध्यम कार्यालय, तिसरा माळा अनगळ कॉम्प्लेक्स, राजकमल चौक येथे पाठवू शकता. येणारे साहित्य अंकामध्ये वापरण्याचा अधिकार 'जनमाध्यम'कडे राखीव राहील.इच्छुक लेखकांनी आपले साहित्य दि. २० ऑक्टो. २०२६ पर्यंत जनमाध्यम कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावे.

# मोदकात दडले 'मोद'चे गमक!



गणरायाला मोदक का प्रिय? -- बुद्धी आणि ज्ञानाचे दैवत असलेल्या गणरायाला मोदकच का प्रिय मानला जातो, यामागे केवळ परंपरा नसून त्याला पौराणिक आणि प्रतीकात्मक अर्थही जोडलेला आहे. 'मोदक' हा शब्द संस्कृतमधील 'मोद' या शब्दाशी संबंधित मानला जातो. 'मोद' म्हणजे आनंद, प्रसन्नता. त्यामुळे मोदक हा आनंद आणि समाधानाचे प्रतीक मानला जातो. गणपती हे बुद्धी, विवेक आणि शुभत्वाचे दैवत असल्याने त्यांच्या पूजेत मोदकाला विशेष स्थान मिळाले.

एका पौराणिक कथेनुसार, माता पार्वतीने गणपती आणि कार्तिकेय यांना दिव्य मोदक दिला होता. हा मोदक ज्ञान आणि बुद्धी देणारा असल्याची मान्यता होती. तो कोणाला द्यायचा, यावरून दोन्ही भावांमध्ये श्रेष्ठत्वाची परीक्षा घेण्यात आल्याची आख्यायिका सांगितली जाते. या कथेला विविध पुराण परंपरांमध्ये वेगवेगळी रूपे आढळतात. मोदकाच्या आकारालाही आध्यात्मिक अर्थ दिला जातो. बाहेरून साधे आवरण, तर आत गोड सारण असते. बाह्य रूपापेक्षा अंतःकरणातील ज्ञान, सद्?गुण आणि आनंद महत्त्वाचा असल्याचा संदेश त्यातून घेतला जातो. -- २१ मोदकांची परंपरा गणपतीला २१ मोदक अर्पण करण्याची प्रथा अनेक ठिकाणी आहे. २१ हा अंक शुभ मानला जातो. काही परंपरांमध्ये २१ पत्री, २१ दुर्वा आणि २१ मोदक अर्पण केले जातात. ही सर्वत्र अनिवार्य धार्मिक आज्ञा नसून प्रचलित श्रद्धा आणि परंपरा आहे. म्हणूनच गणेशोत्सवात मोदक अर्पण करताना भक्त केवळ गोड पदार्थ नव्हे, तर ज्ञान, बुद्धी, सुख आणि समाधानाचीच प्रार्थना करतो.



# गौरीपूजन...

गणेशोत्सवाच्या आनंदात भर घालण्यासाठी भाद्रपद महिन्यात बाप्पाच्या पाठोपाठ पाहुणचाराला ज्येष्ठा-कनिष्ठा गौरी आणि त्यांची बाळे येतात. भाद्रपद शुद्ध अष्टमीला धनधान्य आणि ऐश्वर्याची देवता मानल्या जाणाऱ्या गौरीचा (महालक्ष्मी) उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. प्रत्येक प्रांतानुसार आणि कुलपरंपरेनुसार गौरी आवाहनाची पद्धत वेगवेगळी असली, तरी सर्वसाधारणपणे हा उत्सव तीन टप्प्यांत साजरा होतो.

गौरी पूजन (१८ सप्टेंबर २०२६, शुक्रवार): या दिवशी दिवसभरात कधीही ज्येष्ठा नक्षत्रावर पूजन करता येईल. गौरी विसर्जन (१९ सप्टेंबर २०२६, शनिवार): मूळ नक्षत्रावर सकाळी ६ वाजून २७ मिनिटांपासून ते संध्याकाळी ६ वाजून ३८ मिनिटांपर्यंत विसर्जन केले जाईल. आगमन पद्धत: जिच्या हातात गौरीची प्रतिमा असते, त्या स्त्रीचे पाय दुधाने व पाण्याने धुतले जातात आणि पायांवर कुंकवाचे स्वस्तिक काढले जाते. लक्ष्मीच्या पायांचे ठसे: दरवाज्यापासून ते स्थापना करण्याच्या जागेपर्यंत लक्ष्मीच्या पायांचे ठसे उमटवत मुखवटे आणले जातात. यावेळी ताट-चमचा किंवा घंटेचा नाद केला जातो.समृद्धीची ओळख: गौरीची स्थापना करण्यापूर्वी त्यांना घरातील तिजोरी, दुध-दुभत्याची जागा दाखवून घरावर अखंड आशीर्वाद राहण्याची प्रार्थना केली जाते.

विविध रूपे: काही ठिकाणी धातूचे/मातीचे मुखवटे, सुघट, तर काही भागात तेरड्याची रोपे एकत्र बांधून त्यावर मुखवटा चढवून साडी-दागिन्यांनी सजवले जाते.

# खदान पोलिसांची हायप्रोफाइल जुगार अड्ड्यावर धाड!

## ऑपरेशन प्रहारअंतर्गत कारवाई; ९ वाहने, ८ मोबाईल व रोख रकमेसह २७.६२ लाखांचा मुद्देमाल जप्त

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील जुगार अड्ड्यांविरोधात पोलिसांनी सुरू केलेल्या 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत खदान पोलिसांनी येवता रोडवरील मलकापूर परिसरात मोठी कारवाई केली. क्लासमेट हॉटेल अँड बार परिसरात सुरू असल्याची माहिती मिळालेल्या कथित अवैध जुगार अड्ड्यावर धाड टाकून पोलिसांनी तब्बल २७ लाख ६२ हजार ८१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत आठ जणांना ताब्यात घेण्यात आले असून, एका अल्पवयीनाचाही समावेश असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. याशिवाय सहा जण फरार असल्याची माहिती आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १७ सप्टेंबर रोजी गोपनीय बातमीदाराकडून खदान पोलिसांना मलकापूर येथील क्लासमेट हॉटेल अँड बार परिसरात अवैध जुगार सुरू असल्याची माहिती मिळाली. माहितीची खातरजमा करून पोलिस पथकाने संबंधित ठिकाणी धडक कारवाई केली. यावेळी जुगार खेळत असल्याच्या आरोपावरून कुणाल सुनीलकुमार मनवानी (२६), कुशल विमलकुमार कायना (२१), जतीन सुनीलकुमार मनवानी (१९), दीपक परमानंद सिदारा (४१), निशांत मेघराज बजाज (२४), राहुल दौलत चौथानी (२५), आशीष चंदुलाल जसवानी (२८), रोशन अनिलकुमार राजपाल (२४) आणि वंश महेशकुमार टकरानी (१७ वर्षे ६ महिने) यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली.

कारवाईदरम्यान पोलिसांनी नऊ वाहने, आठ मोबाईल फोन आणि रोख रक्कम असा एकूण २७,६२,८१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. विशेष म्हणजे, या प्रकरणात सुमीत गुरबानी, पवन चेनानी, कौशिक प्रकाश शोधनानी, अमित बालचंदानी, जितेंद्र कमलकुमार खबरानी आणि विजय अहुजा हे सहा जण फरार असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

### गोपनीय माहिती अन् थेट धाड

जुगार अड्ड्यांवर कारवाई करताना पोलिसांना मिळणाऱ्या गोपनीय माहितीचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी विलंब न करता कारवाई केल्याने मोठ्या प्रमाणात मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले. त्यामुळे जुगार अड्डे चालविणाऱ्यांमध्ये या कारवाईने खळबळ उडाली आहे.

### 'ऑपरेशन प्रहार'ची धडक कायम

अकोला शहर व परिसरातील अवैध धंद्यांविरोधात पोलिसांकडून 'ऑपरेशन प्रहार' राबविण्यात येत आहे. जुगार, अवैध दारू तसेच इतर बेकायदेशीर कारवायांवर पोलिसांनी लक्ष केंद्रित केले आहे. खदान पोलिसांची ही कारवाई त्याच मोहिमेचा भाग असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक रेड्डी आणि शहर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक भाऊराव घुगे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. सहायक पोलीस निरीक्षक राहुल जंजाळ, पोलीस उपनिरीक्षक दीपक पवित्रकार यांच्यासह निलेश खंडारे, भूषण मोरे, गिरीष वीर, प्रवीण डोंगरे, अभिमन्यू सदांशिव, शिवम दुबे, मंगेश खेडकर, वैभव कस्तुरे आणि आकाश कठाणे यांनी कारवाईत सहभाग घेतला.

# ट्रक मालकाला २५.७९ लाखांची भरपाई; मॅग्मा इन्शुरन्सला ग्राहक आयोगाचा दणका

- ५ लाखांच्या एकरकमी प्रस्तावाला नकार
- ६ टक्के व्याजासह रक्कम देण्याचे आदेश

■ प्रतिनिधी | अकोला ■

अपघातात ट्रकचे संपूर्ण नुकसान झाल्यानंतर विमा कंपनीने केवळ पाच लाख रुपयांचा एकरकमी तडजोडीचा प्रस्ताव दिल्याच्या प्रकरणात अकोला जिल्हा ग्राहक निवारण आयोगाने तक्रारदाराच्या बाजूने निर्णय दिला. मॅग्मा जनरल इन्शुरन्स कंपनीने तक्रारदारास २५ लाख ७९ हजार ५२ रुपये ६ टक्के व्याजासह अदा करावेत, तसेच पाच हजार रुपये कायदेशीर खर्चापोटी द्यावेत, असे आदेश आयोगाने दिले.

अकोला येथील बाबू खान यांच्या मालकीच्या एमएच २७ बीएक्स ८३५८ क्रमांकाच्या ट्रकचा अपघात होऊन वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. संबंधित विमा पॉलिसीतील विमा घोषित मूल्य (आयडीव्ही) २७ लाख रुपये होते. मात्र, विमा कंपनीकडून केवळ पाच लाख रुपयांचा एकरकमी तडजोडीचा प्रस्ताव देण्यात आल्याने तक्रारदाराने ग्राहक आयोगात धाव घेतली.



**ॲड. शिवम शर्मा यांचा यशस्वी युक्तिवाद**

तक्रारदाराच्या वतीने ॲड. शिवम शर्मा यांनी आयोगासमोर युक्तिवाद केला. वाहनाचे नुकसान ७५ टक्क्यांपेक्षा अधिक असल्याने पॉलिसीतील 'कन्स्ट्रक्टिव्ह टोटल लॉस'च्या तरतुदी लागू होतात, असा मुद्दा त्यांनी मांडला. तसेच सर्व्हेअरच्या अहवालाच्या आधारे घसाऱ्याची मोठी वजावट करून विमा रक्कम कमी करण्याच्या विमा कंपनीच्या भूमिकेलाही त्यांनी आक्षेप घेत उघडे पाडले.

विमा कंपनीने तक्रारदाराकडून आवश्यक सहकार्य झाले नसल्याचा तसेच विलंब झाल्याचा बचाव घेत दावा बंद करण्याची भूमिका मांडली होती. मात्र, उपलब्ध कागदपत्रे आणि पॉलिसीच्या अटींच्या आधारे या भूमिकेवरही आयोगासमोर युक्तिवाद करण्यात आला.

प्रभारी अध्यक्ष श्रीपाद एस. कुळकर्णी आणि सदस्य संजय माणिक यांच्या आयोगाने प्रकरणातील मांडणी व कागदपत्रांचा विचार करून आदेश दिला. त्यानुसार २३ मे २०२५ रोजी तक्रार दाखल झाल्याच्या तारखेपासून प्रत्यक्ष रक्कम अदा होईपर्यंत ६ टक्के व्याज लागू राहणार आहे. ही रक्कम ४५ दिवसांच्या आत अदा करण्याचे निर्देशही आयोगाने दिले आहेत. या निर्णयामुळे विमा पॉलिसीतील तरतुदी, वाहनाचे प्रत्यक्ष नुकसान आणि विमा कंपनीकडून करण्यात येणाऱ्या वजावटी याबाबत ग्राहकांच्या हक्काचा मुद्दा पुन्हा अधोरेखित झाला आहे.

# अमली पदार्थ सेवन करणाऱ्यांवर पोलिसांचा बडगा



■ प्रतिनिधी | अकोला ■

**स्थानिक गुन्हे शाखेची शहरात विशेष मोहीम; विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत आठ जणांवर कारवाई**

अमली पदार्थांचे सेवन, विक्री आणि तस्करीला आळा घालण्यासाठी अकोला जिल्हा पोलिसांनी 'ऑपरेशन प्रहार'अंतर्गत कारवाईची मोहीम तीव्र केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुरुवारी, १७ सप्टेंबर रोजी अकोला शहरात विशेष मोहीम राबवून अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या आठ जणांविरुद्ध कायदेशीर कारवाई केली.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अमली पदार्थांविरोधात विविध पातळ्यांवर कारवाई सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अकोला शहरातील अकोट फाईल, जुने शहर, कोतवाली आणि रामदासपेठ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत तपासणी व कारवाई केली.

या मोहिमेदरम्यान चेतन संदीप शिंदे (२२, रा. देशमुख फेल, नंदू तायडे यांच्या घराजवळ), जमीरोद्दीन कामरोद्दीन (२४, रा. मर्गटजवळ, मोहतामिल), शैलेश मधुकर धांडे (४३, रा. महाकाली नगर, हरिहरपेठ), शंकर विजय लाखे (२१, रा. रमाबाई आंबेडकर नगर, जुने शहर), अब्दुल समद अब्दुल लतीफ (६०, रा. कादरीपुरा, अकोट फाईल), शेषराव रमेश वारोकार (३५, रा. पंचशील नगर, वाडेगाव, ता. बाळापूर), शिवशंकर अरुण सोनटक्के (४०, रा. धोतर्डी, ता. जि. अकोला) आणि शेख अफसर शेख अहमद (३८, रा. अशोक नगर, अकोट फाईल) यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली.

### तरुणाईला अमली पदार्थांच्या विळख्यातून वाचविण्याचे आव्हान

अमली पदार्थांचे सेवन शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम करू शकते. विशेषतः तरुणांमध्ये व्यसनाचे प्रमाण वाढल्यास त्याचा परिणाम कौटुंबिक तसेच सामाजिक जीवनावर होण्याची शक्यता असते. त्यामुळे अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांसोबतच त्यांची विक्री व तस्करी करणाऱ्यांवरही पोलिसांनी लक्ष केंद्रित केले आहे.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पाइप चोरणाऱ्या टोळीचा ग्रामीण पोलिसांकडून पर्दाफाश

**९ लाख ३९ हजारांचे ८२ पाइप जप्त; दोन आयशर ट्रक व फोरव्हीलर वाहनासह ४३ लाख ३९ हजारांचा मुद्देमाल ताब्यात, तिघांना अटक**

■ प्रतिनिधी | अकोट ■

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पोपटखेड गाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या कामासाठी ठेवण्यात आलेले पाइप चोरून नेणाऱ्या टोळीचा अकोट ग्रामीण पोलिसांनी पर्दाफाश केला. पोलिसांनी दोन आयशर ट्रक ताब्यात घेत ९ लाख ३९ हजार २२८ रुपये किमतीचे ८२ पाइप जप्त केले. यासह दोन आयशर ट्रक व एका फोरव्हीलर वाहनासह एकूण ४३ लाख ३९ हजार २२८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, या प्रकरणात तिघांना अटक करण्यात आली आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या निर्देशानुसार अकोट ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत मालमत्ता चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांकडून गस्त वाढविण्यात आली आहे. १४ सप्टेंबर रोजी रात्री नाईट ऑफिसर पोलीस पथकासह पेट्रोलिंग करीत असताना अकोली जहाँगीर फाट्याजवळ दोन आयशर ट्रकमधून काही व्यक्ती पाइप घेऊन जात असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांना पाहताच काही जण फोरव्हीलर वाहनातून घटनास्थळावरून पसार झाले. मात्र, पोलिसांनी दोन्ही आयशर ट्रक आणि त्यांच्या चालकांना ताब्यात घेतले. चालकांकडे पाइपबाबत चौकशी केली असता त्यांनी समाधानकारक माहिती न देता उडवाउडवीची उत्तरे दिल्याने पोलिसांचा संशय बळावला. दोन्ही



वाहने अकोट ग्रामीण पोलीस ठाण्यात आणून ताब्यात घेण्यात आली.

दरम्यान, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग अकोटच्या अधिकाऱ्यांना पोलिसांनी माहिती दिली. त्यांनी वाहनांमधील पाइपची पाहणी केल्यानंतर हे पाइप पोपटखेड गाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या कामासाठी ठेवण्यात आले असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांच्या जबानी रिपोर्टवरून अकोट ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ६४२/२०२६, कलम ३०३ (२), ३ (५) बीएनएस अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात आयशर ट्रक चालक मनीष अरुणराव मैन (वय २९, रा. नटाळा पुनर्वसन, वॉर्ड क्रमांक २, वर्धा) आणि कपील अशोकराव दुधे (वय ४१, रा. पुजई, ता. जि. वर्धा) यांना अटक करण्यात आली. पोलीस कोठडीदरम्यान केलेल्या तपासात प्रभाकर वसंतराव भताने (वय ३९, रा. गोढाळा, ता. रेणापूर, जि. लातूर) याच्या सांगण्यावरून पाइप चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यालाही अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास अकोट ग्रामीण पोलीस करीत असून, चोरीच्या या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, सहायक पोलीस अधीक्षक निखील पाटील आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या मार्गदर्शनाखाली अकोट ग्रामीणचे ठाणेदार श्रीधर गुट्टे, पोलीस उपनिरीक्षक वैभव तायडे, पोहेकॉ योगेश जउळकार, भास्कर सांगळे, गोपाल जाधव, गणेश फोकमारे, विठ्ठल चव्हाण, शैलेश जाधव, पोलीस कॉन्स्टेबल शुभम लुंगे, शुभम गिरी, सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल आशिष आमले, स्वप्नील दामोदर, होमगार्ड सैनिक सुनील वाळके व प्रविण इंगळे यांच्या पथकाने केली.

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ७५/२०२६ कलम - १९ दिनांक : ११/०९/२०२६

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक-** लोकमान्य टिळक गणेश उत्सव चॅरिटेबल ट्रस्ट, शिर्ला अंधारे, ता. पातुर जि. अकोला

**अर्जदार :-** श्री. प्रकाश लक्ष्मण चुनडे रा. सिदाजी महाराज वेटाळ, पातुर, ता. पातुर जि. अकोला

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहायक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ? **अ) जंगम मिळकत (वर्णन) :** रोख रक्कम रु.७०००/- अध्यक्ष यांचे कडे जमा आहे. **आ) स्थावर मिळकत (वर्णन) : -** निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला. १ यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक-११/०९/२०२६ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास
नोंदणी कार्यालय, अकोला

## दीड हजारहून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग

**अकोला :** सेवा संकल्प अभियानाचा उत्साहात शुभारंभ अकोला येथे झाला असून, लालबहादूर शास्त्री क्रीडांगणात मानवी रांगोळी साकारण्यात आली. त्यात शहरातील विविध शाळांचे दीड हजारहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत जिल्ह्यात 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे.

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५१८/२०२६ प्रोसेस नं.११२२२/२०२६
चौ.ता. २२/१०/२०२६ दिनांक : ०३/०९/२०२६

**अर्जदार :** फरहाना परवीन सादत खान रा. अखतर हुसैन चक्की जवळ, मुझाफ्फर नगर, अकोला. ता. जि. अकोला. मो. क्र. ९५६१२४२२२४

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : हमिद अहमद शेख छोटू
**पत्ता :-** रा.मुघल नॅशनल शाळेजवळ, काळा मारोती रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. मो. क्र. ९८८१५८१०८७

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत हमिद अहमद शेख छोटू यांचे दि. ०८/०५/१९९७ रोजी मुघल नॅशनल शाळेजवळ, काळा मारोती रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २२/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीस व्दारे सूचित करण्यात येते की, आलीया रहेमान मोहम्मद अत्ताउर रहेमान रा. मु.पो. दहीहांडा ता. जि. अकोला यांची महाविद्यालयाची टी.सी./ लिव्हींग सर्टीफिकेट दिनांक ०६.०१.२०२६ रोजी गहाळ झालेली आहे व त्याबाबतची तक्रार दहिहांडा पो.स्टेला दि. ०६/०१/२०२६ रोजी दिली आहे.

त्यामुळे त्याची दुय्यम प्रत महाविद्यालयातून काढवायाची आहे. त्यामुळे सदरची टी.सी. कोणालाही मिळून आल्यास त्यांनी कृपया परत करावी. करीता ही जाहीर नोटीस.

**आलीया रहेमान मोहम्मद अत्ताउर रहेमान**
रा. मु.पो. दहीहांडा ता. जि. अकोला
मो.नं. ८८०५७१५१९१

## जाहीर नोटीस

**अकोला येथील वि. ०५वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांच्या न्यायालयात**

'वाद प्रश्न नक्की करण्यासाठी समन्स'
(दिवाणी व्यवहार संहिता, नियमक्रम ५, नियम १,५)
अनुसूची एक, परिशिष्ट ब,क्र. २

दावा रु. /-

R.C.S.No. 538/2025
FE 16/10/2026

**अंबादास .. विरूध्द... भिमराव व इतर**

**बनाम :-** १. उद्धेश धनराज गोपनारायण २. प्रियंका धनराज गोपनारायण ३. लकी धनराज गोपनारायण ४. अंजु धनराज गोपनारायण ५. कमलाबाई ज्ञानदेव पोहरकर सर्व रा. घुसर, ता. जि. अकोला.

ज्याअर्थी वादी यांनी 'SUIT FOR REMOVAL OF ENCROACHMENT AND FOR PERMANENT INJUNCTION AND MENSE PROFIT', तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे, त्याअर्थी त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक १६/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रशंचे उत्तर देउ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, समन्स बजावल्यापासून ३० दिवसाचे आत तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) पुष्ट्यर्थ पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची करुन ती सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी. तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाउन त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमून केलेल्या तारखेस किंवा कालावधीत बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल. आज दिनांक ११/०९/२०२६ रोजी अकोला येथे माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. समन्स मिळाल्यापासुन ३० दिवसाच्या आत लेखी जबाब दाखल करणे आवश्यक आहे.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय (व.स्तर.), अकोला

# हिवरखेड-अकोट महामार्गावर 'मृत्यूचा सापळा'!

## खोदकाम करून रस्ता असुरक्षित अवस्थेत; ना सूचना फलक, ना बॅरिकेडिंग

**कंत्राटदाराच्या हलगर्जीपणावर नागरिक संतप्त; प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह**



■ प्रतिनिधी | हिवरखेड ■

हिवरखेड-अकोट राज्य महामार्गाचे काम गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू आहे; मात्र कामाचा वेग संथ आणि सुरक्षा व्यवस्था मात्र बेपत्ता, अशी धक्कादायक परिस्थिती मार्गावर निर्माण झाली आहे. लहान पुलाच्या कामासाठी महामार्गावर मोठे खोदकाम करून त्यातून निघालेली माती रस्त्याच्या दोन्ही बाजूंना टाकण्यात आली आहे. मात्र वाहनचालकांना सावध करण्यासाठी साधा सूचना फलकही नाही आणि बॅरिकेडिंगचाही पत्ता नाही. त्यामुळे हा महामार्ग वाहनचालकांसाठी अक्षरशः 'मृत्यूचा सापळा' ठरत असल्याचा संताप नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

महामार्गावरील लहान पुलाच्या कामासाठी करण्यात आलेले खोदकाम रात्रीच्या वेळी वाहनचालकांच्या जीवावर बेतण्याची शक्यता आहे. रस्त्यावर अचानक आलेला मातीचा ढिगारा, खोदकामाचा भाग किंवा निर्माण झालेला अडथळा भरधाव वेगाने येणाऱ्या वाहनचालकाच्या लक्षात न आल्यास गंभीर दुर्घटना घडू शकते. विशेष म्हणजे काम सुरू असल्याची पूर्वसूचना देणारे फलक, दिशादर्शक चिन्हे, बॅरिकेडिंग किंवा प्रतिबिंबित सुरक्षा साधने नसल्याने धोका आणखी वाढला आहे.

हिवरखेड-अकोट मार्गावर यापूर्वीही अपघातांच्या घटना घडल्या आहेत. अनेक नागरिक जखमी झाले असून काहींना जीव गमवावा लागल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे अशा संवेदनशील मार्गावर रस्त्याचे काम सुरू असताना अतिरिक्त सुरक्षा व्यवस्था करणे अपेक्षित असताना त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला जात आहे. रस्ता विकासाच्या नावाखाली खोदकाम करणे आणि त्यानंतर तो भाग वाहनचालकांच्या सुरक्षेची कोणतीही पुरेशी व्यवस्था न करता खुला सोडणे कितपत योग्य, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. 'एखादा मोठा अपघात होऊन जीवितहानी झाल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का?' असा संतप्त सवालही केला जात आहे.

### कंत्राटदारासह संबंधित यंत्रणेची जबाबदारी ?

महामार्गाचे काम करणाऱ्या कंत्राटदाराने कामाच्या ठिकाणी आवश्यक सुरक्षा उपाययोजना करणे अपेक्षित असताना त्याची अंमलबजावणी होत आहे की नाही, याची पाहणी संबंधित विभागाने करणे गरजेचे आहे. मात्र प्रत्यक्ष परिस्थिती पाहता कंत्राटदार आणि संबंधित यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने केवळ कागदी पाहणी न करता प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन परिस्थिती तपासावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### तातडीने बॅरिकेडिंग करा!

खोदकामाच्या ठिकाणी तातडीने बॅरिकेडिंग करावे, स्पष्ट सूचना व दिशादर्शक फलक लावावेत, रात्री वाहनचालकांना अडथळा स्पष्ट दिसेल अशी प्रकाश व प्रतिबिंबित सुरक्षा व्यवस्था करावी, तसेच अपूर्ण कामाच्या ठिकाणी सुरक्षेच्या सर्व उपाययोजना काटेकोरपणे राबवाव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### अपघात झाल्यानंतरच उपाययोजना?

रस्त्याचे काम सुरू असताना वाहनचालकांच्या सुरक्षेची जबाबदारी कंत्राटदार आणि संबंधित यंत्रणेची आहे. मग सुरक्षा उपाययोजना करण्यासाठी आणखी किती अपघातांची प्रतीक्षा केली जात आहे, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २७८**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# वाघाची दहशत कायम, शेतकरी मात्र भयभीत

## अजनादेवी शेतशिवारात गोठ्यात घुसून वाघाचा धुमाकूळ, बांधलेली गाय ठार, इतर जनावरांनी दोरखंड तोडून घेतला जीवाचा बचाव

**आष्टी शहीद/ जनमाध्यम**

जिल्ह्यात वाघाच्या वावराने शेतकऱ्यांच्या काळजाचा ठोका चुकत असतानाच कारंजा घाडगे तालुक्यातील अजनादेवी शेतशिवारात वाघाने गोठ्यात घुसून बांधलेल्या गाईवर हल्ला करून तिला ठार केले. ही घटना १७ सप्टेंबर रोजी पहाटेच्या सुमारास घडली. या घटनेने शेतकरी आणि पशुपालकांमध्ये पुन्हा भीतीचे सावट निर्माण झाले आहे.

अजनादेवी शेतशिवारात यशवंत श्रावण किनकर यांची शेती आहे. शेतातील गोठ्यात त्यांनी नेहमीप्रमाणे दहा गाई आणि दोन बैल बांधले होते. रात्री शेतीचे काम आटोपून ते घरी गेले. मात्र पहाटेच्या सुमारास दबा धरून बसलेल्या वाघाने थेट गोठ्यात प्रवेश केला आणि एका गाईवर झडप घातली. हल्ल्यात गाईचा जागीच मृत्यू झाला.



सकाळी शेतात पोहोचलेल्या किनकर यांना गोठ्यातील दृश्य पाहून धक्काच बसला. वाघाच्या हल्ल्यामुळे घाबरलेल्या इतर जनावरांनी दोरखंड तोडून गोठ्यातून बाहेर धाव घेतली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

**गोठ्यात जनावरेही सुरक्षित नाहीत**

अजनादेवी परिसरात वाघाचा वावर वाढल्याने शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता आहे. शेतात काम करण्यासाठी जाणेही धोक्याचे वाटत असून आता गोठ्यात बांधलेली जनावरेही सुरक्षित नसल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे. वनविभागाने केवळ पंचनामा आणि नुकसान भरपाईपुरते न थांबता वाघाच्या हालचालींवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी तातडीच्या उपाययोजना कराव्यात. अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे बिट गार्ड सानप यांनी घटनास्थळी पाहणी करून पंचनामा केला. मृत गाईमुळे शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान झाले असून नियमानुसार नुकसानभरपाई देण्यात येईल. असे त्यांनी सांगितले.

# दीडशे वर्षांची परंपरा सरकारी कागदात का अडकली?

## तान्हा पोळ्याला सांस्कृतिक महोत्सवाचा दर्जा द्या - अतुल वांदिले

**सिंदी रेल्वे/ जनमाध्यम**

बैलांच्या साजशृंगारातून शेतकरी संस्कृतीचा जागर करणाऱ्या सिंदी रेल्वेच्या ऐतिहासिक तान्हा पोळ्याला आता राज्यस्तरीय ओळख मिळावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांनी केली आहे. तब्बल दीडशे वर्षांची परंपरा लाभलेल्या या उत्सवाला सांस्कृतिक महोत्सवाचा अधिकृत दर्जा देऊन शासनाने विशेष निधी उपलब्ध करून द्यावा, अशी त्यांची भूमिका आहे.



सिंदी रेल्वेचा तान्हा पोळा हा केवळ बैलांचा उत्सव नसून ग्रामीण महाराष्ट्राच्या लोकजीवनाशी जोडलेली परंपरा आहे. सजविलेले बैल, देखावे, झांकी, पारंपरिक वाद्ये आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे या उत्सवाला दरवर्षी मोठी गर्दी होते. वर्ध्यासह विदर्भातील विविध भागांतून नागरिक या सोहळ्याला उपस्थित राहतात.

मात्र एवढी मोठी ऐतिहासिक परंपरा असूनही या उत्सवाला व्यापक शासकीय पाठबळ मिळण्याची गरज असल्याचे वांदिले यांनी म्हटले आहे. सांस्कृतिक महोत्सवाचा दर्जा मिळाल्यास स्थानिक लोककला, हस्तकला आणि ग्रामीण परंपरांना व्यासपीठ मिळेल. कलाकार आणि कारागिरांसाठी संधी निर्माण होतील. तसेच पर्यटनालाही चालना मिळू शकते. उत्सवासाठी निधीसह स्वच्छता, वाहतूक, प्रकाश व्यवस्था आणि सुरक्षिततेचे नियोजन शासनाने करावे. दीडशे वर्षांचा हा सांस्कृतिक वारसा केवळ आठवणींत न राहता नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी अतुल वांदिले यांनी केली आहे.

# नाली खोदून ठेवली; गणेशोत्सवात नागरिकांची कोंडी

**आर्वी/ जनमाध्यम**

गणेशोत्सवाच्या काळात शहरातील नागरिक आणि व्यावसायिकांची गैरसोय लक्षात घेता नाली बांधकामासाठी खोदून ठेवलेले रस्ते तातडीने पूर्ववत करून काम पूर्ण करावे अशी मागणी काँग्रेस आणि प्रहार सोशल फोरमच्या वतीने नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनातून करण्यात आली.

नाली बांधकामासाठी ठिकठिकाणी खोदकाम करून ते तसेच सोडून देण्यात आले आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांना ये जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

हा केवळ नाली बांधकामाचा प्रश्न नसून अनेक कुटुंबांच्या रोजीरोटीचा प्रश्न आहे असे निवेदनात नमूद करण्यात आले.

शिवाजी महाराज चौक ते गांधी चौक हा शहरातील वर्दळीचा



## शिवाजी महाराज चौक ते गांधी चौक मार्गावरील काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी

आणि व्यावसायिकदृष्ट्या महत्त्वाचा मार्ग आहे. त्यामुळे नागरिकांची गैरसोय आणि व्यावसायिकांचे नुकसान लक्षात घेऊन नालीचे काम तातडीने पूर्ण करावे.

अन्यथा आंदोलनात्मक पवित्रा घ्यावा लागेल आणि त्यानंतर उद्भवणाऱ्या परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी पालिका प्रशासनाची राहील असा इशारा काँग्रेस नेते तथा प्रहार सोशल फोरमचे संस्थापक अध्यक्ष बाळा जगताप यांनी दिला.

# अंधश्रद्धेच्या संशयातून तलवारीने हल्ला



**पुलगाव/ जनमाध्यम**

गुंजखेडा येथे करणी जादूटोणा केल्याच्या संशयातून दाम्पत्याला तलवार आणि काठीने मारहाण केल्याच्या घटनेची महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने दखल घेतली आहे. समितीच्या पदाधिकाऱ्यांनी बाधित कुटुंबाची भेट घेऊन घटनेची माहिती जाणून घेतली तसेच पुलगाव पोलीस ठाण्यालाही भेट दिली.

रविवारी वासुदेव मारोती केवटे हे दुचाकीने आरोपीच्या घरासमोरून जात असताना त्यांना थांबविण्यात आले. मुलीवर करणी जादूटोणा केल्याचा आरोप करीत यशवंत बाबूराव धुर्वे आणि त्यांची पत्नी सीमा यशवंत धुर्वे यांनी काठी व लोखंडी तलवारीने मारहाण केल्याचा आरोप आहे.

पत्नी हर्षा केवटे या पतीला वाचविण्यासाठी गेल्या असता त्यांनाही मारहाण करण्यात आली. या हल्ल्यात वासुदेव केवटे यांच्या डोक्याला आणि हाताला गंभीर दुखापत झाली असून टाके पडले आहेत. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी यशवंत धुर्वे याला पोलिस कोठडीनंतर न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली असून तो वर्धा जिल्हा कारागृहात आहे.

समितीचे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार, अशोक हेडावू, रजनी सुरकार आणि विकास पाटील यांनी केवटे कुटुंबीयांची भेट घेतली. आरोपीकडून पुन्हा मारहाणीची आणि जिवे मारण्याची धमकी मिळाल्याने केवटे दाम्पत्य यवतमाळ येथे मुक्कामी गेल्याची माहिती समितीला मिळाली. करणी जादूटोण्याचा संशय निर्माण करणाऱ्या ढोंगी बाबाचा शोध घेऊन त्याच्यावरही जादूटोणा विरोधी कायद्यानुसार कारवाई करावी.

त्यासाठी आरोपीची पोलिस कोठडी घ्यावी अशी मागणी समितीने केली आहे. न्याय न मिळाल्यास पोलीस अधीक्षकांकडे निवेदन देण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# गावची शांतता राखणाऱ्या पोलीस पाटलावरच बापलेकाचा हल्ला

## असभ्य वर्तनाला विरोध केल्याचा राग, मुख्य चौकात अडवून मारहाण

**आर्वी/ जनमाध्यम**

गावातील शांतता आणि कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस पाटलालाच बापलेकाने मारहाण केल्याची धक्कादायक घटना आर्वी तालुक्यातील बोरगाव हातला येथे घडली. सार्वजनिक ठिकाणी असभ्य वर्तन करणाऱ्याला समज दिल्याचा राग मनात धरून दोघांनी पोलीस पाटलाला अडवून मारहाण केली. याप्रकरणी आर्वी पोलिसांनी बापलेकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस पाटील शंकर पंडितराव राऊत वय ४७ हे १५ सप्टेंबर रोजी रात्री सुमारे ८ वाजून ४० मिनिटांनी गावातील परिस्थितीची पाहणी करीत होते. यावेळी गजानन देविदास कडू हा सार्वजनिक ठिकाणी गावकऱ्यांना असभ्य भाषेत शिवीगाळ करीत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. राऊत यांनी पोलीस पाटील म्हणून मध्यस्थी करून त्याला समज दिली आणि वाद शांत केला.

मात्र हा प्रकार गजानन कडू याच्या मनात राहिला. काही वेळाने शंकर राऊत मुख्य चौकाकडे जात असताना गजानन कडू आणि त्याचा मुलगा प्रज्वल कडू वय २० हे धावत आले.

मघाशी मला का आडवा आलास अशी विचारणा करीत गजानन याने राऊत यांच्या गालावर मारहाण केली आणि शर्ट पकडून ओढला. त्याचवेळी प्रज्वल यानेही मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

पोलीस पाटील हा गावातील कायदा सुव्यवस्था आणि प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा असतो. गावातील वाद शांत करण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या व्यक्तीवरच हल्ला झाल्याने गावपातळीवर कर्तव्य बजावणाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रकरणी १६ सप्टेंबर रोजी आर्वी पोलीस ठाण्यात गजानन देविदास कडू वय ५० आणि प्रज्वल गजानन कडू वय २० यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास आर्वी पोलीस करीत आहेत.

# बर्गमॅन मोपेड चोरीचा छडा

**वर्धा/ जनमाध्यम**

शहरातील समतानगर परिसरातून चोरीस गेलेल्या बर्गमॅन मोपेडचा स्थानिक गुन्हे शाखेने शोध घेत गुन्ह्याचा छडा लावला. याप्रकरणी अक्षय प्रमोदराव फुलकरी वय २५ वर्षे रा वायफळ ता देवळी ह.मु. सावंगी मेघे याला ताब्यात घेण्यात आले आहे. त्याच्याकडून चोरीची पांढऱ्या रंगाची बर्गमॅन मोपेड किंमत ८० हजार रुपये जप्त करण्यात आली.

समतानगर येथील चेतना किशोर भगत यांनी ९ सप्टेंबर रोजी वर्धा शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यांचा मुलगा तन्मय भगत याची मोपेड ८ सप्टेंबरच्या रात्री घरासमोरून चोरीला गेली होती. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता.

दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पथक वर्धा उपविभागात पेट्रोलिंग करीत असताना संशयित अक्षय फुलकरी हा चोरीच्या मोपेडसह तुकडोजी ग्राउंड साईनगर परिसरात आढळून आला.



## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; ८० हजारांचा मुद्देमाल जप्त

पंचांसमक्ष मोपेड जप्त करून आरोपीला पुढील तपासासाठी वर्धा शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# गुन्हे वृत्त

## पुतण्यास काकू चुलत्याने केली मारहाण

**हिंगणघाट** - मद्यधुंद अवस्थेत शिवीगाळ का करतो, अशी विचारणा केल्याने पुतण्यास काकू आणि चुलत भावाने मारहाण केल्याची घटना चिंचोली येथे घडली. याप्रकरणी १५ सप्टेंबर रोजी हिंगणघाट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विजय बाबाराव तुराळे वय ३४ रा. चिंचोली असे जखमीचे नाव आहे. विजय तुराळे हे जेवणानंतर घराबाहेर पडले होते. ते दत्त मंदिर परिसरात गेले असता त्यांना चुलत भाऊ वैभव तुराळे तेथे दिसला. वैभव याला नेहमी मद्यधुंद अवस्थेत शिवीगाळ का करतो, अशी विचारणा विजय यांनी केली. यावरून वाद झाल्यानंतर वैभव याने रस्त्यावरील दगडाने विजय यांना मारहाण केली. त्यानंतर विजय जाब विचारण्यासाठी वैभवच्या घरी गेले असता सुनंदा तुराळे यांनी सळाखीने मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जुन्या वादाचा वचपा काढण्यासाठी मारहाण

**समुद्रपूर** - जुन्या वादाचा राग मनात धरून तरुणास हातातील कड्याने मारहाण करून जखमी केल्याची घटना समुद्रपूर तालुक्यातील हिवरा येथे घडली. याप्रकरणी गिरड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शंकर भिमराव सराटे वय १८ रा. हिवरा असे जखमी तरुणाचे नाव आहे. शंकर सराटे हे हिवरा येथे असताना ऋतीक संजय भोंडे याने जुन्या वादाचा राग मनात धरून त्यांच्याशी वाद घातला. त्यानंतर ऋतीक याने हातातील कड्याने शंकर यांच्या डोक्यासह शरीरावर मारहाण केली. या मारहाणीत शंकर जखमी झाले. घटनेनंतर त्यांनी गिरड पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी ऋतीक संजय भोंडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास गिरड पोलिस करीत आहेत.

## जिल्हा रुग्णालयातून मोबाईल चोरी

**वर्धा** - जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या आपत्कालीन विभागातून टेबलवर ठेवलेला मोबाईल अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना समोर आली. याप्रकरणी वर्धा शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. सेलू काटे येथील अमर पारवेकर हे त्यांच्या आत्याची प्रकृती बिघडल्याने त्यांना उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात घेऊन आले होते. आपत्कालीन विभागात दाखल प्रक्रिया सुरू असताना अमर यांनी आपला मोबाईल टेबलवर ठेवला. काही वेळाने मोबाईल घेण्यासाठी पाहिले असता तो तेथे आढळून आला नाही. रुग्णालय परिसरात आणि आजूबाजूला शोध घेऊनही मोबाईल मिळाला नाही. अखेर अमर पारवेकर यांनी वर्धा शहर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलिसांकडून तपास सुरू आहे.

## मुलाने आईला केली मारहाण

**समुद्रपूर** - क्षुल्लक कारणावरून वाद झाल्यानंतर मुलाने वृद्ध आईला मारहाण केल्याची घटना समुद्रपूर तालुक्यातील बेलघाट येथे घडली. याप्रकरणी समुद्रपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रमा बोडेकर वय ६५ रा. बेलघाट असे जखमी महिलेचे नाव आहे. रमा बोडेकर या बेलघाट येथे राहत असून त्यांचा मुलगा मनोहर बोडेकर सध्या भद्रावती येथे राहतो. कौटुंबिक कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. वादाचे पर्यवसान मारहाणीत झाले. मनोहर याने आई रमा यांना मारहाण केल्याने त्या जखमी झाल्या. घटनेनंतर रमा यांनी समुद्रपूर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी मनोहर बोडेकर याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. घटनेचा पुढील तपास समुद्रपूर पोलिस करीत आहेत.

## १५ जुगाऱ्यांच्या आवळल्या मुसक्या

**पुलगाव** - कुर्ला परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकून १५ जणांना रंगेहात पकडले. या कारवाईत पाच दुचाकी, मोबाईल, रोख रक्कम आणि जुगाराचे साहित्य असा एकूण ७ लाख २ हजार ७४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी १७ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांना कुर्ला परिसरात जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पथकाने छापा टाकला. कारवाईदरम्यान प्रफुल्ल कांबळे, संजय चौधरी, नामदेव मसराम, सुनील कोकाटे, अशोक धोटे, शिवलाल मोहिते, इमरान युसूफ खान पठाण, आकाश उर्फ प्रभाकर वाघमारे, मन्ना मून यांच्यासह १५ जण जुगार खेळताना आढळले. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. याप्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

## रेल्वेखाली आल्याने व्यक्तीचा मृत्यू

**वर्धा** - धावत्या रेल्वेच्या खाली आल्याने एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना सेलू रोड ते सेवाग्राम दरम्यान वरुड शिवारात घडली. मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही. सेलू रोड ते सेवाग्राम रेल्वेमार्गादरम्यान वरुड शिवारात एका व्यक्तीचा मृतदेह रेल्वे रुळाजवळ आढळून आला. घटनेची माहिती मिळताच संबंधितांनी सेवाग्राम पोलिसांना कळविले. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. प्राथमिक माहितीनुसार धावत्या रेल्वेच्या खाली आल्याने संबंधिताचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. मात्र मृत्यूचे नेमके कारण आणि घटना कशी घडली याबाबत पोलिस तपास करीत आहेत.

# घरकुल मिळाले, शौचालय बांधले, अनुदान मात्र गायब

## बोटोणा येथील लाभार्थ्यांची वर्षभर पंचायत समितीकडे पायपीट

**आष्टी शहीद/ जनमाध्यम**

कारंजा घाडगे तालुक्यातील बोटोणा येथे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल मिळाल्या नंतर नियमानुसार शौचालयाचे बांधकाम करणाऱ्या लाभार्थ्यांना तब्बल वर्षभरापासून अनुदाना साठी पंचायत समितीच्या पायऱ्या झिजवाव्या लागत आहेत. घरकुलाचे हप्ते मिळाले. शौचालयही उभे राहिले. मात्र शौचालयासाठी मिळणारे १२ हजार रुपयांचे अनुदान अद्याप खात्यावर जमा झालेले नसल्याने लाभार्थ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

बोटोणा येथील आशिष कडू, मारोती इरखड, बद्री सिंग बैस ठाकूर यांच्यासह इतर लाभार्थ्यांना सन २०२३ २४ मध्ये प्रधानमंत्री आवास योजनेतून घरकुल मंजूर झाले होते. शासनाच्या अनुदानातून घरकुलाचे बांधकाम पूर्ण करताना नियमानुसार शौचालयाचे बांधकामही करण्यात आले. शौचालय बांधकामाची आवश्यक कागदपत्रे संबंधित कार्यालयात सादर करूनही अनुदानाची रक्कम मिळालेली नाही. त्यामुळे घरकुलासाठी घेतलेल्या कर्जाचा भार आणि शौचालयाचा अतिरिक्त खर्च अशी दुहेरी आर्थिक कोंडी लाभार्थ्यांसमोर निर्माण झाली आहे.

अनुदानासाठी कारंजा घाडगे पंचायत समितीत वारंवार हेलपाटे मारूनही प्रश्न सुटलेला नाही. वर्षभरापासून केवळ आश्वासनांवर समाधान मानावे लागत असल्याची व्यथा लाभार्थ्यांनी व्यक्त केली.

नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर श०८९०३३७ वरील माझे इर्ळेें ंपर्ळीं ंपर्ळीं असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वरील इर्ळेें ंळर्ीं ंपर्ळीं नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे. पत्ता: आंबेडकर वॉर्ड समुद्रपूर जिल्हा वर्धा ४४२३०५

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष - १४ अंक - २९२
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल- atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# मोर्शी शहरातून काढण्यात आला रूट मार्च



**मोर्शी/ प्रतिनिधीः-** विघ्नहर्ता श्री गणेश उत्सवासह होऊ घातलेले सर्व उत्सव व येणाऱ्या सर्व हिंदू-मुस्लिम बांधवांच्या सणाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पोलीस स्टेशन मोर्शीच्या वतीने दि.१७ सप्टेंबर रोजी मोर्शी शहरातून रूट मार्च काढण्यात आला.

सर्वप्रथम पोलीस उपविभागीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वात दोनपेक्षा अधिक व्यक्तीने एकत्रित येऊ नये. कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार गावात घडू नये या उद्देशाने कायदा व सुव्यवस्था संबंधाने दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेण्यात येऊन रूट मार्च काढण्यात आला.

या रूट मार्चची सुरुवात अति संवेदनशील असलेल्या पेठपुरा परिसरातील गजबजलेल्या चौकातून करण्यात आली.अति संवेदनशील भागातून मार्गक्रमण करून गुजरी बाजार,गांधी चौक,मुख्य व्यापारी बाजारपेठ ते जयस्तंभ चौक येथे रूट मार्चचा समारोप करण्यात आला.या पोलीस रूट मार्चमध्ये मोर्शी पोलीस स्टेशनचे पोलीस उपविभागीय अधिकारी उमेश पाटील ठाणेदार राहुल आठवले यासह बेनोडा शिरखेड येथील ८ अधिकारी, २९ सैनिक,आरसीपी प्लाटून, एस आर पी प्लाटून,५४ पोलीस अंमलदार हजर होते. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी व ठाणेदार राहुल आठवले यांनी सर्व जाती धर्मातील नागरिकांनी गणेश उत्सवासह येणारे सर्व सण शांततेने पार पाडावे.कोणत्याही प्रकारचा जातीय तणाव निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी असे आवाहन केले.

या रूट मार्चमध्ये नाशिक येथील दोन पोलीस अधिकारी, बेनोडा,शिरखेड येथील पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी;अफवा अनुचित प्रकारांना आळा बसावा;शांतता व सामाजिक ऐक्य टिकवून ठेवणे सन उत्सवाच्या काळात शहरात नागरिकांची वर्दळ वाढते. धार्मिक कार्यक्रम मिरवणुका विविध सामाजिक उपक्रमामुळे गर्दी होत असल्याने कायदा व सुरक्षा राखणे पोलिसांसमोर मोठे आव्हान असते.

कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी केवळ पोलिसांची नसून नागरिकांची सुद्धा आहे. सणांच्या काळात अफवांवर विश्वास ठेवू नये धार्मिक सामाजिक भावना दुखावतील असे संदेश सोशल मीडियावर प्रसारित करू नये. वादग्रस्त पोस्ट टाळणे संशयास्पद हालचालींची माहिती पोलिसांना देणे त्यामुळे तात्काळ शांतता राखण्यास मदत होते.

**-राहुल आठवले,ठाणेदार मोर्शी**

# सरपंचपदाचे आरक्षणात १२ जागांवर पेच

## -ग्रामविकास विभाग व जिल्हा प्रशासनाचा ताळमेळ बसेना

**अमरावती/ प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील ग्राम पंचायतच्या सरपंचपदाचे आरक्षण जिल्हा निवडणूक विभागासमोर मोठे आव्हान ठरले आहे. पन्नास टक्क्यांच्या मर्यादेत आरक्षण काढायचे असून इतर मागास संवर्गाचे आरक्षण काढताना प्रशासनाला तांत्रिक व नियमांच्या अडचणी येऊ लागल्या आहेत.ग्रामविकास विभागाने दिलेला आराखडा आणि आरक्षण नियमानुसार काढताना बारा जागांचा प्रश्न प्रशासना समोरील पेच ठरला आहे. अमरावती विभागातील अकोला व यवतमाळ, या जिल्ह्यात आरक्षणाचा कार्यक्रम पार पडला असला तरी अमरावती सह वाशीम व बुलडाणा येथे पेच निर्माण झाल्याने आरक्षण कार्यक्रम रखडला आहे. ग्रामविकास विभागाकडून मागविण्यात आलेले कायदेशीर मार्गदर्शन अद्याप अप्राप्त असल्याने स्थानिक अधिकाऱ्यांनी हा कायदेशीर पेचप्रसंगाचा कार्यक्रम तूर्तास थांबविला आहे. अमरावती जिल्ह्यात एकूण ७२५ ग्राम पंचायतींमधील सरपंच पदाचे आरक्षण काढायचे आहे. यातील पन्नास टक्के जागा खुल्या संवर्गासाठी सोडाव्या लागणार असून उर्वरित पन्नास टक्के जागांमधून संवर्गनिहाय आरक्षण काढायचे आहे. त्यातही पन्नास टक्क्यांच्या मर्यादेत नागरिकांचा मागास प्रवर्ग, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती या संवर्गासाठी आरक्षण सोडत काढायची असून तूर्तास आरक्षण सोडतीचा कार्यक्रम सध्या थांबलेला आहे. एकूण ग्रामपंचायतींपैकी पन्नास टक्के म्हणजे ३६२ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण निघणार आहे. ग्रामविकास विभागाने दिलेल्या आराखड्यानुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे आरक्षण लोकसंख्येवर काढण्यात येत असून ते १९१ जागांवर निघणार आहे. खरा पेच नागरिकांचा मागास प्रवर्गाचा (ओबीसी) आहे. ३६२ पैकी १९१ जागा गेल्यानंतर १७१ जागा ओबीसी साठी राखीव होतात. मात्र २७ टक्के आरक्षणाच्या नियमानुसार त्या तालुकानिहाय काढल्यास १५९ होतात. १२ जागांचे काय, असा प्रश्न समोर आल्याने पेच निर्माण झाला आहे. आरक्षित जागांचा ताळमेळ बसत नसल्याने निवडणूक विभागाने तूर्तास आरक्षणाचा मुद्दा बाजूला ठेवत ग्रामविकास विभागाकडून कायदेशीर मार्गदर्शन मागविले आहे.

# मोबाईल हॅक करून खात्यातून ३.०७ लाख लंपास

## मोहननगरातील ५८ वर्षीय व्यक्तीची फसवणूक

**अमरावती/प्रतिनिधीः-** मोबाईलमध्ये अनधिकृत प्रवेश मिळवून त्यातील पासवर्डची माहिती मिळविल्यानंतर त्याचा गैरवापर करीत ५८ वर्षीय व्यक्तीला ३ लाख ७ हजार ५४६ रुपयांचा आर्थिक फटका देण्यात आला. मोहननगर, नवसारी परिसरात घडलेल्या या सायबर फसवणुकीप्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी अज्ञात मोबाईलधारकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दादाराव पांडे (वय ५८, रा. मोहननगर, नवसारी) यांच्या तक्रारीनंतर हा प्रकार उघडकीस आला. तक्रारीनुसार, अज्ञात व्यक्तीने संगणक संसाधनाचा वापर करून पांडे यांच्या मोबाईलमध्ये अनधिकृत प्रवेश मिळविला. त्यानंतर मोबाईलचा पासवर्ड मिळवून त्याचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. या प्रक्रियेत पांडे यांची ३ लाख ७ हजार ५४६ रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याचे पोलिसांत दिलेल्या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेनंतर गाडगेनगर पोलिसांनी तातडीने तांत्रिक तपासाला सुरुवात केली आहे. मोबाईलमधील डिजिटल हालचाली, पासवर्डशी संबंधित माहिती तसेच आर्थिक व्यवहारांचा माग काढला जात आहे. पोलिसांनी ई-साक्ष्य संकलित केले असून, उपलब्ध डिजिटल पुराव्यांच्या आधारे फसवणूक करणाऱ्या व्यक्तीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न सुरू आहे. याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८ (४) आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियमाच्या कलम ६६ (क), ६६ (ड) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक चोपडे हे तपास करीत आहेत.

**No. 2**
**CIVIL JUDGE SENIOR DIVISION IN THE COURT OF Smt. K.R. Rajput**
**Civil Judge Sr Dn Amravati, Amravati, Amravati.**

**SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES**

Spl.C.S./191/2023
Bank of Maharashtra Through Branch Manager Varsha Bharat Thool Vs M/S. RIQ Aqua Cool Through Prop. Suvarna Raju Gawande
NEXT DATE: 17-11-2026

[O. 5, R. 1, 5.]
To,
M/S. RIQ Aqua Cool Through Prop. Suvarna Raju Gaunde
R/o. 1132, Palash Line Gadge Nagar, Near Radha Krushna Temple, Tq. Dist. Amravati., Amravati, AMRAVATI, MAHARASHTRA

Whereas Bank of Maharashtra Through Branch Manager Varsha Bharat Thool has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some persons able to answer all such questions, on the 17-11-2026 at 11:00 o'clock in the forenoon, to answer the claim; and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counter-claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.
Take notice that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.
Given under my hand and the seal of the Court, this 17-09-2026.

**CIVIL JUDGE SR DN AMRAVATI**

Notice. 1. Should you apprehend your witnesses will not attend of their own accord, you can have a summons from this Court to compel the attendance of any witness, and the production of any document that you have a right to call on the witness to produce, on applying to the Court and on depositing the necessary expenses.
2. If you admit the claim, you should pay the money into Court together with the costs of the suit, to avoid execution of the decree, which may be against your person or property, or both.
Visit ecourts.gov.in for updates or download mobile app "eCourts Services" from Android or IOS
The process is system generated and transmitted in secured manner by authorised user as such physical signature not applied.

SEAL
Sd./-
**Assistant Superintendent (Administration), Court of the Senior Civil Judge, Amravati**

**दि अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या.**
**मु.का., इर्विन चौक कॅम्प रोड, अमरावती**
**फोन : ०७२१-२५५२०९९/२६६३३७८/७९**
Email : amtdccbho@rediffmail.com

**- जाहीरात -**

**बँकेच्या ९३ शाखेकरिता UV लॅम्प ९५ नग खरेदी करावयाचे आहे. त्याकरिता नामांकित कंपनीचे निविदा बँकेचे मुख्य कार्यालय अमरावती येथे बंद लिफाफा मध्ये दिनांक २४.०९.२०२६ पर्यत अगर तत्पुर्वी बँकेच्या वेळेमध्ये सादर करावी.**

**दिनांक १७-९-२०२६**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**NOTICE REGARDING DISCREPANCY IN NAME**

I, **Najeebur Rahman Mujibur Rahman,** born on 11/02/1964, residing at- Razzak Compound, Inkaiyya Pura, Camp, Amravati , Maharashtra, PIN-444602, hereby declare that in some places my name has been recorded as **Najib Ur Rehman** ; however, my true and original name is **Najeebur Rahman Mujibur Rahman.**
I hereby declare that **"Najeebur Rahman"** and **Najib Ur Rehman"** refer to the same person-namely, myself. This declaration is made for all future requirements and official records.

**Change of Name**

**I, Mangala Mahatme, R/o.Near Board Office, Tope Nagar, Amravati, have changed my name to Mangala Rajesh Mahatme for all future purposes.**

**MAHATRANSCO**
**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (SRM e-Tender) from registered agencies on MSETCL's e-Tendering website. For further details please visit our website: **https://srmetender.mahatransco.in**

| Sr. No. | Tender No. & Description of Work |
|---|---|
| 1 | Work of annual maintenance contract for maintaining of EHV Sub Station premises (i.e. Metal Switch yard area) clean & free from grass / weed, shrubs, thorny bushes, small trees etc. at various EHV Sub Station under EHV (O&M) Circle, Akola for FY 2026 - 27. (1st Call) **RFX No. 7000041571** **Tender No.: MSETCL/SE/EHV/O&M/CRL/AKL/Tech/2026-27/T-15-AMC Weed Control** **Estimated Cost = Limited to Rs. 38,03,975.00/-** |

| Publicity period of tender | Tender Available at |
|---|---|
| Start Date:- From:- 17/09/2026 @ 00:00 Hrs onwards | https://srmetender.mahatransco.in |
| Submission Deadline :- | Tender Opening Date : - |
| 26/09/2026 @ up to 23:59 Hrs. | Technical Bid: Date : 27/09/2026, 11:00 Hrs, if possible. Price Bid: Date : 27/09/2026, 12:00 Hrs, if possible. |

**Contact Person:** The Dy. Executive Engineer, EHV O&M Circle, AKOLA.
**Contact No. : 8554989534 (Dy. Executive Engineer), e-mail id: se1200@mahatransco.in**

1. Relevant portions of the Tender which the bidders have to fill up, would be available online on above said website.
2. **EMD amount of Rs. 38,039.75/- and Tender Fees Rs. 500 + GST** as applicable (per tender & non refundable) should be paid on-line only. **Payment in cash/DD will not be accepted**. Bidder can pay through credit card/Debit Card/ Net Banking. The payment confirmation will be done by the Corporate Office.
3. Tender documents can be downloaded only online from above-said website.
4. Eligible bidders shall submit their bids well in advance instead of waiting till last date. MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.
5. If the payment of tender fee and EMD by a bidder is not confirmed, then the bidder will be straight-way disqualified and his bids will not be considered for further tendering process.

**Note**: All eligible & interested bidders are mandated to get enrolled on SRM e-Tendering portal. (**https://srmetender.mahatransco.in/**)

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV O&M CIRCLE, AKOLA**

**श्री नरहरी नागरी सहकारी पतसंस्था, अमरावती**
**र.नं. १०८ जगदंबा टॉवर्स, अंबागेट जवळ, अमरावती**

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

संस्थेच्या सभासदांची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २७/०९/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेली आहे. सभेकरिता १ ते १२ विषय असून सर्व सभासदांनी श्री नरहरी महाराज प्रार्थना मंदिर, पूजा कॉलनी, फरशी स्टॉप जवळ, अमरावती येथे सभेला उपस्थित राहावे, ही विनंती.

आपले विनित

श्री नारायणराव ब.शेरेकर — अध्यक्ष
श्री विनायकराव पू.चेंडे — उपाध्यक्ष

प्रदिप वि.मोहने
मुख्य कार्यकारी अधिकारी

**NOTICE REGARDING DISCREPANCY IN NAME**

I, **Shabnam Parveen Najeebur Rahaman ,** born on 02/07/1966, residing at- Razzak Compound, Inkaiyya Pura, Camp, Amravati , Maharashtra, PIN-444602, hereby declare that in some places my name has been recorded as **Shabnam Perveen** ; however, my true and original name is **Shabnam Parveen Najeebur Rahaman.**
I hereby declare that **"Shabnam Parveen"** and **Shabnam Perveen"** refer to the same person-namely, myself. This declaration is made for all future requirements and official records.

**फ्लॅट विकणे आहे**

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.
**संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६**

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती.**
**चौकशीची जाहीर नोटीस**

**फेरफार अहवाल / अर्ज कमांकः १३८/१९/२०२६**
सार्वजनिक न्यासाचे नाव नोंदणी क्रमांकः **स्वर्गीय विठ्ठलराव बोंडे चॅरीटेबल ट्रस्ट अडुळा बाजार ता. दर्यापुर जि. अमरावती**
बाबत अर्जदार : **श्री. अनिल विठ्ठलराव बोंडे**
सर्व संबंधीत लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,
सहाय्यक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमूद केलेल्या फेरफार अहवाल / अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.
**(१) वर नमूद केलेला न्यास अस्तिवात आहे का ?** आणि सदरचा न्यासाचा सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ?
**(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाची मालकीची आहे काय ?**
**(अ) जंगम मिळकत (वर्णन):** निरंक
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन):** निरंक
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणे असेल त्यांनी लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफीयत विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे शिक्यानिशी आज दिनांक २७/०८/२०२६ रोजी दिली.

शिक्का
**अधिक्षक न्याय शाखा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अमरावती**

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**
**वि. श्री. आर. आर. खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**
किरकोळ अर्ज १९५०/२०२६ **गजाला + १ वि निरंक** पुढील तारीख १६.१०.२०२६

**जाहिरनामा / सायटेशन**

**अर्जदार- १ गजला परवीन खान मेहबूब सईद खान** वय ५८ वर्षे, व्यवसाय गृहिणी
**२. इकरा माहिन फेजान अहेमद उर्फ इकरा माहिन मेहबूब सईद** खान वय २८ वर्षे, व्यवसाय गृहिणी दोन्ही रा. पोलिस चौकी जवळ, डॉ. युसूफ खान हॉस्पिटलच्या बाजुला बिच्छु टेकडी, कॅम्प अमरावती

**विरुध्द-गैरअर्जदार- NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत मेहबूब सईद खान मो. शफी खान** हे **दि. २२.१२.२०२५ रोजी अमरावती येथे मयत** झाले. अर्जदार **गजला परवीन खान मेहबूब सईद खान + १** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827, CLUBBED WITH SECTION 304 OF CIVIL MANUAL ACT FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.
त्यापेक्षा **गजला परवीन खान मेहबूब सईद खान+१** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.
आज दि. १५.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१८९६/२०२६**
**शिला + २- वि. निरंक**
**पुढील ता.०९.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-**
1. **Shila Subhash Khandare,** Aged 40 year, Occu.: Household work R/o. Quarter No. 86, Near Vidyut Bhavan, Military Camp, Shivaji Nagar, Amravati
2. **Chetan Subhash Khandare,** Aged 23 years. Occu.: Student R/o. Quarter No.86, Near Vidyut Bhavan, Military Camp, Shivaji Nagar, Amravati
3. **Roshani Yogeshrao Natkar,** Aged 24 year, Occu.: Student R/o. Kailash Nagar, Kumbhari, Tq. & Dist. Akola

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Subhash Suryabhan Khandare** हे दिनांक **२०.०७.२०२६** रोजी ता.जि.अकोला येथे मयत झाले. **अर्जदार Shila Subhash Khandare + 2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.
त्यापेक्षा **Shila Subhash Khandare + 2** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.
आज दि.१५.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१८८३/२०२६**
**दिनेश शंकरराव कांबळे व इतर वि.निरंक**
**पुढील ता.२३.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :-
१. **दिनेश शंकरराव कांबळे,** वय अंदाजे ४८ वर्षे, धंदा-मजुरी
२. **लिलाबाई शंकरराव कांबळे,** वय ७३ वर्षे, धंदा- गृहिणी दोन्ही रा.विदर्भ महाविद्यालय, अमरावती, ता.जि.अमरावती
३. **अनिल शंकरराव कांबळे,** वय ५१ वर्षे, धंदा- नोकरी रा.विलास नगर, अमरावती
४. **योगिता ज्ञानेश्वर भिमटे,** वय अंदाजे ४६ वर्षे, धंदा-गृहिणी रा.केवल कॉलनी, अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत शंकरराव गुलाबराव कांबळे** हे दिनांक **२६.०८.२०१२** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार दिनेश शंकरराव कांबळे व इतर वि निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.
त्यापेक्षा **दिनेश शंकरराव कांबळे व इतर वि निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.
आज दि. ११.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

**जाहीर नोटीस**
**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)**
**चांदुर बाजार, जि. अमरावती.**

**आर.एम.जे.सी. ४१६/२०२६** **ने. ता. ०१/१०/२०२६**
**अर्जदार :- १. साबीर खान साहेब खान,** वय ५१ वर्षे, व्यवसाय - मजुरी रा. तोंडगाव ता. चांदुर बाजार जि. अमरावती
**२. समद खान साहेब खान,** वय ४८ वर्ष व्यवसाय - मजुरी रा. रामापुर पथ्रोट, ता. अचलपुर जि. अमरावती
**......विरूध्द...... गैरअर्जदार :- निरंक**
**बॉम्बे रेग्यूलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**
अर्जदार वरील ठीकाणी राहतात. **मृतक साहेब खान छोटे खान यांचा मृत्यु दि. २६/०५/२०२६ रोजी रा. तोंडगाव ता. चांदुर बाजार जि. अमरावती** येथे झालेला आहे. तसेच **मृतक तमीजाबी साहेब खान** हिचा मृत्यु दि. ०९/११/२०२३ रोजी रा. तोंडगाव ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथे झालेला आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराव्यतीरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना मय्यताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.नं. ४१६/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.
त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.
आज दि. ०२/०९/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानूसार
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय चांदूर बाजार**

**मा. दिवाणी न्यायाधिश क.स्तर नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

किरकोळ (RMJC) अर्ज क्र. : २६१/२०२६नेमलेली तारीख :- १२-१०-२०२६
**१. प्रमोद दिगांबरराव तायडे**
**२. रोशन प्रमोदराव तायडे**
**३. कृणाल प्रमोदराव तायडे** सर्व रा. सावनेर, ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती.

**//वि// निरंक**

ज्याअर्थी, मयत **सरोज प्रमोदराव तायडे** यांचा मृत्यु दि. २१.०४.२०२६ मध्ये **नागपूर, जि. नागपूर** येथे झाला. मयताचे अर्जदार क्र. १ हे पती असून अर्जदार क्र. २ व ३ ही मुलं आहेत. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.
आज दिनांक : १५ सप्टेंबर २०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर**

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**
**वि. श्री. एस.एस. भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**
किरकोळ अर्ज कमांकः १६२३/२०२६ पुढील तारीख १७.०९.२०२६
**Subhash Balmukund Panpaliya+2 Versus NIL**

**जाहिरनामा / सायटेशन**

**Applicants 1) Subhash Balmukund Panpaliya,** Age 71 Years Occ- Business R/o Purandare Appt. Rukhmini Nagar, Near 19 No. Mahanagar Palika School, Amravati.
**2) Shobha Rajendra Rathi,** age 67 yrs. Occ- Household, R/o Veanktesh Dham, Vasant Chowk, Amravati.
**3) Prakash Balmukund Panpaliya,** Age 65 Years Yrs, Occ Business R/o, 2-B, Shanti Kunj, Parag Township, Ram Nagar, Near Prashant Nagar Garden, Amravati.

==VERSUS==
NIL Non-Applicant

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **Shantabai Balmukundji Panpaliya** हे/हया १४.०४.२०२६ रोजी Amravati येथे मयत झाले/झाल्या अर्जदार **Subhash Balmukund Panpaliya+2** यानी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे त्यापेक्षा **Subhash Balmukund Panpaliya +2** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नयो असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल आज दि. १३/ ०८/२०२६ माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर अमरावती**

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.
**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक १५**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# ‘विकासाच्या गप्पा, पण मेळघाट अंधारातच’ ६०० किमी रस्ते मृत्यूसापळे

## आरोग्य, शिक्षण, रोजगारावर गंभीर परिणाम; १०० कोटींच्या तातडीच्या पॅकेजची मागणी

**मेळघाट/वार्ताहर**

विदर्भातील अतिदुर्गम आणि आदिवासी बहुल मेळघाट पुन्हा एकदा मूलभूत सुविधांच्या अभावामुळे चर्चेत आला आहे. धारणी व चिखलदरा तालुक्यातील सुमारे ६०० किलोमीटर लांबीचे रस्ते अक्षरशः उखडून गेले असून, ते आता ‘मृत्यूसापळे’ ठरत आहेत. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे येथील हजारो नागरिकांना दररोज जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आह

मेळघाट हा घनदाट जंगल, डोंगर-दऱ्या आणि विखुरलेल्या आदिवासी वस्त्यांसाठी ओळखला जातो. येथे रस्ता ही केवळ सुविधा नसून जीवनरेखा आहे. पण हीच जीवनरेखा आज तुटलेल्या अवस्थेत आहे. परिणामी, आरोग्य, शिक्षण, शेती व रोजगार या सर्वच क्षेत्रांवर गंभीर परिणाम होत आहे.

**आरोग्य व्यवस्था धोक्यात**

खड्डेमय रस्त्यांमुळे रुग्णवाहिका वेळेत पोहोचू शकत नाहीत. अनेक वेळा गर्भवती महिलांना, अपघातग्रस्तांना किंवा गंभीर रुग्णांना उपचारासाठी नेताना मोठा विलंब होतो. स्थानिकांच्या मते, काही प्रकरणांमध्ये वेळेवर उपचार न मिळाल्याने जीवितहानीही झाली आहे. पावसाळ्यात तर परिस्थिती आणखी भयानक होते आणि अनेक गावे पूर्णपणे संपर्कविहीन होतात.

**शिक्षणावर परिणाम**

विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी दररोज खराब रस्त्यांवरून लांबचा प्रवास करावा लागतो. अनेक ठिकाणी बस सेवा बंद किंवा अनियमित असल्याने विद्यार्थ्यांची उपस्थिती कमी होत आहे. काही ठिकाणी तर विद्यार्थ्यांनी शिक्षण अर्धवट सोडल्याच्या घटनाही समोर येत आहेत.

**शेती आणि रोजगाराला फटका**

शेतकऱ्यांना आपला माल बाजारात नेण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वाहतुकीचा खर्च वाढल्याने आणि वेळेवर बाजारपेठ गाठता न आल्याने त्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. परिणामी, आधीच आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या या भागातील लोकांची परिस्थिती आणखी बिकट होत आहे. मोकरबर्डी–परतवाडा, धारणी–रंगूबेली, धारणी–ढाकणा मार्गे आकोट, धारणी–खोंगडा मार्गे परतवाडा, तसेच चिखलदरा–परतवाडा यांसारखे प्रमुख मार्ग पूर्णपणे उध्वस्त झाले आहेत. याशिवाय गावागावांना जोडणारे अंतर्गत रस्तेही अत्यंत खराब अवस्थेत आहेत.

**नियम धाब्यावर; कोट्यवधींचा अपव्यय?**

गेल्या ३०-४० वर्षांत या रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात आले होते. शासकीय नियमानुसार रस्त्यांचे आयुष्य सात वर्षांचे असताना, गेल्या दशकभरात कोणतेही मोठे नूतनीकरण झालेले नाही. मात्र, ‘तात्पुरत्या दुरुस्ती’च्या नावाखाली दरवर्षी लाखो रुपयांचा खर्च दाखवला जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. प्रत्यक्षात ही कामे निकृष्ट दर्जाची असल्याने काही महिन्यांतच रस्ते पुन्हा खराब होतात.

**१०० कोटींच्या विशेष पॅकेजची गरज**


तज्ज्ञांच्या अंदाजानुसार, सर्व रस्त्यांचे दर्जेदार आणि टिकाऊ नूतनीकरण करण्यासाठी किमान १०० कोटी रुपयांची आवश्यकता आहे. त्यामुळे शासनाने तातडीने सर्व रस्त्यांची सर्वेक्षण करून वैज्ञानिक पद्धतीने इस्टिमेट तयार करावे आणि एकाचवेळी व्यापक दुरुस्ती मोहीम राबवावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

**जनतेचा इशारा आता तरी जागे व्हा!**

स्थानिक आमदारांनी हा प्रश्न विधानसभेत मांडून निधी मिळवून द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच, प्रशासनाने लवकरात लवकर ठोस निर्णय न घेतल्यास मोठ्या आंदोलनाचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

मेळघाटातील आदिवासी बांधव वर्षानुवर्षे मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करत आहेत. ‘विकास’ हा शब्द केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्षात उतरवायचा असेल, तर या रस्त्यांचा प्रश्न तातडीने सोडवणे गरजेचे आहे. अन्यथा, मेळघाटाचा हा दुर्गम भाग विकासाच्या मुख्य प्रवाहापासून कायमच दूर राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## ‘कोडफोर्ज-२६’ राष्ट्रीय हॅकाथॉनमध्ये प्रणय मोरेला द्वितीय पुरस्कार



**अमरावती** - येथील पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटच्या कम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग (CSE) विभागाच्या विद्यार्थ्यांनी पुसद येथे आयोजित करण्यात आलेल्या ‘कोडफोर्ज-२६’ या राष्ट्रीय स्तरावरील हॅकाथॉन स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेत तृतीय वर्षाचा विद्यार्थी प्रणय मोरे याने द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार पटकावला. ही राष्ट्रीय हॅकाथॉन स्पर्धा बाबासाहेब नाईक पुसद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुसद येथे आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत प्रणय मोरे याने आपल्या तांत्रिक कौशल्याचे आणि नावीन्यपूर्ण विचारांचे प्रभावी सादरीकरण करत द्वितीय पुरस्कार मिळविला. प्रणय मोरे याच्या या यशाबद्दल पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटचे प्राचार्य डॉ.पी.एम. जावंदिया, कम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागप्रमुख डॉ.व्ही.बी.गढीया, सहाय्यक विभागप्रमुख प्रा. एम. एस. बुरंगे तसेच विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे मनःपूर्वक अभिनंदन केले. तसेच त्याच्या पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## पी.आर.पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर येथे दीक्षांत कार्यक्रम व माजी विद्यार्थी समारोह

**अमरावती/का.प्र.**

पी. आर. पोटे पाटील आर्किटेक्चर महाविद्यालयात अभियंता दिनाचे औचित्य साधून दीक्षांत समारोह व माजी विद्यार्थी संमेलन आयोजित करण्यात आले.याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कार्यकारी अभियंता शशिकांत रोडे, अमरावती येथील जेष्ठ आर्किटेक्ट नितीन कदम व पी.आर. पोटे पाटील शिक्षण महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अनुप्रिता देशमुख यांची उपस्थिती लाभली.



याप्रसंगी विद्यार्थ्यांनी दीक्षांतासाठी आलेल्या विद्यार्थ्यांची सभागृहात प्रवेश दिंडी आयोजित केली. तसेच प्राचार्य संजय देशमुख यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये सदर पदवी वितरण कार्यक्रम विद्यापीठाच्या वतीने महाविद्यालयाकडून करण्यात येत आहे,असे प्रतिपादन केले.यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी वास्तुशास्त्र परिषद नवी दिल्ली, संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट मुंबई व पी.आर.पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अमरावती यांचेकडून शिक्षणादरम्यान प्रसृत झालेली मूल्ये जपण्याचा सतत प्रयत्न करू अशी शपथ घेतली.

त्यानंतर परीक्षेत मागील तीन वर्षातील बी आर्क च्या परीक्षेत अव्वल आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने २०२५ तुकडीतून संपूर्ण विद्यापीठातून द्वितीय आलेल्या साक्षी देशमुख हिचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच मागील तीन तुकडीतील गौरव गुप्ता,पारस तलरेजा,कृष्णा गीते, रजत बोहरा व कृष्णा जयस्वाल या महाविद्यालयातून अव्वल आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार झाला. यापुढे उपस्थित सर्व नूतन वास्तुशास्त्र उत्तीर्ण विद्यार्थ्यांना विद्यापीठाची पदवी सत्कारपूर्ण वातावरणात प्रदान करण्यात आली.

त्यानंतर माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष व महाविद्यालयातील शिक्षक प्रा अंकुश खंडारे यांनी माजी विद्यार्थी कक्ष याची नोंदणी २०१८ पासून झाली व याच्या कार्यातर्गत माजी विद्यार्थ्यांचा सहभाग महाविद्यालयीन शिक्षणामध्ये घेतल्या जातो असे सांगितले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा अंकुश खंडारे प्रा तृप्ती भामकर प्रा कीर्ती हिंगे यांनी विशेष परिश्रम घेतले व इतर शिक्षक सर्वस्वी प्रा.स्नेहल विदळे प्रा.भूपेंद्र जयस्वाल प्रा.अमित घाडगे प्रा.हरीश पळसोकार यांनी विद्यार्थ्यांसमवेद सतत परिश्रम घेऊन हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला.याबद्दल प्राचार्य व व्यवस्थापन यांनी संपूर्ण महाविद्यालयाचे अभिनंदन केले.

## ‘गीत मनोहर’मधून कविश्वरांच्या स्वरांची सुरेल मैफील

**अमरावती/का.प्र.**



कै. प्रा. पंडित मनोहरराव कविश्वर यांच्या सांगीतिक स्मृतींना उजाळा देणारा ‘गीत मनोहर’ हा सांगीतिक कार्यक्रम शिवाजी महाराज सभागृह येथे शुक्रवारी उत्साहात पार पडला. कविश्वर यांनी १९६० मध्ये साकारलेल्या ‘गीत गोविंद’चा पुनराविष्कार नव्या पिढीतील कलाकारांनी सादर केला.

कविश्वर हे कवी, गीतकार, गायक, संगीतकार, नट आणि दिग्दर्शक म्हणून अमरावतीच्या सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत होते. ‘अभिरुची कला व क्रीडा मंदिर’च्या माध्यमातून त्यांनी अनेक संगीत नाट्यप्रयोग साकारले. ‘गीत गोविंद’मधील दोन गीतांना सुप्रसिद्ध गायक-संगीतकार सुधीर फडके अर्थात बाबूजी यांचा आवाज लाभला होता.

‘गीत मनोहर’मध्ये आल्हाद आळशी, आलोक आळशी आणि मृण्मयी जोशी यांनी गायन केले. निवेदन सृजना मुळे कथलकर यांनी केले. हार्मोनियमवर सौमित्र क्षीरसागर, तबल्यावर पार्थ ताराबादकर, पर्कशनवर आदित्य आपटे, तर व्हायोलिनवर सिद्धी देशपांडे, वेधा पोळ आणि रिया पितळे यांनी साथसंगत केली.

ज्येष्ठ कलाकार आणि संगीतप्रेमी रसिकांच्या उपस्थितीत झालेला हा कार्यक्रम ‘गीत गोविंद’च्या सांगीतिक वारशाला नव्या पिढीशी जोडणारा ठरला. कलाकारांच्या मेहनत, चिकाटी आणि सांघिक सादरीकरणाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ‘गीत गोविंद’ ते ‘गीत मनोहर’ हा स्वरप्रवास रसिकांसाठी मर्मबंधातील ठेव ठरला.

## रासेयो विभागातर्फे एड्स विरोधी जनजागृती व्याख्यान उत्साहात

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे नुकताच एड्स विरोधी जनजागृती व्याख्यान प्राचार्य डॉ. मीनल भोंडे यांच्या मार्गदर्शनाने झाले. याप्रसंगी प्रमुख वक्त्या अर्चना भुसारी, सहाय्यक आरोग्य सेविका,जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण युनिट (डापकु), आय सी विभाग,जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती,पूजा हिंगोलकर तर अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. बबीता येवले, महिला रासेयो कार्यक्रम अधिकारी, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय अमरावती या उपस्थित होत्या.



या कार्यक्रमात मार्गदर्शन अर्चना भुसारी यांनी एड्स होण्याची कारणे, एड्सची लक्षण आणि एड्स होऊ नये यासंबंधी घ्यावयाचे प्रतिबंधिक उपाययोजना यासंबंधी त्यांनी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. समाजामध्ये एड्स या रोगाबद्दल बरेच गैरसमज पसरलेले असून ते दूर करण्याची जबाबदारी ही रासेयो स्वयंसेवक म्हणून आपली असल्याचे प्रतिपादन त्यांनी याप्रसंगी केले. विद्यार्थ्यांनी त्यांच्याशी संवाद साधून एड्स संबंधीची सविस्तर माहिती आणि शंकांचे निरसन केले. विद्यार्थ्यांनी या विरोधी जनजागृती करून त्याचा प्रचार व प्रसार करावा असे आवाहन याप्रसंगी भुसारी यांनी केले.

अध्यक्षीय मार्गदर्शनातून प्रा. डॉ. बबीता येवले यांनी भुसारी यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्यांनी दिलेल्या अत्यंत महत्त्वपूर्ण माहितीचा उपयोग सामाजिक आरोग्य सुधारण्यासाठी आपण कशा पद्धतीने करू शकतो यासंबंधीचे प्रतिपादन केले.कार्यक्रमाचे संचालन प्रास्ताविक आणि पाहुण्यांचे आभार प्रा. डॉ. गजानन काळे रासेयो कार्यक्रमाधिकारी यांनी मानले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने राष्ट्रीय स्वयंसेवक, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थानात

## मानसशास्त्र अभ्यास मंडळाचा उद्घाटन सोहळा आणि अतिथी व्याख्यान

**अमरावती/का.प्र.**

शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती येथील मानसशास्त्र विभागाने मानसशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन आणि अतिथी व्याख्यान असे दोन कार्यक्रम थाटात झाले. या कार्यक्रमाला संस्थेचे संचालक डॉ. केशव तुपे, उद्घाटक व प्रमुख अतिथि डॉ. गजानन रत्नपारखी, मानसशास्त्र विभागप्रमुख सहा. प्रा. वैशाली के शेळके, अभ्यास मंडळाच्या प्रभारी डॉ. सुमेधा जाधव, शैक्षणिक समन्वयक डॉ. दुर्गेश बोरसे, ग्रंथालय प्रमुख



डॉ. किशोर चुंगळे, मानसशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष सूरज शिंदे व सर्व कार्यकारिणी, विभागातील सर्व अधिव्याख्याता, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सर्व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि सरस्वती मातेच्या पूजनाने झाली.किर्ती नागले यांनी मधुर आवाजत स्वागत गीत गायले विभागप्रमुख सहा. प्रा. वैशाली शेळके यांनी कार्यक्रमाचे प्रस्तावीक केले.उद्घाटक डॉ. गजानन रत्नपारखी यांनी सत्र २०२६-२७ अभ्यास मंडळाचे उद्घाटन झाले असे घोषित करून सर्व विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.अभ्यास मंडळाची कार्यकारिणी मध्ये अध्यक्ष सूरज शिंदे,उपाध्यक्ष दानिन अली,सचिव क्षितिज शिरसाट, उपसचीव श्वेता जमानिक कोषाध्यक्ष मनिषा खंडारे, उपकोषाध्यक्ष पलक शाह, आणि सदस्य म्हणून प्रेक्षिता खडसे, कविता सुरकार, प्रणाली धाकडे, दानिश शेख, वेदांत आठवले, दीपाली वाट,श्रावणी पांडे आणि पल्लवी बनसोड इत्यादी विद्यार्थ्यांनची मानसशास्त्र अभ्यास मंडळाची कार्यकारिणी म्हणून निवड करण्यात आली.


मानसशास्त्र अभ्यास मंडळ उद्घाटन सोहळयानंतर विद्यार्थ्यांसाठी प्रमुख अतिथि महात्मा फुले महाविद्यालयाचे विभागप्रमुख डॉ. गजानन रत्नपारखी यांचे ‘मेथोडोलॉजी फॉर द प्रीपरेशन ऑफ रिसर्च प्रोजेक्ट’ यावर विशेष अतिथि व्याख्यान झाले.संस्थेचे संचालक तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. केशव तुपे यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात कार्यक्रमाचे आयोजन उत्कृष्टपणे केल्याबद्दल मानसशास्त्र विभागाचे कौतुक केले.

या दोन्ही कार्यक्रमाचे संचालन श्रावणी पांडे, पाहुण्यांचा परिचय श्वेता जमानिक आणि आभार दानिन अली यांनी केले. हे दोन्ही कार्यक्रम यशस्वी करण्यात मानसशास्त्र विभागातील अधिव्याख्याते शरद मानकर, ज्योती कोहली, प्रवीण लोही, सुरेश जमोतकर, मिलिंद वानखडे, रुपाली गायकवाड, झुबेर खान, विनय रत्नपारखी, कोमल मोंडे, शुभम वैद्य, कर्मचारी मंगला काळे आणि विद्यार्थीचे अमूल्य योगदान आहे. या कार्यक्रमाला मानसशास्त्र या विषयाच्या पदवी आणि पदवीत्तर वर्गातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन दोन्ही कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केले.

## संक्षिप्त

### गणेशोत्सवानिमित्त बहारदार भजन कार्यक्रम

**कुऱ्हा** -गणेशोत्सवानिमित्त गजानन भगोले यांच्या घरी बहारदार भजनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. श्री गुरुदेव लहानुजी महाराज भजन मंडळ, चेनुष्ठा यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमात हार्मोनियम वादक सोमेश्वर पत्रे व तबला वादक आशिष सावदे यांनी साथसंगत केली. गायक सुरेश आमले, शंकर उईके, दिवाकर ठाकरे, प्रभाकर मेहरे, गुरुदेव आमले, नंदू जगताप, संदीप ढोणे, विकी शेळके, ऋषिकेश आमले, सोहम शेळके व तेजस उईके यांनी एकापेक्षा एक सरस भजने सादर करून उपस्थितांची मने जिंकली.यावेळी नागेश भगोले, संतोष धुमाळे, विनोद बंगरे, संजय ठाकरे, राजेश भगोले, पवन आमले, अशोक गलबले, जगदीश नागपुरे आदी भाविक उपस्थित होते. भक्तिमय वातावरणात झालेल्या या कार्यक्रमाला परिसरातील भाविकांचा सुध्दा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



### बाजाराच्या शेडवर टिनपत्रे टाकण्याची ग्रामस्थांची मागणी

**शिराळा** -अमरावती तालुक्यातील मोठे असलेले गाव म्हणजे शिराळा पण सुविधा मात्र शुन आहे.लहान जागेत बाजाराचे बांधकाम मोझरी विकास आराखड्यातुन करण्यात आले होते.परंतु गेल्या दहा वर्षापासून बाजारातील शेडवर टिनपत्रे टाकण्यात आले नाही.म्हणजे शिराळा बाजाराचा विकास आराखडा कोठे गेला हा यक्षप्रश्न ग्रामस्थांना पडला आहे. भरपावसात व्यापारी व ग्राहकांना पाण्यात बाजार करावा लागतो. या बाजारात शेजारील अनेक खेड्यातील नागरिक बाजार करण्यासाठी येतात पण बाजारात कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्यामुळे अनेक त्रास सहन करावा लागतो.पण नेते मंडळींना किंवा आमदार मोहदयांना या बाबींचे काही देणे घेणे नाही. विकास आराखडयाच्या नावावर अनेक गावांसाठी निधी आणण्यात आला मात्र शिराळा गावाला काही निधी आला नाही.नाल्या नाही धडरस्ते नाही,गांव मोठे लक्षणं खोटे ' असे म्हटले तरी वावगे होणार नाही. बाजाराचा हरासं लाखो रुपयात जातो.तरी शासनाने आमदारांनी या बाबींची दाखल घेवुन शिराळा येथील बाजाराच्या शेडवर टिनपत्रे टाकण्याची ग्रामस्थांची मागणी केली आहे.




### आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांना सुरक्षिततेचे धडे

**अंजनगाव बारी** - राष्ट्रीय व्यवस्थापन प्रशिक्षण, मुंबई यांच्या वतीने जानाराव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अंजनगाव बारी येथे आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. या प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांना आपत्तीच्या प्रसंगी घ्यावयाची काळजी,सुरक्षिततेचे उपाय तसेच आपत्कालीन परिस्थितीत प्रभावीपणे प्रतिसाद देण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.कार्यक्रमाचे मार्गदर्शक शाहीद यांनी आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्व स्पष्ट करताना भूकंप, पूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तींच्या वेळी घ्यावयाच्या खबरदारीची माहिती दिली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य गजेंद्र अवघड होते. अध्यक्षीय मनोगतात त्यांनी आपत्तीच्या वेळी घाबरून न जाता प्रसंगावधान राखून योग्य पद्धतीने कृती करणे आवश्यक असल्याचे सांगितले. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाबाबत जागरूकता निर्माण होऊन सुरक्षिततेविषयी आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली.कार्यक्रमास विद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.संचालन धनंजय चांदोरे यांनी केले.



### कबड्डी संघाची जिल्हास्तरावर निवड

**मोर्शी** - स्थानिक जिजामाता माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, मोर्शी येथील १४ वर्षांखालील मुलींच्या कबड्डी संघाने उत्कृष्ट कामगिरी करत जिल्हास्तरावर निवड होण्याचा मान मिळविला. स्पर्धेत मुलींनी दमदार खेळाचे प्रदर्शन करीत विजय संपादन केला.संघ प्रशिक्षक रोशन आनंदे व संघ व्यवस्थापक अतुल खासबागे यांच्या मार्गदर्शनाखाली संघाने ही उल्लेखनीय कामगिरी केली. या यशाबद्दल शाळेचे प्राचार्य सुधीरकुमार सवाई यांनी विजयी खेळाडूंचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत व अभिनंदन केले. विद्यार्थिनींनी भविष्यातही अशीच उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.यावेळी शाळेतील शिक्षक एस.पी.ठाकरे,जे. पी. पखने,व्ही.ई.कानबाले, बी. एन. भारती, समीक्षा नाखले, मृणाली उईके, वेदांत भोंगे, तंतरपाळे, गोम काळे, चौधरी आदी उपस्थित होते. जिल्हास्तरावर निवड झालेल्या कबड्डी संघाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.




### जातीवाचक शिवीगाळ व मारहाणीच्या गुन्ह्यातून आरोपीची निर्दोष मुक्तता

**अमरावती** -पोलीस स्टेशन माहुली जहागीर येथे दाखल असलेल्या अपराध क्र. ३२३/२०२५, कलम २९४, ५०६ भारतीय दंड विधान व सहकलम ३ (१) (एस) अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायदा व कलम १३५ मुंबई पोलीस कायद्या अंतर्गत दाखल गुन्ह्यातील आरोपी किशोर सुधाकरराव केतकर, रा. अंतोरा यांची विद्यमान जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती, कोर्ट नं. ४ यांनी निर्दोष मुक्तता केली आहे.अ‍ॅड. निलेश मेटानकर यांनी केलेला युक्तीवाद व सादर केलेले सबळ पुरावे ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीस निर्दोष मुक्त केले.या खटल्यात सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता यांनी बाजू मांडली. तर आरोपीतर्फे अ‍ॅड. एन. आर. मेटानकर यांनी यशस्वी युक्तीवाद केला. त्यांना अ‍ॅड.वाहने, अ‍ॅड.नंदकिशोर चौधरी, अ‍ॅड.नितीन शेळके,अ‍ॅड.रविकिरण जवंजाळ व अ‍ॅड.प्रतिक्षा दहाट यांनी सहकार्य केले.



# स्मशानभूमीत अघोरी पूजा? पाच जणांना अटक

## दफन केलेल्या मृतदेहाच्या स्थळाजवळ पूजा साहित्य आढळले

**शिरजगाव कसबा/प्रतिनिधीः-** दफन केलेल्या मृतदेहाला तंत्र-मंत्राच्या माध्यमातून स्मशानभूमीत अघोरी पूजा केल्याचा धक्कादायक प्रकार ब्राह्मणवाडा थडी येथे उघडकीस आला. या प्रकरणी ब्राह्मणवाडा थडी पोलिसांनी तत्पर कारवाई करत पाच जणांना ताब्यात घेतले. निलेश मनोहरराव सोनटक्के (वय ३४, संतोषीनगर, अमरावती), सुबोध प्रकाश भोयर (वय ३०, उदखेड, अमरावती), आशुतोष महादेव तायडे (वय ३०, कौलखेडा, अकोला), साहेबराव पांडुरंग गायकवाड (वय ५६, ठाणे/पुणे) आणि चंदू गणेशलाल गुप्ता (वय ४३, ब्राह्मणवाडा थडी, ता. चांदूर बाजार) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

ब्राह्मणवाडा थडी येथील महेंद्र राजू गवळी (वय २७) यांचे निधन झाल्यानंतर १५ सप्टेंबर रोजी दुपारी स्थानिक हिंदू स्मशानभूमीत त्यांच्या मृतदेहाचे दफन करण्यात आले. दरम्यान, १६ सप्टेंबर रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास मृताच्या चुलत भावाला स्मशानभूमीत काही अज्ञात व्यक्ती पूजा-पाठ करीत असल्याची माहिती मिळाली. मृताच्या नातेवाइकांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता कबरीजवळ तंबाखू, अगरबत्ती, माचिस, फुटाणे, इत्राची छोटी बाटली आणि काळी टोपी यासह काही पूजा साहित्य आढळून आले. स्मशानभूमीच्या भिंतीलगत एमएच ०३/सीएच २६६५ क्रमांकाची कारही उभी असल्याचे आढळले. मृतदेहाला तांत्रिक क्रियेद्वारे जिवंत करण्याच्या उद्देशाने हा प्रकार करण्यात आल्याचा संशय तक्रारीत व्यक्त करण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळताच ब्राह्मणवाडा थडी पोलिसांनी प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत तपास सुरू केला. महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा तसेच जादूटोणा प्रतिबंध व निर्मूलन अधिनियम, २०१३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर पोलिसांनी नाकाबंदी करून संशयितांचा शोध घेतला. काही तासांतच पाच जणांना पकडण्यात पोलिसांना यश आले.

या प्रकरणाचा पुढील तपास ब्राह्मणवाडा थडी पोलीस करीत आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोतेवाड, सहायक पोलीस अधीक्षक ईशानी आनंद आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत जाधव, अमोल राऊत, राजू मरास्कोल्हे, हेमंत येरखडे आणि अनुप मानकर यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# बीएमएस डॉक्टरचा संशयास्पद मृत्यू

**-आष्टी येथील घरात आढळला मृतदेह**

## औषधीचा ओवरडोज झाल्याचा अंदाज

**अमरावती/प्रतिनिधीः-** नुकत्याच बीएएमएस झालेल्या एका तरूण डॉक्टरचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना जिल्ह्यातील वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आष्टी गावात उघडकीस आली आहे. आदित्य ज्ञानेश्वरराव रावते (वय २२, आष्टी) असे मृत डॉक्टरचे नाव आहे. त्याला लहानपणापासून फिट्सचा आजार होता आणि तो त्वचेचा रंग गोरा करण्यासाठी काही औषधे घेत होता, अशी माहिती त्याच्या कुटुंबीयांनी पोलिसांना दिली आहे. त्यामुळे रंग गोरा होण्याच्या औषधांच्या अतिसेवनातून त्याचा मृत्यू झाला आहे का, असा सवाल उपस्थित



करण्यात येत आहे.

माहिती नुसार, आदित्यने नाशिक येथून बीएएमएस पदवी पूर्ण केली होती. त्यानंतर तो अमरावतीतील एका नामांकित रुग्णालयात शिका डॉक्टर म्हणून काम करत होता. नेहमी प्रमाणे रात्री कुटुंबासोबत जेवण केल्यानंतर तो आपल्या खोलीत झोपण्यासाठी गेला होता. मात्र, दुसऱ्या दिवशी १५ सप्टेंबरच्या सकाळी बराच वेळ झाला तरी तो खोलीबाहेर न आल्याने कुटुंबीयांनी दरवाजा उघडला. त्यावेळी आदित्य मृतावस्थेत आढळून आला. हे दृश्य पाहताच कुटुंबीयांना मोठा धक्का बसला. मृत आदित्यला लहान पणापासूनच फिटचा आजार होता, तसेच स्वतःचा रंग गोरा करण्यासाठी तो स्वतःवरच उपचार करत काही औषधे घेत असल्याची ☞(पान २ वर)

# रूपाली सराटकर हत्या प्रकरणात आरोपीला जन्मठेप

**-मुलाला एक लाखांची नुकसानभरपाई**

## मृतदेह नदीपात्रात फेकून पुरावा नष्ट केल्याप्रकरणीही शिक्षा

**मोर्शी/प्रतिनिधीः-** राघव सराटकर या ११ वर्षीय मुलाच्या कारणावरून झालेल्या वादातून रूपाली सराटकर यांची मारहाण करून हत्या केल्यानंतर मृतदेह नदीत फेकून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी धनराज दशरथ चढोकार (वय ४१, रा. मोर्शी) याला न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली. आरोपीला त्याच्या उर्वरित नैसर्गिक आयुष्यापर्यंत जन्मठेप तसेच एक लाख रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. पुरावा नष्ट केल्याप्रकरणी भारतीय दंड विधानाच्या कलम २०१ अन्वये तीन वर्षे सक्तमजुरी व एक लाख रुपये दंडाची शिक्षाही सुनावण्यात आली. दोन्ही शिक्षा एकत्र भोगायच्या आहेत. जिल्हा व सत्र न्यायाधीश क्रमांक १, वरूड येथील न्यायालयात न्यायाधीश ए. ए. पंचभाई यांनी गुरुवारी (दि.१७ सप्टेंबर) हा निकाल दिला. तसेच दंडाची



रक्कम न भरल्यास अतिरिक्त शिक्षेची तरतूद करण्यात आली असून, मृतकाचा मुलगा राघव सराटकर याला एक लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश न्यायालयाने दिले. ही घटना ६ ऑगस्ट २०२२ रोजी मोर्शी येथे घडली.

विधी सूत्रानुसार, रूपाली सराटकर या त्यांचा मुलगा राघव याच्यासह आरोपी धनराज चढोकारसोबत काही दिवसांपासून राहत होत्या. घटनेच्या दिवशी सकाळी सुमारे ११ वाजता राघवच्या कारणावरून धनराज आणि रूपाली यांच्यात वाद झाला. या वादातून धनराजने रूपाली यांना मारहाण केल्याचे तपासात निष्पन्न झाले. मारहाणीनंतर रूपाली यांना घरातच ठेवून आरोपी राघवला सोबत घेऊन सालबर्डी येथे गेला. सायंकाळी ☞(पान २ वर)

# सहाय्यक अभियंत्याला दोन लाखांची लाच घेताना रंगेहात अटक

**धारणी सार्वजनिक बांधकाम उपविभागात एसीबीचा ट्रॅप**

**अमरावती/प्रतिनिधीः-** दीड कोटी रुपयांच्या बिलाच्या मोबदल्यात एकूण १० लाख ५० हजार रुपयांची लाच मागणाऱ्या साहाय्यक अभियंत्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दोन लाख रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात अटक केली आहे. विनोद मकरध्वज नवघरे (वय ३४, रा. विसावा कॉलनी, मूळ रा. बोरखेडी, पो. वेणी, ता. लोणार, जि. बुलढाणा) असे या जाळ्यात अडकलेल्या लाचखोर साहाय्यक अभियंत्याचे नाव आहे.

धारणी सार्वजनिक बांधकाम उपविभाग येथे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने ही कारवाई केली. माहिती नुसार, तक्रारदार हे बांधकाम कॉन्ट्रॅक्टर व बिल्डिंग मटेरियल सप्लायर असून त्यांनी २०२४-२५ व २०२५-२६ या आर्थिक वर्षात सार्वजनिक बांधकाम उपविभाग, धारणीअंतर्गत महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतून धारणी



तालुक्यातील विविध गावांमध्ये सिमेंट काँक्रिट रस्ता साहित्याचा पुरवठा व बांधकामाची कामे केली होती. या कामांपैकी दीड कोटी रुपयांचे काम मार्च २०२६ मध्ये प्राप्त झाले होते, तर उर्वरित ८० लाख रुपयांचे देयक मिळणे बाकी होते.

मार्च २०२६ मध्ये काढलेल्या दीड कोटी रुपयांच्या देयकाच्या मोबदल्यात साहाय्यक अभियंता विनोद नवघरे याने ७ टक्के प्रमाणे १० लाख ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. या प्रकरणी तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक ☞(पान २ वर)

# ग्रामपंचायतीवर प्रशासक म्हणून पत्रकारांना संधी द्या

**अ.भा.ग्रामीण पत्रकार संघाची मुख्यमंत्र्यांकडे मागणी**

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** ग्रामपंचायतीचा कार्यकाळ संपल्यानंतर किंवा प्रशासक नियुक्त करण्याची वेळ आल्यास, ग्रामीण भागातील सामाजिक प्रश्न आणि जनहिताच्या समस्यांची सखोल जाण असणाऱ्या पात्र व अनुभवी स्थानिक पत्रकारांची 'प्रशासक' म्हणून नियुक्ती करण्यात यावी, अशी आग्रही मागणी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात चांदूर रेल्वेचे उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत महाराष्ट्राच्या



मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले.

ग्रामीण भागातील पत्रकार हा गावातील रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण यांसारख्या मूलभूत सुविधांसह शासनाच्या विविध योजनांची प्रत्यक्ष माहिती ठेवतो. तसेच जनतेचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहचवून ते सोडवण्यात नेहमी अग्रभागी असतो. त्यामुळे ग्रामपंचायतीचा कारभार अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी ☞(पान २ वर)

# ऑनलाइन चक्री जुगार अड्ड्यावर धाड

## ३६ हजारांचा मुद्देमाल जप्त

**-गुन्हे शाखा युनिट-२ व खोलापुरी गेट पोलिसांची संयुक्त कारवाई**

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात ऑनलाइन चक्री जुगार सुरू असल्याची माहिती मिळताच गुन्हे शाखा युनिट-२ आणि खोलापुरी गेट पोलिसांच्या पथकाने बुधवारा भाजीबाजार परिसरात धाड टाकून दोघांना ताब्यात घेतले. या कारवाईत रोख रक्कम, मोबाइल व ऑनलाइन जुगाराचे साहित्य असा एकूण ३६ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी शहरातील अवैध धंद्यांविरोधात प्रभावी मोहीम राबविण्याचे निर्देश गुन्हे शाखेच्या पथकाला दिले होते. त्यानुसार गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वाखाली पथक अवैध जुगार अड्ड्यांवर लक्ष ठेवून होते. ☞(पान २ वर)

# गुजरी बाजार येथे आ.प्रवीण तायडे यांच्या हस्ते नवीन पोलिस चौकीचे लोकार्पण

**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा शहरातील व्यासावयिक आणि वाहतुकीची नेहमी वर्दळ असलेल्या गुजरी बाजार परिसरात अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांच्या प्रयत्नातून स्थानिक आमदार निधीतून निर्माण करण्यात आलेल्या पोलिस चौकीचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला.



यावेळी आमदार प्रवीण तायडे यांची प्रमुख उपस्थितीती होती.सोबतच अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव,अचलपूर उपविभागीय पोलीस अधिकारी ईशानी आनंद,अचलपूर नगर ☞(पान २

# बडनेरा पोलिसांनी लावले ५९ तडीपार गुंडांचे बॅनर

**-बघण्यासाठी नागरिकांची गर्दी**

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा पोलिसांनी शहरातून तडीपार केलेल्या आरोपींचे नाव आणि फोटो सह बॅनर लावले असून, हे बॅनर पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी उसळली आहे.बॅनरवर नाव, फोटो सोबतच तडीपारीचा कालावधीही सार्वजनिक करण्यात आला आहे. माहिती नुसार, १३ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर पर्यंत तडीपार केलेल्या आरोपींची यादी बॅनरच्या माध्यमातून नागरिकांसमोर ठेवण्यात आली आहे.बडनेरा पोलीसांनी एकूण ५९ ☞(पान २ वर)



# आठवडी बाजारातील धोकादायक खड्डा ठरतोय अपघातांना निमंत्रण

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधी:-** शहरातील आठवडी बाजार परिसरातील रस्त्यावर पडलेला मोठा खड्डा नागरिकांसाठी धोकादायक ठरत असून, या समस्येकडे नगरपालिका प्रशासनाचे गेल्या वर्षभरापासून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. खड्ड्यामुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांना जीव मुठीत घेऊन मार्गक्रमण करावे लागत आहे. आठवडी बाजाराच्या दिवशी या परिसरात नागरिकांची मोठी गर्दी असते. अशा वेळी हा खड्डा अपघाताचा धोका अधिक वाढवितो. खड्डा बुजविण्याऐवजी



**वर्षभरापासून प्रशासनाचे दुर्लक्ष**

त्यात दगड, लाकडाचे ओंडके आणि इतर साहित्य टाकून केलेली तात्पुरती व्यवस्था ही समस्येवर उपाय नसून नागरिकांच्या अडचणीत भर घालणारी ठरत आहे.

विशेष म्हणजे संबंधित अधिकारी या परिसराची पाहणी करून गेल्याचे नागरिकांचे म्हणणे ☞(पान २ वर)

# पोल्ट्री फार्म फोडून कोंबड्या चोरणारे दोघे अटकेत

**अमरावती/प्रतिनिधीः-** पोल्ट्री फार्मचे कुलूप तोडून कोंबड्या चोरी करणाऱ्या दोघांना अटक करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले. याशिवाय २०१४ पासून दरोडासदृश जबरी चोरीच्या गुन्ह्यात फरार असलेल्या आरोपीलाही चांदूर रेल्वे येथून ताब्यात घेण्यात आले. अमरावती ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या या कारवाईत पोल्ट्री चोरीच्या गुन्ह्यातील दोन आरोपींकडून रोकड आणि गुन्ह्यात



वापरलेली दुचाकी असा ४९ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

मोर्शी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दापोरी येथील अशोक फकीरजी चौधरी यांच्या ☞(पान २ वर)

# २०१४ पासून फरार आरोपी अखेर जेरबंद

दरम्यान, नांदगाव खंडेश्वर पोलिस ठाण्यात २०१४ मध्ये दाखल झालेल्या जबरी चोरीच्या गुन्ह्यातील फरार आरोपीलाही स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली. १४ जानेवारी २०१४ रोजी वाढोणा येथील तिरमारे बार अॅण्ड रेस्टॉरंटमध्ये चार जणांनी प्रवेश करून फिर्यादीला मारहाण केली. त्यानंतर बारमधील मद्याच्या बाटल्या, रोकड आणि कामगारांचे मोबाईल घेऊन आरोपी पसार झाल्याची तक्रार करण्यात आली होती. याप्रकरणी नांदगाव खंडेश्वर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील दिपक रतन



पवार (३५, रा. शिवाजीनगर, चांदूर रेल्वे) हा २०१४ पासून फरार होता. त्याच्याविरुद्ध न्यायालयीन अटक वॉरंट तसेच पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यात आली ☞(पान २ वर)

